प्रकरण १

# १९६० नंतरचे कादंबरी वाङ्मय व कादंबरी वाङ्मय प्रकाराचे स्वरूप, संज्ञा, व्याख्या व पार्श्वभूमी यांचा थोडक्यात परामर्श.

## प्रकारण १ ले

---

**प्रास्ताविक**

**कादंबरी संकल्पना व स्वरूप**

**कादंबरीचे घटक**

१) कथानक

२) व्यक्तिचित्रण

३) वातावरण

४) निवेदन

५) भाषाशैली

**कादंबरीची वाटचाल**

१) मराठी कादंबरी – इ. स. १८४१ ते इ. स. १८८५

२) मराठी कादंबरी – इ. स. १८८५ ते इ. स. १९२०

३) मराठी कादंबरी – इ. स. १९२० ते इ. स. १९४७

४) स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी – इ. स. १९४७ ते इ. स. १९६०

५) साठोत्तर मराठी कादंबरी

**कादंबरीतील विविध प्रवाह**

१) रंजनवादी कादंबरी

२) ऐतिहासिक कादंबरी

३) पौराणिक कादंबरी

४) चरित्रात्मक कादंबरी

५) स्त्रीलिखित कादंबरी

६) दलित कादंबरी

७) ग्रामीण कादंबरी

**प्रास्ताविक –**

माणूस हा समाजप्रिय प्राणी आहे. साहित्य हे माणसांच्या समाजजीवनाचे एक अंग होय. म्हणूनच समाजातील विविध घटनांचा, बदलांचा परिणाम साहित्यावरती होणे अटळ असते. या परिणामामुळे वेगवेगळ्या साहित्य विषयक जाणीवा, प्रवाह साकार होत असतात. त्यातील समाज परिवर्तनाचा एक आविष्कार म्हणजे कादंबरी होय. कादंबरीची जडणघडण समाजातच होत असते आणि समाजातूनच नावारूपाला येत असते. साहित्य व समाज यांचे नाते अतूट असते. कादंबरी हा सर्वसमावेशक असा वाङ्मय प्रकार आहे.

साहित्यामध्ये मुख्यत: दोन प्रकार आहेत, ते म्हणजे गद्य आणि पद्य. गद्य या साहित्यप्रकारात कथा, कादंबरी, नाटक, चरित्र, आत्मचरित्र इत्यादींचा समावेश असतो. तर पद्य या साहित्यप्रकारात सुनीत, खंडकाव्य, महाकाव्य इत्यादी काव्यांचा समावेश असतो. प्रत्येक साहित्य प्रकाराचे वेगळे वैशिष्ट्य असते. सर्वच साहित्याचा उद्देश एक असला तरी रचना, भाषा, आशय,संवाद इत्यादी बाबतीत प्रत्येकात भिन्नता आढळत असते. कादंबरी हा दीर्घ कथनपर गद्य साहित्यप्रकार म्हणून मान्यता पावला आहे. तसेच लोकप्रियही झाला आहे. सर्वसामान्य रसिक वाचकांपासून ते अभ्यासकांपर्यंत, लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वच सामाजिक स्तरावरील लोकप्रिय वाङ्मयप्रकार म्हणजे कादंबरी होय. समाजातील सर्वच स्तरावर ओळखला जाणारा हा वाङ्मय प्रकार आहे. कादंबरी निर्मिती मागे अनेक उद्दिष्ट असतात. त्यातील लोकांचे मनोरंजन हे एक जरी उद्दिष्ट विचारात घेतले तरी समाजातील सर्व स्तरात लोकांच्याकडून कादंबरी आवडीने वाचली जाते. तसेच कादंबरी या वाङ्मयप्रकारामध्ये व्यक्तींच्या जीवनातील विस्तृतपट, सुख–दु:ख, समस्या, भूतकाळ, भविष्यकाळ, वर्तमानकाळात डोकावून वास्तव घटनांचे चित्रण केले जाते. विस्तृत जीवनपट मांडणारा गद्यात्म साहित्यप्रकार म्हणून कादंबरी ओळखली जाते.

वाङ्मय इतिहासाच्या दृष्टिकोनातून विचार केल्यास बाबा पद्मनजी यांची 'यमुना पर्यटन' १८५७ ही पहिली कादंबरी मानली तर या वाङ्मयप्रकाराला दीडशे वर्षांचा प्रदीर्घ इतिहास आहे. या काळात अनेक चढ–उतार, बदल झाले. या सर्वांचा परिणाम कादंबरीवर

झालेला दिसतो. त्यानुसार तिच्यात बदलही झालेला आहे. कादंबरीच्या निर्मितीपासून प्रारंभिक अवस्थेतून सुधारणा होऊन ती स्थिरावली. आधुनिकतेची वाटचाल करू लागली आणि स्वतंत्र गद्य वाङमय प्रकार म्हणून साहित्य शारदेच्या मंदिरात मानाचे स्थान प्राप्त केले. म्हणूनच एवढ्या प्रदीर्घ परंपरेतील साहित्य प्रवाहातील कादंबरीकारांचा अभ्यास करताना अत्यंत प्रारंभिक अवस्थेपासून कादंबरीचा थोडक्यात आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे.

**अ) कादंबरी संकल्पना व स्वरूप –**

**१) कादंबरीची उत्पत्ती –**

कादंबरी हा मानवी जीवन व्यापणारा व संपूर्ण जीवनपट उलगडण्याची क्षमता असणारा हा वाङ्मय प्रकार आहे. त्यामुळे मानवी जीवनाचे व्यापक दर्शन कादंबरीतून घडविता येते.

कादंबरी या शब्दाची उत्पत्ती कशी झाली हे पाहताना इंग्रजीनंतर संस्कृत साहित्य पहावे लागते. कादंबरी हा वाङ्मय प्रकार पाश्चात्य वाङमयाकडून आपल्याकडे आला आहे. कादंबरी या वाङ्मय प्रकारासाठी Novel हा इंग्रजी प्रतिशब्द आहे. Novel या इंग्रजी शब्दाची निर्मिती Novus या लॅटिन शब्दापासून झाली आहे. मराठीतील कादंबरीला इंग्रजीमध्ये Novel असे यथार्थपणे संबोधले जाते. Novel म्हणजे 'नाविन्यपूर्ण कथा' होय. यावरून कादंबरीच्या नवलपूर्ण स्वरूपाची कल्पना येण्यास मदत होते. नवनिर्मितीचा बोधही तिच्यातून होऊ शकतो. इंग्रजीमध्ये नाविन्यपूर्ण विषय असलेल्या लेखनाला Novel हा शद्व रूढ झाला. मराठीमध्ये याच 'नॉव्हेल' साठी 'नाव्हल' व पुढे नावल हा शब्द रूढ झाला. लक्ष्मणशास्त्री जोशी यांच्या मते 'नॉव्हल ही संज्ञा मूळ लॅटिन 'नॉव्हस' (Novus) म्हणजे 'नाविन्यपूर्ण' आणि त्याच्या 'नॉव्हेला' (Novlla) या इटालियन रूपावरून इंग्रजीत आली. [१] कादंबरीसाठी नॉव्हेल हा शब्द वापरला जात होताच. दरम्यान वास्तवांचे कल्पित व्यक्ती कथानक आणि घटना प्रसंगाद्वारे केलेले चित्रण म्हणजे Fiction ही आणखी एक संज्ञा रूढ झाली.

मराठीमध्ये प्रचलित असलेल्या कादंबरी या शब्दाची उत्पत्ती कशी झाली हे पाहणे आवश्यक आहे. कादंबरी या शब्दाला जवळ जवळ दीडशे वर्षांचा इतिहास आहे. कादंबरी या शब्दाची उत्पत्ती संस्कृतमधील 'कदंब'पासून झाली असून याचा अर्थ मद्य, धुंदी, आसव असा होता. कदंब या फुलापासून मद्य तयार केले जाई. त्याच्या सेवनामुळे व्यक्तीस एक वेगळीच धुंदी येत असे व्यक्तीस अशी धुंदी आणणारी अद्भूत, कल्पक, प्रणयरम्य कथा सर्वप्रथम संस्कृत कवी बाणभट्ट याने रचली. या कथेतील नायिकेचे नाव 'कादंबरी' होते. ही कथा वाचकांना खूप आवडली. तेव्हापासून अशा प्रकारच्या अद्भूत, काल्पनिक, प्रणयरम्य लेखनास कादंबरी म्हणण्याची, कादंबरी नावाने ओळखण्याची प्रथा, परंपरा सुरू झाली.

## २) कादंबरीची व्याख्या –

कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या व्याख्येबाबत निश्चित अशी विधाने करता येतील काय? हा अतिशय अवघड प्रश्न आहे. कादंबरी हा लवचिक आणि सर्वसमावेशक असा वाङ्मय प्रकार असल्याने तिची साचेबंद किंवा ठराविक आणि एकच व्याख्या करता येत नाही. तसेच तिला ठराविक अशा एका चौकटीत बांधता येत नाही. या संदर्भात उषा हस्तक म्हणतात, 'कादंबरीची व्याख्या करता न येण्याचे कारण तिच्या प्रकृतीतच दडलेले आहे.'[२] बदलत्या काळानुसार कादंबरीच्या स्वरूप व प्रयोजनातही बदल होत गेले. त्यामुळे कादंबरीची निश्चित अशी व्याख्या करता येत नाही. तरीही संशोधकांनी या सर्व गोष्टींचा विचार करता आपल्या संशोधनातून काही व्याख्या केल्या आहेत. त्यातील काही व्याख्यांचा आढावा घेण्याचा प्रयत्न केला आहे. कादंबरीच्या व्याख्येविषयी उषा हस्तक लिहितात,''लयबध्द शब्दरचना हे जसे कवितेचे अंगभूत वैशिष्ट्य मानता येते. कादंबरीमध्ये केवळ तिच्याच घडणीच्या संदर्भात दृगोचर होणारे एकही वैशिष्ट्य दाखविता येत नाही म्हणूनच तिच्या पृथगात्म रूपाचेच मर्म अचूकपणे पकडणारी काटेकार व्याख्या ज्या अडचणी उद्भवतात, त्याचे मूळ तिच्या प्रकृतीधर्मातच दडलेले आहे असे म्हणावे लागते.''[३] कवितेचे विशिष्ट असे वैशिष्ट्य सांगता येते तसे कादंबरी या वाङ्मय प्रकाराचे ठराविक असे वैशिष्ट्य सांगता येत नाही.

रा. ग. जाधव कादंबरीच्या व्याख्येसंदर्भात लिहितात –''कथानक व्यक्तीचित्रण लेखकाच्या दृष्टिकोन व यांना अनुरूप अशी निवेदनतंत्रे वर्णन वातावरण निर्मिती शैली इत्यादि घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.''[४] कादंबरीचे घटक मिळून कादंबरी उदयाला येते. या घटकांवरच कादंबरीचे स्वरूप अवलंबून असते. तिचे श्रेष्ठत्व ठरते.

कॅथरीन लिव्हर यांच्या मते, ''कादंबरी म्हणजे कथनात्म लिखित गद्याला बऱ्यापैकी दीर्घ म्हणता येईल असा, लेखकाने निर्मिलेल्या नव्या आणि कल्पित वास्तवात वाचकाला गुंगवून टाकणारा रचनाबंध होय.''[५] समाजातील वास्तव घटनांच्या माध्यमातून उदयाला येणारा दीर्घगद्य प्रकार होय.

लक्ष्मणशास्त्री जोशी यांनी कादंबरीची व्याख्या पुढीलप्रमाणे केली आहे. ''कथानक, व्यक्तीचित्रण, लेखकाचा दृष्टिकोन व यांना अनुरूप अशी निवेदन तंत्रे, वर्णने, वातावरण निर्मिती, शैली इत्यादी घटकांनी गद्यात विस्तृतपणे संघटित केलेले वास्तव जीवनाचे चित्रण म्हणजे कादंबरी होय.''[६]

सर्व घटकांच्या उपयोगातून वास्तव घटनांचे चित्रण कादंबरीतून केले जाते. या सर्व व्याख्यांचा विचार केल्यानंतर असे म्हणता येते की ''कादंबरीकार स्वातंत्र्याच्या आवश्यक उपयोगानुसार त्याला आवडणारी आशयानुसार त्याने निवडलेली सृष्टीतील कथात्मक, ललित, गद्य यामध्ये भाषाशैली, वातावरण, संवाद, कथानक, व्यक्तिचित्रणे या घटकांच्या माध्यमातून सखोल जीवनाचे चित्रण घडविणारी नव–नवीन बदल आत्मसात करणारी साहित्यकृती म्हणजे कादंबरी होय.''

अशा प्रकारे कादंबरीच्या व्याख्या करण्याचा प्रयत्न अनेक संशोधकांनी केला आहे. व्यक्तीचा संपूर्ण जीवनपट मांडण्याची क्षमता तिच्यात असते. विविध विषयांचा वापर त्यामध्ये केलेला असतो. त्याला कोणतेही बंधन नसते.

ब) कादंबरीचे घटक –

मराठी साहित्यामध्ये कथा, कविता, नाटक इत्यादी प्रवाहांबरोबरच कादंबरी हा एक स्वतंत्र वाङ्मय प्रवाह आहे. कादंबरी विषयक सर्व गोष्टींचा विचार करता कादंबरीची निश्चित व्याख्या करता येत नाही असे संशोधकांनी म्हटले आहे. कारण कादंबरीच्या रचनातंत्रात वेळोवेळी बदल होत असतात. परंतु कादंबरीमध्ये असणारे घटक मात्र निश्चित असतात. या घटकांच्या मांडणीवरच कादंबरी आकाराला येते. हे घटक प्रत्येक कादंबरीमध्ये कमी–अधिक प्रमाणात असतात. कादंबरीच्या घटकांवरच कादंबरीचे श्रेष्ठत्व ठरत असते. कादंबरीही तिच्या अंतर्गत असलेल्या सर्व घटकांसह मानवी जीवनाशिवाय वेगळी नसते. त्यामुळे दिडशे वर्षापासून चालत आलेल्या कादंबरीच्या रचनेत काही बदल झाले असले तरी तिचे घटक मात्र बदलले नाहीत. कादंबरी निर्मितीपासून ते घटक आहेत तेच आहेत. कादंबरीमध्ये विस्तृत असा जीवनपट साकारला जात असल्याने कादंबरीच्या दृष्टीने रचनातंत्राचा विचार करता कादंबरीतील कथानक, पात्रे, वातावरण, निवेदनशैली, भाषा, संवाद इत्यादी घटक महत्वाचे मानले जातात. या घटकांमुळेच कादंबरीला पूर्णत्व प्राप्त होते. हे घटक कादंबरीमध्ये कशा पध्दतीने समाविष्ट होतात आणि त्यामुळे कादंबरी कशी साकार होते याचा विचार इथे करावयाचा आहे.

१) कथानक –

कथानक म्हणजे, कादंबरीतील व्यक्तींची विशिष्ट सामाजिक वातावरणात घडलेली कथा होय. कथा, रचना, गुंफण, कौशल्य हे कादंबरीचे अत्यंत महत्त्वाचे घटक आहेत. कथानकामधून निवेदक कादंबरीतील पात्रांचे वागणे, बोलणे त्यांच्या कृतीची उकल करत असतो. कथानकामध्ये अनेक पात्रांच्या जीवनातील प्रसंगांची समाजातील अनेक प्रश्नांची गुंफण केलेली असते. कथानक कसे असावे याविषयी फडके आपले असे मत मांडतात, ''कथानकात गुंतागुंत असली पाहिजे. तिच्यात विस्मयकारक प्रसंगांची चढती श्रेणी हवी व शेवटी उकलही हवी म्हणजे कथानक पूर्ण बंदिस्त असावे.''[७] तसेच कथानकाविषयी

वाङ्मयीन संज्ञा व संकल्पना कोश यामध्ये असे म्हटले आहे. ''कादंबरीतील कृती कोणत्या स्थलकालाच्या अवकाशात घडत आहेत. कादंबरीतील पात्रे काय करीत आहे त्यांचे विचार काय आहेत हे कादंबरीकार सांगत असतो या साऱ्यांची जुळणी करणाऱ्या एकात्म घट्ट विणीलाच कथानक म्हणतात.''[८]

कादंबरीत अनेक विविध प्रसंग एकत्र बांधण्याचा प्रयत्न केलेला असतो. एका प्रसंगातून दुसरा प्रसंग विकसित करून वाचकांची उत्कंठा, कुतुहल जागृत केले जाते. तसेच कादंबरीच्या शेवटी प्रश्नांची उकल करण्याचाही प्रयत्न केला जातो. या संदर्भात, प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी म्हणतात की,''कादंबरीकाराला जे काही सांगायचे असते, ते तो कथानकाद्वारे वाचकांसमोर मांडत असतो. कथानकात घटना प्रसंगांची व व्याप्तीच्या कृती उत्पतीची जुळणी असते.''[९] कादंबरीध्ये लेखक आपल्या भावभावना, अनुभव, समाजातील वास्तव घटना, काल्पनिक घटना, कादंबरीतून कथानकाच्या माध्यमाद्वारे शब्दबध्द करत असतो आणि त्याद्वारे लोकांचे मनोरंजन करत असतो.

कादंबरीतील कथा ही मनोरंजनासाठी असते किंवा कादंबरीकाराला जे काही सांगायचे आहे. ते कथा या घटकाच्या माध्यमातून सांगितले जाते. कथानक लिहिताना मुख्यत: आरंभ, मध्य, शेवट या तीन मुद्यांचा विचार केला जातो. तसेच कथानकाची आकर्षकता वाढविण्यासाठी संभाव्यता, कार्यकारणभाव, कुतुहल, उत्कंठा, हुरहूर, विस्मय, सुसंघटितपणा इत्यादी गुणांचा वापर केला जातो. कादंबरीच्या कथानकामध्ये मुख्य कथानकाबरोबर प्रसंगानुसार उपकथानकही येत असते.

### २) व्यक्तिरेखा –

व्यक्तिरेखा या संज्ञेला स्वभावचित्रण, पात्रचित्रण, व्यक्तिचित्रण अशा पर्यायी संज्ञा वापरल्या जातात. कादंबरीमध्ये कथानकाएवढाच सर्वात महत्त्वाचा घटक म्हणून व्यक्तिरेखांचा विचार केला जातो. लेखक आजूबाजूला घटनांचे सूक्ष्म निरीक्षण करतो. तर काही वेळा काही गोष्टी अनुभवलेल्याही असतात. या सर्व गोष्टींच्या गुणदोषांची पडताळणी करून जुळणी करतो



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

आणि त्यातून काही निवडक व्यक्तीना कलाकृतीमध्ये आणत असतो. त्यांच्या माध्यमातून कथानक निर्माण करतो. या व्यक्तींनाच व्यक्तिरेखा म्हटले जाते. त्यांची निर्मिती कशी होते याविषयी प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी म्हणतात,''कादंबरीकार कल्पनेच्या सहाय्याने पात्राची नवनिर्मिती करतात आणि प्रतिभेच्या बळावर पात्रांचे अंत:करण उघडे करून दाखवितात. पात्रांच्या बाह्यदर्शनापेक्षा अंतदर्शनाला कादंबरीकाराचा खरा कस लागतो.''[१०]

कादंबरीकार हा कादंबरी फक्त कथानकाने मांडू शकत नाही तर घटनांच्या माध्यमातून कथानक पुढे सरकते. या घटनांची निर्मिती करण्यासाठी पात्रे आवश्यक असतात. कथानकातील घटना या व्यक्तींच्या स्वभावातून साकार होत असतात. कादंबरीच्या कथानकाला गती देण्याचे काम कादंबरीतील पात्रे करतात. कादंबरी म्हटलं की त्यात व्यक्तींचे जाळे असतेच. अनेक पात्रे कादंबरीमध्ये वावरतात. त्यातील काही मुख्य तर काही गौण असतात. पुरूष पात्रांबरोबर कादंबरीत स्त्री पात्रेही वावरत असतात. कादंबरीत पात्रे आली की त्यांच्याबरोबर पात्रचित्रणही पाठोपाठ येते. यालाच व्यक्तिरेखा म्हटले जाते. या संदर्भात प्रा. डॉ. माधव बसवते म्हणतात,''कादंबरीतल पात्रांच्या प्रकारात अंतर्मुख व बर्हिमुख पात्रांबरोबर मुख्य व गौण पात्रे यांचा समावेश होतो. वर्णन, प्रसंग, संवाद, निवेदनशैली स्वभाषण या पात्र निर्मितीच्या प्रक्रियेतून कादंबरीकार या पात्रांची निर्मिती करत असतो.''[११] तसेच बालशंकर देशपांडे यांच्या मते, ''ज्यांचा कथानकाशी सुतराम संबंध नाही अशा पात्रांची नुसती भाऊगर्दी कादंबरीची रंगत घालवून बसते. एखाद्याला व्यक्तिरेखांची कला चांगली साधलेली असते. पण त्याचे व्यक्तिचित्रण कितीही आकर्षक असले तरी कादंबरीच्या कथानकाशी त्याचा प्रत्यक्षाप्रत्यक्ष काहीच संबंध नसेल तर त्याच्या कौशल्याचा तेथे काही एक उपयोग नसतो. उलट वृक्षातला जीवनरस शोषून येणाऱ्या बांडगुळासारखी ती पात्रे रसहानीकारक ठरतात.''[(१२)]

व्यक्तिचित्रण म्हणजे त्या व्यक्तिचे अंतर्बाह्य वर्णन केले जाते. प्रत्येक व्यक्तिचे स्वत:चे असे वेगळे वैशिष्ट्य असते. या वैशिष्ट्यामुळे कादंबरीमध्ये नायक–नायिका–खलनायक अशा वेगवेगळ्या स्वरूपाची व्यक्तिचित्रणे वावरत असतात. या व्यक्तिरेखांच्या माध्यमातून कादंबरी नावारूपाला येते. कादंबरीला गती, वळण मिळते. तसेच त्यात चैतन्य निर्माण होते. सशक्त व्यक्तिचित्रणावरच या कादंबरीचे यश अवलंबून असते.

३) निवेदन –

कादंबरीमध्ये परिणामकारकता साधण्यासाठी कादंबरीकार वेगवेगळ्या निवेदन तंत्राचा वापर करीत असतो. मग हे निवेदन म्हणजे नेमके काय? ते कसे तयार होते ? याविषयी डॉ. माधव बसवते म्हणतात,''एकानंतर एक घटना सांगत जाणे म्हणजे निवेदन होय.''[१३]

कादंबरीतील कथानक, संवाद, व्यक्तीच्या मुखातून वाचकाला सांगितले जातात. या सांगण्याच्या प्रक्रियेलाच निवेदन असे म्हणतात. गतीमान निवेदन हे कथानकाला पुढे जाण्यास मदत करते. कथन, वर्णन, भाष्य आणि संवाद या चार प्रकारातून निवेदन आकारास येत असते. कादंबरीचा समग्र पट हा निवेदनातून वाचकांसमोर उलगडला जातो. निवेदक हा कादंबरीतील आशयाचा वाहक असून तो निवेदनाचा वापर आपल्या सामर्थ्यानुसार करीत असतो. निवेदनासाठी लेखक भाषेचा माध्यम म्हणून वापर करीत असतो. त्यासाठी कधी प्रमाण भाषा तर कधी बोलीभाषा उपयोगात आणली जाते. निवेदन तंत्रविषयी उषा हस्तक म्हणतात, ''कादंबरीचा समग्र पट तिच्या निवेदनातून आपल्यासमोर उलगडत असतो. त्यामुळे साहजिकच तिचे निवेदनही अद्वातद्वा पध्दतीने केलेले नसते. ह्या पटाची एकात्मता प्रत्ययाला आणून देण्याचे कार्य 'निवेदन'लाच पार पाडावे लागते. कादंबरीचा समग्र पट एकात्म करण्याच्या दृष्टीने तिच्या निवेदनाला आरंभापासून अंतापर्यनत निश्चित असे सूत्र असावे लागते.''[१४]

कादंबरीमध्ये परिणामकारकता साधण्यासाठी कादंबरीकार वेगवेगळ्या निवेदनतंत्राचा वापर करीत असतो. त्यामध्ये निवेदन हे प्रथमपुरूषी निवेदन, आत्मलक्षी निवेदन, तृतीयपुरूषी निवेदन, सर्वसाक्षी निवेदन, पत्रात्मक निवेदन किंवा दैनंदिनी या स्वरूपाचे असते. या सर्व निवेदन पध्दतीपैकी प्रामुख्याने जास्तीत जास्त प्रथम पुरूषी निवेदन आणि तृतीयपुरूषी निवेदन या दोन निवेदन पध्दतीचा वापर केला जातो. कादंबरीतील कोणतेही पात्र स्वत: होऊन सर्व हकीकत सांगत असतो. तेव्हा त्यास प्रथमपुरूषी निवेदन म्हणतात. नायक आणि नायिका यांच्यापैकी कोणाला तरी केंद्रस्थानी कल्पून त्याच्या भोवती कादंबरीतील लहानसहान प्रसंगांची गुंफण केलेली असते. तृतीयपुरूषी निवेदनामध्ये लेखक

त्रयस्थाशी भूमिका स्वीकारून सर्व प्रसंग स्वत: वर्णन करून सांगत असतो. म्हणजे कादंबरीतील कोणतीही व्यक्ती निवेदन करीत नाही. त्यामध्ये प्रत्यक्ष निवेदक नसतो तर तो अदृश्य स्वरूपात असतो. लेखक अनुभवी असेल तर वरीलपैकी कोणतीही निवेदनपध्दती वापरून कादंबरीत रंजकता आणू शकतो.

### ३) वातावरण –

कथानकाची रंगत वाढविण्यासाठी ज्या ज्या घटकांचा विशेष उपयोग होत असतो. त्यामध्ये वातावरणनिर्मिती हा ही घटक महत्वाचा मानला जातो. कथानकाच्या ओघात आनंदाचे, दु:खाचे, विमनस्कतेचे अनेक प्रसंग निर्माण होतात. त्या त्या प्रसंगांची परिणामकारकता वाढविण्यासाठी वातावरण निर्मितीचा उपयोग होत असतो. कोणते वातावरण प्रसंगाला निर्माण करावयाचे हे सर्वस्वी लेखकांवर अवलंबून असते. कादंबरीत वातावरण निर्मिती कशी होते याविषयी प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी म्हणतात,''कादंबरीतील घटना प्रसंगाला वास्तवता, अस्सलता प्रदान करून त्यांचे रहस्य उलगडण्याचे कार्य वातावरणाला करावे लागते. कादंबरीतील घटना विशिष्ट स्थळी घडत असते. ज्यातून स्थलनिष्ठ वातावरण निर्माण होते. स्थलवाचक, भूप्रदेश निसर्ग व भौगोलिक परिस्थिती यांचा स्थलनिष्ठ वातावरणात समावेश होतो.''[१५]

मराठी कादंबरीतील वातावरण हा घटक कथानक व व्यक्तिरेखा यांच्यापेक्षा गौण असला तरी कादंबरी रचनेतील त्याचे स्थान महत्त्वपूर्ण असते. वातावरणनिर्मितीमुळेच कादंबरीतील कथानक व व्यक्तिरेखा उठावदार होतात. वातावरणाची पार्श्वभूमी जितकी उठावदार असते. तितकी कादंबरी परिणामकारक ठरत असते. वातावरण या घटकाद्वारे कादंबरीचे प्रादेशिक, दलित, ग्रामीण असे वर्गीकरण केले जाते. याविषयी प्रा. डॉ. माधव बसवते म्हणतात,'' भौगोलिक, सामाजिक, ऐतिहासिक, स्थल, काल आणि लेखकाचा दृष्टिकोन या घटकांच्या आधारे कादंबरीमध्ये वातावरण प्रतिबिंबीत होत असते.''[१६] वातावरण आणि पार्श्वभूमी यांचा विचार करताना स्थलविषयक, कालनिष्ठ व सामाजिक पार्श्वभूमीचा विचार

महत्त्वाचा वाटतो. याविषयी प्रा. बापट गोडबोले म्हणतात, ''चित्रकलेमध्ये पार्श्वभूमीचे जे कार्य तेच कादंबरीत वातावरणाचे आहे. चित्रातील पार्श्वभूमीने त्या चित्रातील देखाव्यास जसा एक प्रकारचा उठाव मिळतो. इतकेच नव्हे तर चित्रातील विशिष्ट प्रसंगांचे मर्म कळण्यास जशी मदत होते. तसेच कादंबरीतील वातावरण हे कथानक व व्यक्तिदर्शन यातील रहस्य उलगडण्यास उपकारक ठरते.''[१७] चित्रकार हा चित्र काढत असताना त्याचित्रीत पार्श्वभूमीमुळे चित्राला उठावदारपणा प्राप्त होतो. यामुळेच चित्र आकर्षक बनते. त्याप्रमाणेच लेखक कादंबरीत जी वातावरणनिर्मिती करत असतो. त्यातून कथानक व व्यक्तिचित्रणातील गुढ, रहस्य उकलण्यासाठी वातावरणाची मदत होते. कादंबरीमध्ये भूत–वर्तमान–भविष्य या तीनही काळांचा वापर केला जातो. कादंबरीमध्ये वातावरणामुळे कादंबरीतील प्रसंग जीवंत करण्यासाठी मदत होते.

### ४) भाषाशैली –

कादंबरीच्या रचनेमध्ये भाषा हा महत्वाचा घटक आहे. भाषेच्या माध्यमातून कादंबरीमध्ये लेखकाचे विचार भावना व्यक्त होत असतात. भाषेच्या माध्यमातून साहित्याची निर्मिती होत असते, म्हणून भाषा ही निर्मितीशील असते. लेखकांना ही भाषा नेमकी कशी अवगत होते याविषयी उषा हस्तक म्हणतात,''कादंबरीकारकाला लाभलेला विशिष्ट वारसा ह्या भाषेची वैशिष्ट्यपूर्ण घडण त्याच्या काळात अस्तित्वात असणारे व्यवहारिक वाङ्मयीन भाषेचे स्वरूप, बालवयापासून त्याच्यावर झालेले भाषेचे संस्कार, त्यांची भाषाविषयक संवेदनशीलता, भाषेच्या वाङ्मयीन रूपासंबंधी त्याने केलेले परिशीलन ह्या सर्वांच्या परिपाकातून त्याची स्वत:ची भाषा घडत असते.''[१८] लेखक याच भाषेचा वापर निवेदनासाठी कादंबरीमध्ये करत असतात.

भाषाशैलीवरती कादंबरीची परिणामकारकता अवलंबून असते. कादंबरीमध्ये लेखकाची निवेदनाची भाषा वेगळी व संवादाची भाषा वेगळी असते. काहीवेळा निवेदनाची, संवादाची दोन्ही भाषा सारख्याच असतात. कादंबरी हा वास्तवोन्मुख साहित्यप्रकार

असल्याने पात्रांच्या तोंडी येणारी भाषा ही जास्तीत जास्त वास्तव व्यवहाराच्या जवळची असावी लागते. कादंबरीच्या वेगवेगळ्या प्रकारातल्या भाषेत भिन्नत्व असते. ऐतिहासिक कादंबरी म्हटले की इतिहासाचे तपशील, घटना, संदर्भ यांचे वर्णन करताना पात्रांच्या तोंडी ऐतिहासिक भाषाच असावी. ग्रामीण कादंबरी म्हटलं की ग्रामीण भाषेचा वापर असावा तरच कादंबरी परिणामकारक होते. जर ऐतिहासिक कादंबरीत ग्रामीण भाषा, ग्रामीण कादंबरीला नागर भाषा मांडली तर कादंबरीला विचित्र स्वरूप प्राप्त होईल. कादंबरीच्या मांडणीत काळानुसार जसे बदल होत गेले तसे तिच्या भाषेतही बदल झाले. प्रत्येक कालखंडात कादंबरीच्या भाषेचे स्वरूप बदललेले दिसते.

भाषाशैली संदर्भात फडके म्हणतात, ''भाषाशैली म्हणून ज्याला आपण म्हणतो ते दुसरे काही नसून भाषेतील सहजपणा होय. लेखक जेव्हा लीलेने लिहितो असा प्रत्यय वाचकाला येतो तेव्हाच भाषेत शैलीचा धर्म आहे असे पटते.''[१९] प्रत्येक व्यक्तीची भाषा वेगळी असते. स्थल, काल, जात, धर्म इ. घटकानुसार ती बदलते. प्रत्येक लेखकाची स्वत:ची स्वतंत्र शैली असते. या शैलीच्या माध्यमातून तो कादंबरीतील पात्रांची भाषा आपल्या भाषा सामर्थ्याच्या बळावर शब्दबध्द करत असतो आणि पात्रांना कादंबरीमध्ये उठावदारपणा देत असतो. भाषेविषयी डॉ. शरणकुमार लिंबाळे म्हणतात,''भाषा हे साहित्याचे साधन आहे. मानवी भावभावना व्यक्त करण्यासाठी आपली सुख–दु:खे मांडण्यासाठी आणि आपल्या जीवनातील संघर्ष सांगण्यासाठी भाषेसारखे दुसरे साधन नाही. स्थानिक शब्द, त्याचा शब्दप्रयोग, त्यांची लय, संवादाची पध्दत आणि खास शैलीतील निवेदन यातून भाषा नटते. त्या नटण्यातून विविध छटा प्रकट होतात.''[२०]

काही लेखकांचे लेखन त्यांच्या लिहिण्याच्या शैलीमुळे लगेच ओळखते. एखादा परिच्छेद वाचल्यानंतर तो परिच्छेद कोणत्या लेखकाचा आहे हे लक्षात येते. कशावरून तर त्यांच्या लिहिण्याच्या विशिष्ट शैलीमुळे उदा. फडके, ह. ना. आपटे, वि. स. खांडेकर, व्यंकटेश माडगुळकर इत्यादीनी साहित्याच्या प्रकारानुसार साहित्यामध्ये भाषेचा वापर केलेला असतो. भाषा परिणामकारक वाचनीय व्हावी म्हणून त्यामध्ये म्हणी, वाक्प्रचार, उपमा, अलंकार इत्यादीचा वापर करून भाषा समृध्द केली जाते. हेच खरे भाषेचे श्रेष्ठत्व आहे.

## क) मराठी कादंबरीची वाटचाल

### १) मराठी कादंबरी – इ.स १८४१ ते १८८५

मराठी कादंबरीचा पूर्वइतिहासात मराठीतील पहिली कादंबरी म्हणून कोणत्या ग्रंथाचा उल्लेख करावा असा प्रश्न पडतो. परंतु संशोधनाअंती 'यमुना पर्यटन' या कादंबरीलाच पहिल्या कादंबरीचा मान मिळाला आहे. १८४१ मध्ये हरि केशवजी यांनी 'जॉन बनियन' यांच्या 'पिलग्रीम प्रोग्रेस' या धार्मिक कादंबरीचा अनुवाद 'यांत्रिकक्रमण' म्हणून केलेला आहे. ही मराठीतील पहिली कादंबरी म्हणून उल्लेखिता येईल परंतु ती अनुवादित आहे. म्हणून बाबा पद्मनजी यांनी १८५७ साली लिहिलेला 'यमुना पर्यटन' या कादंबरीचा मराठीतील पहिली स्वतंत्र सामाजिक कादंबरी म्हणून उल्लेख केला जातो. या कादंबरीमध्ये विधवा स्त्रियांच्या दु:खस्थितीचे चित्रण केलेले आहे. या कादंबरीला पहिल्या कादंबरीचा मान देण्याविषयीही अनेक संशोधकांच्यात मतभेद आहेत. त्यापैकी ल. म. भिंगारे म्हणतात, ''विधवांचा प्रश्न आणि धर्मांतराचा प्रश्न या दोहोंची सांधेजोड म्हणा की गल्लत म्हणा बाबांनी या पुस्तकात केली आहे. त्यामुळे या पुस्तकाला एक प्रकारे ख्रिस्ती प्रचाराचे स्वरूप आले आहे. बहुधा याच कारणामुळे वाचक आणि वाङ्मय विवेचक यांच्या मनात या पुस्तकाच्या स्थानाविषयी शंका उद्भवली.''[२१] तसेच डॉ. रवींद्र ठाकूर यांनीही कादंबरीच्या आद्यत्वाबद्दल असे मत व्यक्त केले आहे. ''खरे तर या कादंबरीतील विषय अप्रिय असला तरी ही कादंबरी मराठी सामीक्षकांनी पहिली कादंबरी ठरवली आहे.''[२२]

यानंतर, लक्ष्मणशास्त्री हळबे यांची १८६१ साली प्रसिध्द झालेली 'मुक्तामाला' ही मराठीतील पहिली अद्भूतरम्य व घटनाप्रधान कादंबरी आहे. साहित्य क्षेत्रात आपले वेगळेपण सिद्ध करताना ही कादंबरी दिसते. काही टीकाकारांनी 'मुक्तामालेला' मराठीतील पहिल्या कादंबरीचा मान दिला आहे. त्यापैकी ल. म. भिंगारे यांनी, ''मुक्तामालेला' मराठीतील पहिली युगप्रवर्तक कादंबरी म्हटले आहे.''[२३] तसेच नरहर कुरूंदकर यांनीही, ''मुक्तामालेला कादंबरीचा पूर्ण आकार असणारी पहिली कथा असे म्हटले आहे.''[२४] असे असले तरीही कालमानाचा विचार करता 'यमुना पर्यटन' हीच मराठीतील पहिली कादंबरी ठरते. याविषयी

कुसुमावती देशपांडे म्हणतात,''मराठीतल्या पहिल्या कादंबरीचे स्वरूप खात्रीनेच इतके महत्त्वपूर्ण आहे की तिची साक्षपाने चर्चा व्हावी. तिच्या ख्रिस्ती वळणाच्या भाषेबद्दल व ख्रिस्ती धर्माच्या पुरस्काराबद्दल वाचकांना उद्वेग वाटणे व त्यामुळे लोकप्रियतेला बाधा येणे स्वाभाविक होते.''[२५] 'यमुनापर्यटन' या पहिल्या कादंबरीची लोकप्रियता न वाढविण्याच्या कारणाविषयी वि. ह. कुलकर्णी म्हणतात की, ''यमुनापर्यटन या कादंबरीत विधवांच्या अनुकंपनीय स्थितीचे वर्णन करण्यात आले होते हे जरी खरे तथापि ही कादंबरी लिहिण्यात बाबा पद्मनजी यांचा मुख्य हेतू हिंदू धर्माची वाईट व ख्रिस्ती धर्माची तरफदारी करण्यात होता.''[२६] थोडक्यात ख्रिस्ती धर्माला दिलेले महत्त व हे या कादंबरीची लोकप्रियता न वाढविण्याचे कारण आहे.

मुक्तामाला ही कादंबरी वाचकाला खिळवून ठेवणारी अत्यंत लोकप्रिय अशी रंजनवादी कादंबरी आहे. मुक्तामाला ही कादंबरी एवढी लोकप्रिय झाली की त्यामुळेच मुक्तामाला स्वरूपाच्या अनेक कादंबऱ्यांची निर्मिती या काळात झाली. हळबेशास्त्री यांची दुसरी कादंबरी म्हणजे 'रत्नप्रभा' १८६६ साली प्रसिध्द झाली. मुक्तामालेच्या आधी ही कादंबरी लिहिली असूनही मुक्तामालेनंतर ती प्रसिध्द झाली. ही कादंबरी मुक्तामालेच्या वळणाची आहे. या कादंबरीचे महत्त्वाचे विशेष म्हणजे पुनर्विवाहाला दिलेले स्थान हे होय.

हळबे शास्त्री यांच्या 'मुक्तामाला' या कादंबरीने रंजनपर कादंबरीची मोठी परंपराच निर्माण केली आहे. त्यांच्या परंपरेचे अनुकरण करून निर्माण झालेल्या महत्वाच्या कादंबऱ्या म्हणजे नारो सदाशिव रिसबुड यांच्या कादंबऱ्या होय. त्यामध्ये त्यांनी 'मंघुघोषा' १८६८, 'विश्वासराव' १९७०, 'वसंतकोकिळा' १८७६ इ. कादंबऱ्या 'मुक्तामाला' कादंबरीच्या वळणाच्या आहेत. या संदर्भात कुसुमावती देशपांडे म्हणतात, ''मंजुघोषा ही मुक्तामालेची प्रतिकृती.''[२७] 'मंजुघोषा' ही कादंबरी 'मुक्तामालेचे' सर्व गुण आत्मसात करून तिच्या पुढचे एक पाऊस टाकताना दिसते. 'विश्वासराव' ही कादंबरी सामाजिक मानली जात असली तरी इतर अद्भूत कादंबऱ्यातील नायकांप्रमाणेच विश्वासराव आहेत. त्यामुळे ही अद्भूततेकडे झुकणारी कादंबरी ठरते.

मुक्तामालादी कादंबऱ्यांचा आदर्श समोर ठेवून याच कालखंडात लेखन करणारे कादंबरीकार म्हणजे केशव लक्ष्मण जोरवेकर. यांची लोकप्रियता कादंबरी 'विचित्रपूरी' १८७० होय.

अण्णा मार्तंड जोशी, विनायक परशुराम बाबरे या दोघांनी लिहिलेली 'चंपकमाला' ही कादंबरी तसेच पांडुरंग गोविंद पारखी यांची 'मित्रचंद्र' १८८० रामचंद्र आबाजी राजे यांची 'विलासिनी' या कादंबऱ्या याच स्वरूपाच्या आहेत. ठराविक पध्दतीची गुंतागुंत आणि शेवट तिची उकल होऊन शेवट गोड होणे या स्वरूपाच्या या कादंबऱ्या आहेत.

वामन कृष्ण देशमुख यांची 'सुहास्यवंदना' ही कादंबरी याच काळात लिहिली गेली. जनार्दन सखाराम शास्त्री व दामोदर बापूजी नाईक यांनी 'सुवर्णमालिनी' ही कादंबरी लिहिली. मराठी कादंबरीच्या या प्राथमिक अवस्थेतही साळूबाई तांबवेकर या लेखिकेने आपली लेखणी या प्रकारात गाजवून आपल्या कादंबरीतून त्यांनी शृंगाररसाची उधळण केलेली आहे. 'चंद्रप्रभाविरहवर्णन' १८७३ ही त्यांची कादंबरी एक उल्लेखनीय कादंबरी म्हणावी लागेल. नारायण दामोदर योगी यांची 'प्रेमबंधन' पांडुरंग गोविंद पारखी यांची 'मित्रचंद्र', वा. रा. सोहनी यांनी 'पीयूषभाषिणी' व 'मंदिरा-मंदिरा' अ. के. दप्तरदार यांची 'राजपुत्र', 'राजहंस' या कादंबऱ्याही कमी अधिक स्वरूपात याच प्रकारच्या आहेत.

प्रस्तुत कालखंडामध्ये अद्‌भूत कादंबरीच्या बहाराच्या काळात सामाजिक कादंबरी पूर्णपणे लोप पावली होती असे नाही. ती संथ गतीने वाटचाल करत होती. अशा प्रकारच्या कादंबऱ्यांमध्ये अद्‌भूत व वास्तविक यांचे मिश्रण काहीमध्ये सामाजिक, ऐतिहासिक घटनांशी संबंध असलेले अद्‌भूतरम्य असे स्वरूप होते. मोरोबा कोन्होबा विजयनगर यांची 'घाशीराम कोतवाल', १८६३ ही ऐतिहासिक म्हणता येईल. रा. भि. गुंजीकर यांची 'मोचनगड' १८७१, वि. ज. पटवर्धन यांची 'हंबीरराव', 'हंबीरराव पुतळाबाई' १८७५, गणेश महादेव लिमये यांची 'वेणू' १८८६ इत्यादी ऐतिहासिक कादंबऱ्या या कालखंडामध्ये लिहिल्या गेल्या. रामकृष्ण बळवंत नाईक यांची 'काळपुरूष' १८८६ तर 'नाहीच ना ऐकायचं' यात सामान्य जीवन व अद्‌भूत रोमहर्षक प्रसंग यांचा मेळ घातला आहे. बळवंत मनोहर पंडित यांची 'सुशिलायमुना' वासुदेव बळवंत फडके यांची 'बंडाची धामधूम', 'लक्ष्मी आणि सरस्वती' या कादंबऱ्या सामाजिक आणि ऐतिहासिक सीमारेषेवर आहेत.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

या कालखंडामध्ये ऐतिहासिक कादंबऱ्यांबरोबर सामाजिक कादंबऱ्याही अस्तित्वात होत्या. 'यमुनापर्यटन' नंतरची सामाजिक कादंबरी म्हणून वि. का. ओक यांची 'शिरस्तेदार' १८८१ या कादंबरीचा उल्लेख करावा लागेल. भानु केशव गांगनाईक यांची 'वधुदर्पणमाला'. सामाजिक कादंबऱ्यांच्या परंपरेमध्ये 'नारायण आणि गोदावरी' ही अत्यंत महत्वाची कादंबरी समजली जाते. अनेक वाङ्मय इतिहासकारांनी मराठीतील पहिली सामाजिक कादंबरी म्हणून हिचा आवर्जून उल्लेख केला आहे. परंतु प्रत्यक्षात या कादंबरीचे स्वरूप खूप वेगळे आहे. स्त्रियांचे प्रश्न ही त्या काळातील एक ज्वलंत समस्या होती. विधवांच्या जीवनाचे वास्तव चित्रण त्यांनी शब्दबध्द केले आहे. सखाराम हरी गोलतकारांनी 'भावाचे बोल' अथवा 'मालिनीबाईचा संसार' के. रघुनाथजी यांची 'वीरपत्नी' १८८३ या कादंबऱ्या याच स्वरूपाच्या आहेत.

या कालखंडात अनेक लेखकांनी कादंबऱ्या लिहिल्या असल्या तरी त्यांच्यावर 'मुक्तामालादी' कादंबऱ्यांचा प्रभाव अधिक जाणवतो. या कालखंडातील लेखकांनी यापेक्षा वेगळी वाट शोधण्याचा प्रयत्न केलेला दिसत नाही. अशा स्वरूपाच्या कादंबऱ्यांची निर्मिती ही जवळ जवळ एकोणीसाव्या शतकाच्या अखेरपर्यंत चालू राहिली. 'मदनमंजिरी', 'शृंगारमंजरी', 'मदनबाण व पुष्पावती' इत्यादी कादंबऱ्यांच्या नावावरूनच त्यांच्या श्रृंगारिक कृत्रिम व अद्भूतरम्य प्रकृतीची कल्पना येते. या कादंबरीच्या प्रवृत्तीमध्येही विविधता दिसून येते. तिचा एक प्रवाह अद्भुतरम्य, अलंकारप्रचुर व सामाजिक ध्येयवादाने प्रेरित झालेला होता.

### २) इ. स. १८८५ ते १९२०

हरिभाऊ आपटे यांचे नाव मराठी साहित्यामध्ये मराठी कादंबरीचा पाया घालणारे कादंबरीकार म्हणून आदराने घेतले जाते. हरिभाऊंचे युग हे ध्येयवादाचे युग होते. महाराष्ट्रातील ज्ञानप्रसाराचा तो प्रारंभकाळ होता. हरिभाऊंनी ऐतिहासिक, सामाजिक, रंजनवादी अशा अनेक प्रकारच्या कादंबऱ्या लिहून तो कालखंड समृद्ध केला. प्रस्तुत कालखंडच त्यांच्या नावाने ओळखला जातो एवढा त्यांच्या लेखनाचा प्रभाव त्या कालखंडावर होताच. यानंतरच्या कालखंडाच्या सुरूवातीलाही हरिभाऊंच्या लेखनाचा प्रभाव जाणवतो.

हरिभाऊंनी आपल्या पंचावन्न वर्षांच्या आयुष्यात, म्हणजे इ.स. १८८५ ते १९१५ या कालखंडात लेखन केले. या एवढ्याशा लेखनकाळात सामाजिक, वास्तववादी आणि ऐतिहासिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. काही कादंबऱ्या त्यांच्या अपूर्णही राहिल्या. इतर लेखनही हरिभाऊंनी केलेले असले तरी हरिभाऊ कादंबरीकार म्हणूनच परंपरेत आहेत. आपल्या लेखनामुळे हरिभाऊंनी कादंबरी लेखनाने प्रचंड लोकप्रियता मिळवली. ह. ना. आपटे यांच्याविषयी रवींद्र ठाकूर म्हणतात, ''ह. ना. आपटे हे ध्येयवादी सुधारक तसेच एक अव्वल दर्जाचे संवेदनशील कलावंतही आहेत. इंग्रजी कादंबरीचे संस्कार पचवून वास्तवाला सामोरी जाणारी वास्तववादी मराठी कादंबरी हरिभाऊंनी घडवली. त्यांनी इंग्रजी कादंबरीचा संस्कार स्वीकारला पण तिचे अनुकरण मात्र केले नाही. वास्तवाशी प्रामाणिक राहून कादंबरी लिहिणारा त्यांच्यासारखा दुसरा कलावंत निदान त्या काळात तरी दाखवता येणार नाही.''[२८]

'यमुनापर्यटन' नंतरची पहिली सामाजिक कादंबरी म्हणजे हरिभाऊंची 'मधली स्थिती' १८८५ ही पहिली सामाजिक कादंबरी आहे. म्हणून या विषयी रवींद्र ठाकूर म्हणतात, ''बाबा पद्मनजी यांच्यानंतर मराठी कादंबरीला हरिभाऊंनीच ज्वलंत समाज वास्तवाचा स्पर्श घडवला.''[२९] 'मधली स्थिती' १८८५ या कादंबरीमध्ये स्त्रियांची किती कुचंबना होते याचे हृदयद्रावक चित्रण आले आहे. यानंतर त्यांनी 'गणपतराव' (अपूर्ण) १८८७, 'मी यशवंतराव खरे' १८९५, 'जग हे असे आहे', 'पण लक्षात कोण घेतो' १८९३, 'मायेचा बाजार', 'कर्मयोग', 'आजच' (अपूर्ण) इत्यादि कादंबऱ्यांमधून तत्कालीन वास्तव समाजस्थितीचे दुष्ट रूढी परंपरेचे, स्त्रियांच्या अत्याचाराचे, दास्याचे, दुःखद स्थिती, व्यक्ती आणि कुटुंब समाज यांच्यातील ताणतणाव याचे अतिशय परिणामकारक चित्रण रेखाटले आहे.

सामाजिक कादंबऱ्याबरोबर हरिभाऊंनी ऐतिहासिक कादंबऱ्याही लिहिल्या. सामाजिक कादंबरीतून हरिभाऊ ऐतिहासिक कादंबरीकडे का वळले याविषयी डॉ. द. भि. कुलकर्णी म्हणतात, ''हरिभाऊंचा सामाजिक विचार संपुष्टात आला होता. इतिहास संशोधन व इतिहास प्रेम यांना राष्ट्रवादी विचारामुळे चालना मिळाली होती. हरिभाऊंनी सामाजिक कादंबरीतून सुधारणावाद आणि ऐतिहासिक कादंबऱ्यातून राष्ट्रवाद सांगितला इ. अनेक प्रकारातून हरिभाऊंच्या ऐतिहासिक कादंबरीलेखनाची मीमांसा झाली आहे.''[३०]

मडोज टेलरच्या 'टिपू सुलतान' या कादंबरीचा अनुवाद करून हरिभाऊंनी आपल्या ऐतिहासिक कादंबरी लेखनास प्रारंभ केला. हरिभाऊ हे घडलेल्या इतिहासाला दंतकथांची जोड देऊन त्या कथा रंजक बनवतात आणि त्यातून आपली कादंबरी साकार करतात. 'उष:काल', 'सूर्योदय', 'सूर्यग्रहण', 'केवळ स्वराज्यासाठी', 'गड आला पण सिंह गेला' या कादंबऱ्यातून त्यांनी शिवकालीन इतिहास शब्दबध्द केला आहे तर 'म्हैसूरचा वाघ', 'रूपनगरची राजकन्या', 'वज्राघात' या कादंबऱ्यात महाराष्ट्राबाहेरील इतिहासाची पार्श्वभूमी आहे. 'चंद्रगुप्त', 'सूर्यग्रहण', 'कालकूट' या कादंबऱ्या त्यांच्या अपूर्ण राहिल्या. या कादंबऱ्यामधून त्यांनी सत्याभास निर्माण करून वाचकांना स्वातंत्र्याचा संदेश देण्याचे महत्वपूर्ण कार्य केले. 'पण लक्षात कोण घेतो' ही त्यांची सर्वोत्कृष्ट कादंबरी आहे. कादंबरीच्या ज्या संकल्पना आहेत. त्या सवर संकल्पना त्यांच्या या कादंबरीत आढळतात.

हरिभाऊंच्या काळात मराठी कादंबरीला प्रतिष्ठा आणि लोकप्रियता मिळाल्यामुळे या काळात अनेक कादंबरी माला उदयाला आल्या. मकरंद पुस्तकमाला, भारत गौरव पुस्तकमाला, ज्ञानमित्रपुस्तकमाला, कुटुंबशिक्षण पुस्तकमाला इत्यादी कादंबरीमालामधून उद्देश समोर ठेवून या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. या कादंबरीमाला पुढे अनेक वर्षे सुरू होत्या.

बाळकृष्ण संतुराम गडकरी यांनी 'सुधारणेचा मध्यकाल', 'दुर्दैवी प्रेमयोग', 'पुष्पमाला', 'मूर्खाचा शहाणा' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. गडकऱ्यांची कादंबरी म्हणजे एखादा विषय मनाशी निश्चित करून कादंबरीचे लेखन करावे आणि त्यातून काही तरी बोधपर संदेश द्यावा असे आहे. बा. स. गडकरी यांना विदर्भाचे हरिभाऊ म्हणून ओळखले जाते.

सहकारी कृष्ण यांनीही 'प्रेमाची मूस की पुरूषार्थाची कूस' 'माझी कहाणी', 'मानापमान', 'संक्रांत', 'आधुनिक स्वयंवर', 'चैत्राचा महिना' इ. कादंबऱ्या लिहिल्या आहेत. त्यांच्या कादंबऱ्याचे स्वरूप कुटुंबकथा आहे. त्यांच्या सामाजिक कादंबऱ्यामधून बोधवादी दृष्टिकोन स्पष्ट होतो. सहकारी कृष्ण हे सुधारणावादी मतप्रणालीचे लेखक असून स्त्रियांनी शिकावे पण परंपरेने आलेली जबाबदारी सांभाळून शिकावे या मताचे होते. सामाजिक कादंबऱ्याबरोबर 'राजकुंवर', 'शापित महाराष्ट्र' या ऐतिहासिक कादंबऱ्याही लिहिल्या. या कादंबऱ्यामधून शिवाजी महाराजांच्या मृत्यूनंतरच्या काळातील इतिहासाची पार्श्वभूमी आहे.

नाथमाधव ऊर्फ द्वारकानाथ माधवराव चितळे यांनी 'प्रेमवेडा', 'बंगल्यातील पहिले गुप्त मंडळ', 'हेमचंद्र रोहिणी', 'मद्यपान निषेधक श्रीनिवासराव', 'रायक्लब अथवा सोनेरी टोळी', 'विमलेची ग्रहदशा' इ. सामाजिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत. डॉक्टर या कादंबरीत त्यांनी स्त्री शिक्षणाचा प्रश्न मांडला आहे. विहंगवृंद मध्ये स्त्री शिक्षण, पुनर्विवाह, प्रौढविवाह इ. तत्कालीन सामाजिक प्रश्नांचा ऊहापोह येतो. नाथमाधवांनी तरूण राजपुत्र सरदार, स्वराज्यमाला ही शिवशाहीचा इतिहास रेखाटणारी तसेच 'सावळ्या तांडेल' ही इ. स. १९०८ साली प्रसिध्द झालेली मराठीतील पहिली आरमारविषयक कादंबरी लिहिली. 'स्वराज्याचा श्रीगणेशा', 'स्वराज्याचे परिवर्तन', 'स्वराज्यातील दुफळी' तसेच रेनॉल्डस्च्या 'केनेथ' या कादंबरीवर आधारलेली 'वीरधवल' कादंबरी त्यांनी लिहिली आहे.

प्रभाकर श्री. भिसे यांनी भारतगौरव ग्रंथमालेतून काही कादंबऱ्या लिहिल्या आहेत. 'प्रेममंदिर' या कादंबरीतून अध्यात्म हा विषय शब्दबध्द केला आहे. 'रजनी' या कादंबरीतून आंधळ्यांच्या जीवनाचा वेध घेण्याचा प्रयत्न केला आहे. 'समाजकंटक अथवा वेणू', 'कर्मफल', 'प्रणयपंक' इ. सामाजिक कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. तसेच 'रजनी' या बंकिमचंद्रांच्या कादंबरीचे मराठी रूपांतर केले आहे.

का. र. मित्र हे या काळातील विपुल लेखन करणारे लेखक आणि मनोरंजन या मासिकाचे संपादक आहेत. त्यांनी अनेक बंगाली कादंबऱ्यांची भाषांतरे केली आहेत.

विठ्ठल सिताराम गुर्जर यांना या काळातील बंगाली कादंबऱ्यांचे यशस्वी अनुवादक म्हणून ओळखले जाते. त्यांनी रमेशचंद्र दत्त यांच्या कादंबरीवरून 'जीवनसंध्या', 'नन्नीहाल', बंडोपाध्याय यांच्या कादंबरीवरून 'प्रेमसंयोग', राखलदास बॅनर्जी यांच्या एका ऐतिहासिक कादंबरीवरून 'शशांक' तसेच बाबू जलधर सेन यांच्या 'अभामी' या कादांबरीचे रूपांतर 'हतभागिनी' या नावाने केले. प्रभातकुमार मुखर्जी यांच्या 'रत्नदीप' या कादंबरीचे रूपांतर 'पौर्णिमेचा चंद्र' या नावाने केले. त्यांनी मध्यमवर्गीय सत्पुरूष कुटुंबाची चित्रे आपल्या कादंबऱ्यातून रेखाटलेली आहेत. त्यांच्या या कादंबऱ्या मुख्यत: घटनाप्रधान स्वरूपाच्या आहेत. मराठी वाचकांना रूचिपालट म्हणून काही वेगळे वाचायला घ्यावे हा त्या कादंबरीच्या निर्मिती पाठीमागचा उद्देश होता.

चि. वि. वैद्य यांची १९१४ मध्ये 'दुर्देवी रंगू' ही ऐतिहासिक कादंबरी प्रसिध्द झाली. रंगू या विधवा स्त्रीच्या जन्मापासून तिच्या पाठीशी लागलेल्या दुर्दैवाची कहाणी आली आहे. या कादंबरीविषयी कुसुमावती देशपांडे म्हणतात, ''दुर्दैवी रंगू या त्यांच्या कादंबरीत सहृयता आणि गाढा व्यासंग यांचा संयोग घडवून आणण्याची त्यांची हातोटी दिसून येते. या कथेत रंगूबाईसारख्या बालविधवेच्या दु:ख कहाणी भोवती पेशवेकालीन इतिहासाचा एक कालखंड गुंफला गेला आहे.''[३१] चिं. वि. वैद्य हे इतिहासाचे गाढे अभ्यासक आणि मनाने सुधारणावादी म्हणून ओळखले जात.

हरिभाऊंची 'वज्राघात' आणि वामन मल्हार जोशी यांची 'रागिणी' एकाच वर्षी म्हणजे इ.स. १९१५ ह्या वर्षी प्रकाशित झाली. या कादंबरीमधून जोशींनी स्त्रिया शिकल्या तरी त्या रागिणी आणि उत्तरेसारख्या बुध्दिमान आणि अभ्यासू होऊ शकतात. तसेच या काळात इंग्रजी शिकलेल्या मुली उर्मट असतात असा समज समाजात सर्वत्र झाला होता. अशा परिस्थितीत रागिणी व उत्तरा यासारख्या व्यक्तिरेखांचे चित्रण करून, बुध्दिमान स्त्रियांचा आदर्श समाजामसोर ठेवण्याचा प्रयत्न जोशींनी केला आहे. त्या काळातील लोकांचे मनोरंजन करमणूक ही रंजकप्रधान कादंबरीतून होत होते. परंतु वाङ्मयाच्या संदर्भात गांभीर्यपूर्वक अपेक्षांची पूर्ती व्हावी या अपेक्षेने वाचणाऱ्यांना 'रागिणी' मन:पूर्वक आवडली. 'रागिणी' नंतर लगेचच जोशीनी 'आश्रमहरिणी' १९१६ ही कादंबरी लिहिली. या कादंबरीमध्ये पुनर्विवाहाचे आणि द्विपतीकत्वाचे तत्व मांडण्यासाठी लिहिली, तसेच ही कादंबरी म्हणजे एका संस्कृत ग्रंथाचे भाषांतर असून ती वाचकांसाठी निर्माण केली आहे. तंत्रात्मक अंगाने कथानक, पात्र, पात्रांचे स्वभावरेखाटन, कथानकाचा एकूण परिसर या सर्वच दृष्टीने ही कादंबरी लक्षणीय आहे. कालखंड भिन्न असल्याने केवळ या कालखंडातील कादंबऱ्या येथे विचारात घेतल्या आहेत.

या कालखंडाच्या अखेरीस इ.स. १९१७ मध्ये ना. सी. फडके यांची पहिली ऐतिहासिक कादंबरी 'अल्ला हो अकबर' प्रसिध्द झाली. त्या काळात ऐतिहासिक कादंबरीला असलेली लोकप्रियता या कादंबरीच्या निर्मितीस प्रेरक ठरली. अकबर व सेतिमा यांच्या प्रेमावर आधारित कथानक येथे रजपूत आणि अकबर यांचे संबंध मोगलांची कारस्थाने हा कादंबरीचा विषय होय.

याशिवाय हरिभाऊंच्या वास्तववादी व स्वदेशीवादी प्रेरणाप्रवृत्तीच्या कादंबऱ्यामधून

स्फूर्ती घेऊन अनेकांनी लेखन केले. त्यामध्ये सी. के. दामले यांची 'जग हे त्रिविधा आहे' १९१३, 'न्याय की अन्याय' १९१५, ना. स. गडकरी यांची 'सुधारणेचा मध्यकाल' १९०६ इत्यादी कादंबऱ्या होत.

या कालखंडात स्त्रियांनीही उत्कृष्ट पध्दतीचे कादंबरी लेखन केले आहे. साळूबाई तांबवेकर यांनी १८८५ पूर्वी हे लेखन केले होते तसेच त्यांनी या काळातही लेखन केले आहे. साळूबाई तांबवकरांची 'चंद्रप्रभाविरहवर्णन' नंतर या काळात 'हिंदुस्थानातील तारा' ही आणखी एक कादंबरी लिहिली आहे. या कादंबरीतून त्यांनी स्त्रियांचे प्रबोधन व्हावे, त्यांना शिक्षणाचे महत्त्व पटावे हा लेखिकेचा उद्देश आहे. गोदावरीबाई पंडित यांनी 'प्रीतीचा मोबदला' अथवा 'पुष्पगुच्छ' आणि 'वननाला' ही कादंबरी १८९० मध्ये लिहिली. या कादंबरीमध्ये एका सरदारपुत्राची प्रेमकथा आणि शौर्यकथा वर्णन करण्यात आली आहे. इंदिराबाई हरिपूरकर यांनी १९११ मध्ये 'दैवलीला' ही कादंबरी लिहली असून ती आत्मचरित्रात्मक स्वरूपाची आहे. जानकीबाई देसाई यांनी 'गृहलक्ष्मी', 'ताजमहाल', 'प्रेमळ सवत', 'सौभाग्यतिलक', 'पातिवृत्याची कसोटी', अथवा 'आंग्लसत्तेचा उदयकाल' इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. जानकीबाई देसाई या काळातील लोकप्रिय लेखिका आहेत. त्यांच्या कादंबऱ्यातून बोधवादी दृष्टिकोन स्पष्ट होतो. तसेच त्यांनी बंगाली कादंबऱ्यांचा आदर्श समोर ठेवला आहे. काशीबाई कानिटकरांची 'रंगराव' ही पहिली कादंबरी १९०३ मध्ये प्रसिध्द झाली. १९२८ मध्ये त्यांची 'पालखीचा गोंडा' ही दुसरी कादंबरी प्रसिध्द झाली. इतर समकालीन कादंबरी लेखिकांच्या तुलनेत काशीबाई कानिटकर यांच्या कादंबऱ्यांमध्ये स्वतंत्र विचारांची चमक दिसून येते.

या कालखंडवरती हरिभाऊंच्या कादंबऱ्याचा प्रभाव पडलेला होता. तसेच त्या नंतरच्या काळातील कादंबरीकारांनी हरिभाऊंच्याच लेखनाचे अनुकरण केलेले दिसते. हेच या कालखंडाचे मुख्य वैशिष्ट्य मानले जाते. त्यांनी कादंबरीतील अतिरंजकता आणि कृत्रिततेला फाटा देऊन तिला समाजाभिमुखतेकडे वळविले.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

### ३) इ. स. १९२० ते इ. स. १९४७

१९२० नंतरचा काळ राजकीयदृष्ट्या बराचसा संमिश्र आहे टिळकांच्या मृत्यूनंतर गांधीवादी विचारप्रणाली महाराष्ट्रात रूजू लागली. १९१९ साली टिळक युगाचा अस्त झाला आणि गांधीयुगाचा उदय झाला होता. या अर्थाने एक नवीन पर्व सुरू झाले होते. गांधीजींनी दिलेली अहिंसेची शिकवण आणि 'खेड्याकडे चला' हा दिलेला संदेश मराठी साहित्यनिर्मितीसाठी प्रेरणादायी ठरला. गांधीजींच्या या संदेशामुळे मराठी कादंबरीवरही बदलाच्या खुणा दिसू लागल्या. त्यामुळे कल्पनारम्य रंजनवाद यातच सर्वस्व मानणारी कादंबरी काही प्रमाणात का होईना समाजाभिमुख झालेली दिसू लागली. १९२० नंतर उदयास आलेल्या गांधीवादामुळे ग्रामीण जीवनाकडे लक्ष वेधले गेले आणि त्याचा परिणाम कादंबरी वाङ्मयातील समाजचित्रणावर दिसून येऊ लागला. या काळात अनेक गोष्टीची वर्णने कादंबरीत केली गेली. त्याविषयी डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर असे मत व्यक्त करतात की, ''या काळात कादंबरी हा वाङ्मय प्रकार काव्याइतकाच किंबहुना काव्यापेक्षाही अधिक महत्त्वाचा मानला गेला. कादंबरीचे स्वरूप त्याचे उद्दिष्ट तंत्र व मंत्र याची खूप चर्चा झाली. साहित्य व समाज यांचे संबंध कलावाद, जीवनवाद, पुरोगामी साहित्य, साहित्य व नीती, नवमतवाद श्लीलता, अश्लीलता, समाजवाद, व्यक्तीवाद, साहित्याची लोकाभिमुखता, साहित्याचे प्रयोजन, साहित्य व राजकारण, साहित्य व तत्वज्ञान, साहित्य व साहित्येतर कला इ. वादांची जी रणधुमाळी माजली ती मुख्यत्वेकरून कादंबरी या वाङ्मय प्रकाराच्या क्षेत्रात व या वादांची विचारांची कसोटी पाहण्याचे प्रयत्न झाले. ते ही कादंबरी वाङ्मय प्रकाराच्या आधारे.''[३२] कादंबरी या वाङ्मय प्रकारामध्ये अनेक सरस निरस सर्वसमावेशक गोष्टींचा विचार झालेला दिसतो.

साधारणत: १९२० नंतरच्या साहित्यामध्ये दोन दिग्गज साहित्यिकांचा उदय झाला. ते म्हणजे फडके – खांडेकर होय. फडक्यांचा 'कलावाद' आणि खांडेकरांचा 'जीवनवाद' या वादामुळे मराठी साहित्य ढवळून निघाले तरीही हा वाद न संपणारा विषय बनून राहिला.

१९२० नंतर हरिभाऊंच्या नंतरच्या पिढीतील महत्वाचा लेखक म्हणून ना. ह. आपटे यांचा उल्लेख केला जातो. ना. ह. आपटे यांच्या कांदबरीत भावनात्मक अंगापेक्षा तार्किक अंग अधिक असल्याने त्यांच्या लेखनाला काहीसे निबंधाचे स्वरूप प्राप्त झाले. त्यामुळे कलात्मक अनुभवांच्या

दृष्टीने ना. ह. आपटे हे नाथमाधव व हडप यांच्या श्रेणीतील लेखक मानले जातात. त्यांना 'हृदयाची श्रीमंती' १९२१, 'दुरंगी दुनिया' १९२२, 'न पटणारी गोष्ट' १९२३, 'वैभवाच्या कोंदणात' १९२४, 'पहाटे पूर्वीचा काळोख' १९२६, 'उमज पडेल तर' १९३९, 'दिवाकर दृष्टी' १९२९, 'पाच ते पाच' १९४६ इत्यादी कादंबऱ्या लिहिल्या. त्याखेरीज त्यांनी 'पंजाबचा लढवय्या शीख', 'रजपुतांचा भीष्म', 'लांछित चंद्रमा', 'अजिंक्यतारा', 'संधिवात' अशा काही ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या आहेत.

आपटे यांची 'न पटणारी गोष्ट' ही कादंबरी जरठकुमारीविवाहाचा प्रश्न हाताळणारी आहे. 'दिवाकर दृष्टी' ही कादंबरी बेकार तरूणांनी नोकरीच्या मागे न लागता खाणावळी सारखा धंदा करावा असा संदेश देणारी आहे. 'वैभवाच्या कोंदणात' ही १९२४ साली लिहिलेली कादंबरी अद्‌भूताश्र्यी व कल्पनारम्यप्रधान आहे. आपटे हे नवविचारांचे पुरस्कर्ते ठरत नाहीत. ते वृत्तीने मुळात परंपरानिष्ठ आहेत. स्त्री कितीही शिकली, सुधारली तरी तिने परंपरा विसरता कामा नये हाच त्यांचा संदेश आहे. त्यासाठी मुद्दामच ते शिक्षणाने उध्दट आणि बेताल झालेल्या आणि शेवटी पश्चात्ताप व्यक्त करणाऱ्या तरूणांची चित्रे रेखाटतात. त्यांनी सामाजिक ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या परंतु १९२० ते ४७ या कालखंडातील राजकीय आंदोलने त्यातील वेगवेगळी वादळे यापासून त्यांचे लेखन दूरच राहिले आहे.

वि. वा. हडप यांच्या कादंबऱ्यांची नावे वाचली तरी त्यांच्या कादंबरीचे स्वरूप लक्षात येते. १९१७ साली प्रसिध्द झालेली 'झाकली मूठ' ही त्यांची पहिली कादंबरी होय. या कादंबरीमध्ये त्यांनी मराठी समाजातील प्रौढ विवाहाचा प्रश्न मांडला आहे. याशिवाय त्यांनी 'निरभ्र चंद्र' १९२०, 'सम्राट' १९२३, 'राणी की रखेल' १९२७ इ. कादंबऱ्या लिहिल्या. तुरुंगात असताना 'रिसरेक्शन' ही टॉलस्टॉयची कादंबरी वाचल्यानंतर त्यांनी 'बहकलेली तरूणी' १९२४ ही कादंबरी लिहिली. याच कादंबरीचा पुढचा भाग म्हणजे 'निखळलेली तरूणी' १९२५ ही होय. याशिवाय 'जाळ्यातला मासा' १९३५, 'इश्काचा प्याला' १९२५, 'सौंदर्याची बाग' १९२५, 'वादळ' १९३७, 'वाकडे पाऊल', 'लग्नलांच्छन' इत्यादी कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या आहेत. त्याचबरोबर १९२६ ते १९३४ या काळात त्यांनी पेशवाईचे पुण्याहवाचन ते पेशवाईचे मन्वंतर अशा एकूण तेरा

कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यांची प्रेरणा स्पष्ट करताना वि. वा. हडप लिहितात, ''मी मुद्दामच पेशवाईवर ही कादंबरीमाला गुंफण्याचे ठरविले आहे. याचे कारण मला असे दिसून आले की माझ्या कादंबऱ्यांवर तुटून पडणारे टीकाकार सारे ब्राह्मण्य, दुराभिमान्यांच्या वर्गातीलच आहेत व पेशव्यांविषयीची दुरैतिहासिक अंधनिष्ठा त्यांच्यात ओतप्रोत आहे. त्यांची तोंडं मला विभूतीपूजेच्या दृष्टीने लिहिलेल्या पेशवाईवरील कादंबऱ्यांनी बंद करावयाची आहेत.''[३३]

पुढील काळात त्यांनी मार्क्सवादी जाणिवेतून 'मॅक्सिम गॉर्की' (माझे बालपण, आई) टर्जिनिव्ह यांच्या कादंबऱ्यांचे अनुवाद केले. तसेच 'भारतमाते ऊठ', 'भारतामातेची हाक' या कादंबऱ्यातून त्यांनी गांधीजींच्या नेतृत्वाखाली झालेल्या स्वातंत्र्याचे आणि सत्याग्रह चळवळीचे चित्रण केले आहे. हडपांनी मार्क्सवादी विचारसरणी आणि गांधीजींची अहिंसेची चळवळ अशा संमिश्र स्वरूपात लेखन करून मराठी कादंबरीत वास्तवतेचे चित्रण केले. कुसुमावती देशपांडे याविषयी लिहितात, ''सर्व दृष्टीनी हडपांच्या ह्या कथा हिणकस व गौण ठरल्या तरी एवढे मात्र खरे की, आज मराठी कादंबरीला वस्तुनिष्ठेचे व सामाजिक विश्लेषणाचे वळण लागत आहे. त्या वळणावरील पहिली काही पावले हडपांची आहेत.''[३४]

श्री. कृ. कोल्हटकर यांची 'शामसुंदर' ही दलित जीवनाचे चित्रण करणारी मराठी साहित्यातली पहिली कादंबरी म्हणता येईल. समाजाला लागलेला अस्पृश्यतेचा कलंक नष्ट व्हावा या हेतूने लिहिली. त्याचबरोबर 'दुटप्पी की दुहेरी' या कादंबरीतून त्यांनी समकालीन समाजवास्तवाचे चित्रण केले आहे.

वा. म. जोशी यांना तात्विक कादंबरीचे जनक मानले जाते. हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्या समाज वास्तवाचे एक रूप आहे. तर वा. म. जोशी यांच्या कादंबऱ्या हे त्याचे दुसरे रूप आहे. जोशीनी मध्यमवर्गीय वाचकांची बौध्दिक भूक भागवणारी कादंबरी निर्माण केली. तसेच गांधीवादाचा वा. म. जोशी यांच्या मनावर बराच मोठा प्रभाव पडला होता. त्यांनी 'आश्रमहरिणी', 'सुशिलेचा देव', 'इंदू काळे सरला भोळे', 'रागिणी', 'सावित्री', 'नलिनी' या कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्याविषयी रवींद्र ठाकूर लिहितात की, ''वामन मल्हारांची कादंबरी म्हणजे सत्य, सौजन्य आणि सौंदर्य या तत्वत्रयीचा विलोभनीय आविष्कार आहे. कुठला तरी वैचारिक प्रश्न मांडून

वाचकांना विचारप्रवृत्त करणे हाच त्यांचा उद्देश आहे. त्यामुळेच त्यांना तात्विक कादंबरीचे जनक म्हटले गेले.''[३५] जोशीनी आपल्या कादंबऱ्यामधून तीन तत्वप्रणालींचा वापर केला आहे.

श्री. व्यं. केतकर यांनी सुधारणावादाचे महाराष्ट्रीय जीवनावर झालेले परिणाम आपल्या कादंबऱ्यातून रंगवले तसेच अनौरस संतती, भारतीय असूनही विदेशात वास्तव्य करणाऱ्या लोकांच्या समस्या असे प्रश्न त्यांनी आपल्या कादंबऱ्यातून हाताळलेत. 'गोडवनातील प्रियंवदा' ही त्यांची पहिली कादंबरी यातून त्यांनी आतापर्यंत अस्पर्शित राहिलेला नागपूर प्रांताचा परिसर मराठी कादंबरीत प्रथमच आला आहे. 'परागंदा' १९२६ आणि 'भारतीय समाजाची सरहद्द' ह्या त्यांच्या यानंतरच्या कादंबऱ्या. 'ब्राह्मणकन्या' या कादंबरीत महत्वाचा ठरलेला अनौरस संततीचा प्रश्न या कादंबरीतही आला आहे. 'आशावादी' अथवा 'एका प्रवाह पतितीचे चरित्र' ही केतकरांची तिसरी कादंबरी. 'गावसासू' या कादंबरीत इंग्लंडमधील भारतीयांच्या जीवनवास्तवाचे चित्रण येते. समाज व्यवस्थेत वेश्यासंतती किंवा अनौरस संततीचे सामाजिक भवितव्य काय हाच या कादंबरीचा मुख्य विषय आहे. स्वत: समाजशास्त्रज्ञ असल्यामुळे त्यांच्या या आकलनाला सखोल परिणाम लाभले आणि त्यातून 'ब्राह्मणकन्या' १९३० साली प्रसिध्द झालेली कादंबरी सर्वाधिक चर्चाचा विषय ठरली. अनौरस संतती, विवाहोत्पन्न संततीत सामावली जाणे कठीण आहे. असा विषय त्यांनी विचक्षणा कादंबरीत मांडला आहे. कादंबरीकार म्हणून केतकरांच्या योगदानाविषयी डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर लिहितात, ''या काळात आनंदवाद, रंजनवाद, पलायनवाद, स्वप्नपूर्तीवाद, कलावाद, रसवाद या सर्व संकल्पनांना कटाक्षाने दूर करून साहित्याला ज्ञानशाखाच मानणारा आणि आपल्या जीवनवादी विचारप्रणालीला निष्ठेने घट्ट पकडून बसलेला जर कोणी एकच एक कादंबरीकार असेल तर तो म्हणजे केतकर. केतकरांनी त्या काळातील सर्व संकल्पना बाजूला सारून स्वत:चे स्वतंत्र पध्दतीने लेखन केले आणि नावलौकिक मिळवला.''[३६]

साधारणत: १९२० नंतरच्या साहित्यामध्ये दोन दिग्गज साहित्यिकांचा उदय झाला ते म्हणजे फडके, खांडेकर होय. फडक्यांचा 'कलावाद' आणि खांडेकरांचा 'जीवनवाद' या वादामुळे मराठी साहित्यात बराचसा बदल झाला तरीही हा वाद न संपणारा विषय बनून राहिला. ज्या काळात हरिभाऊंच्या सामाजिक कादंबऱ्या गांभीर्याने वाचल्या जात होत्या.

वामन मल्हारांच्या तत्त्वचर्चात्मक कादंबऱ्या या मध्यमवर्गीय वाचकांचे लक्ष वेधत होत्या. केतकरांच्या कादंबरीतील काही घटकांवर नाक मुरडत का होईना चर्चा, टीका होत होती आणि नाथमाधव, ना. ह. आपटे, वि. वा. हडप यांच्या कादंबऱ्या वाढत्या वाचकवर्गाची भूक भागवित होत्या. त्याच काळात फडके यांचा उदय झाला.

ना. सी. फडके यांनी वयाच्या १८ व्या वर्षी इ. स. १९१२ साली 'मेणाचा ठसा' ही साहसी कथा लिहून लेखनास प्रारंभ केला. त्याननतर चार ते पाच वर्षातच त्यांची 'अल्लाहो अकबर' १९१७ ही पहिली कादंबरी प्रकाशित झाली. ही पहिलीच कादंबरी ऐतिहासिक स्वरूपाची असून तिच्यावर हरिभाऊंच्या कादंबऱ्यांचा प्रभाव जाणवतो. त्यानंतरची स्वतंत्र अशी कलाकृती म्हणजे 'कुलाब्याची दांडी' १९२५ ही सामाजिक कादंबरी होय. याशिवाय त्यांनी 'जादूगार दौलत' १९२९, 'आटकेपार' १९३१, 'निरंजन' १९३२, 'इंद्रधनुष्य' १९४१, 'अखेरचे बंड' १९४४, 'प्रवासी', 'उध्दार', 'उन्माद', 'एक होता युवराज', 'प्रतिज्ञा' अशा जवळ जवळ ७० ते ७५ कादंबऱ्या लिहिल्या. फडके यांची कादंबरी कशी आहे या विषयी रवींद्र ठाकूर लिहितात की, ''फडके यांची कादंबरी म्हणजे पाश्चात्य साहित्यातून झिरपत आलल्या व्यक्तिवादी जाणिवांचा टोकाचा आविष्कार म्हणावा लागेल.''[३७] असे कादंबरीला श्रेष्ठत्व बहाल केलेले आहे. फडके यांच्या सर्वच कादंबऱ्या जवळ जवळ वाचकप्रिय आहेत. त्यामुळे त्या खूप लोकप्रिय झालेल्या आहेत. समीक्षकांनी मात्र त्यांना म्हणावी तेवढी दाद दिलेली नाही. या संदर्भात चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''फडके यांच्याजवळ पाऊणशे कादंबऱ्या लिहून ते सामान्य वाचकांचे लोकप्रिय कलावंत ठरले. पण विदग्ध वाचकांनी त्यांच्या मोजक्या पण उत्तम कलाकृतीतच आवश्यक ते मोठेपण मान्य केले नाही. ही वस्तुस्थिती आहे.''[३८] फडक्यांच्या या कादंबऱ्यांचा मुख्य धागा प्रणय असून तरूण स्त्री- पुरूषांची ओळख त्यांना एकमेकाबद्दल वाटणारे आकर्षण व त्यांचे प्रणय भावनेत झालेले रूपांतर, माणसाची तळमळ, योगायोग, प्रेमभावना, गैरसमजुती, प्रेमभावनेला विरोध आणि त्यांचा शेवट वैवाहिक जीवनात होणे हे त्यांच्या सर्व कादंबऱ्यात येते.

१९२० ते १९४७ या काळावर गांधीवादाचा बराचसा प्रभाव होता. अनेक लेखकांच्या लेखनातून गांधीवादी विचारधारा वाहत होती. त्यामध्ये खांडेकरांचाही समावेश होता म्हणून

गांधीवादाचा जाणीवपूर्वक विचार करणारे तिसरे बिनीचे लेखक म्हणून वि. स. खांडेकरांचे नाव घेतले जाते. 'कांचनमृग' पासून 'दोन धृव' पर्यंतच्या त्यांच्या कादंबऱ्या गांधीवादाने भारलेल्या दिसतात. तरूणांनी संपत्तीकडे धावण्याऐवजी आपल्या 'हृदयाची हाक ऐकावी' हा विचार मांडण्याचा प्रयत्न 'हृदयाची हाक' १९३०, मध्ये मांडला आहे. 'कांचनमृग' या कादंबरीवर गांधीवादी विचारांचा प्रभाव आहे. प्रेम हे अनेकवेळा उत्पन्न होऊ शकते. हे खांडेकरांनी 'पहिले प्रेम' १९४३ या कादंबरीतून व्यक्त केले आहे. राजकीय असंतोषाचे विचार 'क्रौंचवध' १९४२ या कादंबरीतून मांडलेला पहावयास मिळतो हे राजकीय विचार कोणत्या स्वरूपाचे आहेत हे सांगताना चंद्रकांत बांदिवडेकर म्हणतात, ''यातील राजकीय असंतोषाचे काहीसे अंधुक चित्र ब्रिटीश राजवटीविरूध्द चाललेल्या लढ्याचे नमूद कल्पित अशा रामगड संस्थानातील आहेत.'' दोन पिढ्यातील वैचारिक संघर्षाचे चित्रणही या कादंबरीतून झालेले आहे. याशिवाय 'हिरवा चाफा' १९३८, 'दोन मने' १९३८, 'सुखाचा शोध' १९३९, 'रिकामा देव्हारा' १९३९, 'पांढरे ढग' १९४९ इ. कादंबऱ्यांचा प्रवास पाहत असता असे दिसून येते की खांडेकर हे जीवनासंबंधी आंतरिक चिंतन करणारे सामाजिक व आर्थिक विषमतेमुळे व्यथित तसेच शोषित बनलेल्या समाजाबद्दल अपार करूणा बाळगणारे कलावंत होते.

फडके, खांडेकर यांच्या परंपरेत लिहिणारे पण आपला वेगळा ठसा उमटविणारे कादंबरीकार म्हणून ग. त्र्यं. माडखोलकर यांना ओळखले जाते. पराक्रम आणि प्रणय हे वाचकाच्या मनोरंजनाचे प्रमुख घटक आहेत. हे हेरून माडखोलकरांनी आपल्या कादंबऱ्यातून क्रांतीचे आकर्षण असणारे तरूण नायक आणि त्यांच्या प्रणय लीलांची चित्रणे केली आहेत. त्यांची 'मुक्तता' १९३३ साली प्रसिध्द झालेली पहिली राजकीय कादंबरी मानली जाते. 'शाप' १९३९, 'दुहेरी जीवन' १९३९, 'नागकन्या' १९४१, 'एक बंगला' १९४२, 'कांता' १९३९, 'मुखवटे' १९४०, 'नवासंसार' १९४१, 'चंदवाडी' १९४३ या कादंबऱ्या भारतीय राजकारणांचा वेध घेणाऱ्या आहेत. सशस्त्र क्रांती हे माडखोलकरांसारख्या लेखकांचे स्वप्न होते. तेच त्यांनी यथाशक्यपणे कादंबरीत रंगवले आहे. त्यांच्या कादंबरीविषयी रवींद्र ठाकूर लिहितात, ''एका कादंबरीत समाजवाद, दुसऱ्या कादंबरीत सशस्त्र क्रांतिवाद, तिसऱ्या कादंबरीत मार्क्सवाद त्या

सर्वांच्या जोडीला गांधीवादाचा तिरस्कार आणि जहाल मतवादाचा पुरस्कार असे मोठे विचित्र आणि बहुरंगी दृश्य माडखोलकरांच्या कादबंरी वाङ्मय दिसून येते.

महात्मा गांधीजींच्या विचारसरणीचा प्रभाव असणारे मराठी साहित्यातील एक महत्त्वपूर्ण कादंबरीकार म्हणून भार्गव विठ्ठल वरेकर यांचा उल्लेख केला जातो. हरिभाऊंच्या नंतरचे वास्तववादी कादंबरीकार म्हणून खऱ्या अर्थाने त्यांचेच नाव घेतले जाते. नाटककार म्हणून नावारूपाला येत असतानाच वरेकरांनी 'संसार की संन्यास' 'चिमणी' या कादंबऱ्या लिहिल्या. परंतु 'विधवाकुमारी' १९३८ या कादंबरीमुळेच कादंबरी क्षेत्रात त्यांचे नावलौकिक झाले. या कादंबरीमध्ये अशिक्षितपणामुळे स्त्रीवर्ग हा स्त्री सुधारणेच्या कसा आड येतो याचे चित्रण आलेले आहे. 'पण लक्षात कोण घेतो' प्रमाणेच ही कादंबरीही कोणा विधवेनेच लिहिली असावी असा अनेक वाचकांचा समज झाला. या कादंबरीचा उत्तरार्ध म्हणून त्यांनी 'परतभेट' ही कादंबरी लिहिली. त्यांनी 'फाटकी वाकळ', 'चिमणी', 'मी राम जोशी', 'सात लाखातील एक', 'उमलती कली', 'धावता धोटा' इ. कादंबऱ्या लिहिल्या. 'धावता धोटा' ही वरेकरांची कामगार जीवनावरची कादंबरी आहे. या कादंबरीत त्यांनी गिरगावाचा परिसर व तेथील जीवन अतिशय वास्तव पध्दतीने रेखाटले आहे म्हणून डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर लिहितात, ''वरेकरांनी खऱ्या मराठी कादंबरीला गिरगावातून गिरणगावात नेले असे म्हटले पाहिजे.''[३९] वरेकरांनी समाजातील नजरेस पडणाऱ्या वास्तव प्रश्नांना कादंबरीचे रूप देण्याचा प्रयत्न केला आहे.

''फडके, खांडेकर, माडखोलकर या लोकप्रिय कादंबरी लेखकांच्या काळात आपली स्वत:ची वेगळी वाट चोखाळणारा कादंबरीकार म्हणून पु. ल. देशपांडे यांचा निर्देश करावा लागेल,'' असे मत रवींद्र ठाकूर यांनी व्यक्त केले आहे.[४०] देशपांडे यांनी बंधनांच्या पलीकडे या कादंबरीतून सामाजिक जाणीव व्यक्त केली आहे. तर 'सुकलेले फुल' आणि 'सदाफुली' मधून आत्मनिष्ठ जाणिवांचा आविष्कार घडवला आहे. 'विशाल जीवन' आणि 'काळी राणी' या कादंबऱ्यातून व्यक्ती आणि समाज यांच्यातील परस्परसंबंधांचा मागोवा घेताना दिसतात. 'नवे जग'मध्ये त्यांनी व्यक्ती जीवनाच्या माध्यमातून प्रतिकात्मक पध्दतीने त्यांनी फॅसिझम आणि समाजवाद या राजकीय विचारप्रणालीतील संघर्ष व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

पु. ल. देशपांडे हे वृत्तीने आत्मनिष्ठ कवी होते आणि त्यांनी निवडलेले माध्यम मात्र वास्तववादी व जीवनानुभव व्यक्त करणारे होते. त्यांच्या कादंबरी लेखनाविषयी कुसुमावती देशपांडे म्हणतात, ''फडके यांनी सामान्य माणसाला जे रूचेल तेच मोहकपणे मांडण्याची कला हेतूपुरस्सर संपादिली. देशपांडे यांची निर्मिती मूलतः आत्मनिष्ठ आहे. जे स्वतःला उत्कटपणे जाणवले व पटले ते व्यक्त करण्याच्या हेतूने त्यांनी लेखन केलेले दिसते. त्यांच्या कादंबऱ्या म्हणजे व्यक्तवादी जाणिवांचाच आविष्कार आहेत.''[४१]

''साने गुरूजींचे व्यक्तिमत्व मात्र खऱ्या अर्थाने गांधीवादाला अनुकूल होते. अस्तिकता आदर्शवादाची दुर्दम्य ओढ, सेवाभावाचे अतिशय आकर्षण, त्यागाची तत्परता बुध्दिवादाबद्दल शंका किंवा अनास्था आत्मिक आवेश मनुष्य व इतर प्राणीसृष्टीबद्दल सहज प्रेमभाव इ. गुण सानेगुरूजींच्या व्यक्तित्वात इतर कोणत्याही लेखकापेक्षा अधिक प्रमाणावर आढळतात.'' असे मत डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर साने गुरूजींविषयी व्यक्ती करतात.[४२] साने गुरूजींनी सामाजिक सुधारणेबरोबरच समाजातील सामाजिक अन्याय दूर करण्याच्या भूमिकेतून कादंबऱ्या लिहिल्या. 'श्यामची आई' ही गोष्ट रूपात लिहिलेली कादंबरी अत्यंत लोकप्रिय ठरली. या कादंबरीत श्यामचे जीवन आले आहे. 'धडपडणारी मुले', 'अस्तिक', 'सती', 'रामाचा शेला', 'क्रांती', 'संध्या' या कादंबऱ्यातून देशप्रेमाने प्रेरित झालेल्या कार्य तत्पर युवकांचे प्रभावशाली चित्रण आले आहे. तसेच स्त्री देशप्रेमासाठी किती त्याग करू शकते, याचेही चित्रण यात आले आहे. 'निरंजन', 'प्रवासी', 'उन्माद', 'समरभूमी' आशा या कादंबऱ्यातून सत्याग्रहाचे वर्णन जसेच्या तसे आले आहे. 'श्यामची आई' या विषयी भालचद्र नेमाडे म्हणतात, ''श्यामची आई ही त्यांची उत्कृष्ट निर्मिती म्हणावी लागेल. मराठीतील चुकीच्या समीकरणामुळे ती पथेर पांचाली होऊ शकली नाही.''[४३] तर डॉ. चंद्रकांत बांदिवडेकर यांच्या मते, ''साने गुरूजींचा श्यामची आई हा ग्रंथ गांधीवादाच्या व्यक्तिमत्वाच्या सुगंधाने दरवळून गेला आहे. इतके अलौकिकत्व श्यामची आईला मिळालेले आहे. आजही या पुसतकाला तेवढेच श्रेष्ठत्व आहे.''[४४]

रघुवीर सामंत यांनी मोजकेच कादंबरी लेखन केले आहे. परंतु त्यांनी जी एक महत्त्वाची कादंबरी आहे. तिला या कालखंडात महत्वाचे स्थान आहे. 'उपकारी माणसे' ही चार खंडात

लिहिली गेलेली कादंबरी आहे. 'प्रवासातील सोबती', 'अभ्रपटल', 'आकाशगंगा', 'घरोघरच्या देवी' या चार खंडात ती प्रकाशित झाली आहे. ज्या काळात व्यक्तीवादी आणि रंजनवादी कादंबऱ्यांचा सुळसुळाट झालेला होता. त्या काळात ही कुटुंबकथा सामंतांनी लिहिली.

र. वा. दिघे यांनी 'रानजाई' १९४६, 'गानलुब्धा', 'मृगनयना' १९४७, 'पानकळा' १९३९, 'सराई' १९४३ या कादंबऱ्या लिहिल्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून त्यांचा उल्लेख होत असला तरी त्यांनी स्वातंत्र्यपूर्व कालखंडामध्येही कादंबरी लेखनास सुरवात केली आहे. 'पानकळा' १९३९ ही त्यांची पहिली कादंबरी तर 'सराई' १९४३ या कादंबरीमुळे ते नावारूपाला आले.

दत्त रघुनाथ कवठेकरांनी 'विखुरलेले प्रेम', 'रूपेरी कडा', 'रेशमाच्या गाठी', 'मंदा', 'शासन', 'आभाळाची सावली', 'वाट पाहता लोचनी' इ. अनेक कादंबऱ्या लिहिल्या. प्रणय आणि स्त्री पुरूष संबंध हेच त्यांच्या कादंबऱ्यांचे विषय आहेत.

वि. वि. बोकील यांनी 'आंबा', 'हळद', 'कुबेर की रंक', 'तू तिथं मी', 'बेबीची बहीण' या कादंबऱ्या मधून समाजातील वास्तववादी घटनांचे चित्रण केले आहे.

सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांची अव्वल इंग्रजी काळातील पुण्याचे व तेथील सामाजिक वास्तवाचे वस्तुस्थिती निदर्शक चित्रण करणारी कादंबरी म्हणून 'ढङ्ढाशास्त्री परान्ने' ही कादंबरी महत्त्वाची ठरते. परंतु तिचा उल्लेख कुठेही केलेला आढळत नाही.

याशिवाय मा. दा. आळतेकरांनी 'अपराध कोणाचा', 'ललिता', 'शांताराम', 'मुक्तबंध' इ. कादंबऱ्या लिहून सामाजिक बदलांचे चित्र रेखाटण्याचा प्रयत्न केला. वि. वा. पत्की यांनी 'आंधळा न्याय' ही कादंबरी लिहिली. श्री. के. क्षीरसागर यांनी 'राक्षसविवाह', वि. पां. दांडेकर 'तिशीचा तरूण', श्रीनिवास कोचरेकर 'दडलेली पत्रे', माधव मनोहर यांची 'ज्वाला', 'अभिसारिका' यासारख्या कादंबऱ्या लिहिल्या.

'रात्रीचा दिवस' १९४२ ही कादंबरी लिहून मर्ढेकरांनी कादंबरीमध्ये संज्ञाप्रवाह आणला. नवकवितेप्रमाणेच त्यांनी कादंबरीतही प्रयोग केला. त्यांच्या 'तांबडी माती' १९४३ आणि 'पाणी' १८४८ या कादंबऱ्या उल्लेखनीय आहेत. मो. ग. रांगणेकर यांनीही 'मृगजळ' १९३७, 'सीमोल्लंघन' १९३४ इ. कादंबऱ्या लिहून हा कालखंड समृध्द करण्यात भर घातली.

वरील काही लेखकाना या कालखंडात महत्त्वाचे स्थान नसले तरीही त्यांनी ज्या काही कादंबऱ्या लिहिल्या त्यामुळे हा कालखंड समृध्द होण्यात भर पडली. याशिवाय प्रस्तुत कालखंडामध्ये काही स्त्री लेखिकांनीही लेखन करण्यास सुरूवात केली होती. स्त्री स्वतः शिकून सुशिक्षित झाली होती. शिक्षणामुळे जागृत झाली होती. त्यामुळे स्त्रिया स्वत: लेखन करू लागल्या त्यांचे दु:ख, व्यथा, वेदना, समस्या त्या स्वत: शद्बबद्ध करून कादंबऱ्यांच्या माध्यमातून लोकांच्या समोर आणण्याचा प्रयत्न करत होत्या. त्यामध्ये अनेक लेखिकांचा सहभाग होता. त्यातील काही लेखिका म्हणजे विभावरी शिरूरकर यांनी 'हिंदोळ्यावर', 'कळ्यांचे नि:श्वास', 'विरलेले स्वप्न', 'जाई', 'बळी', 'शांताबाई' या कादंबऱ्या लिहिल्या. यशोदाबाई– 'मुलाचे बंड', गीता माने– 'निखळलेली हिरकणी', 'हिरवळीखाली', 'वठलेला वृक्ष', 'लतिका', 'फेरीवाला', 'आविष्कार', 'माळरानात', 'वादळापूर्वी', 'धुके आणि दहिवर', इ. कादंबऱ्या लिहिल्या. विभावरी शिरूरकर, गीता साने, प्रेमा कंटक या काळातील प्रमुख लेखिका असल्या तरी इतरही अनेक लेखिकांनी आपल्या स्त्रीजीवनाशी निगडीत असे प्रश्न हाताळले आहेत. जानकीबाई देसाई –'गृहलक्ष्मी', कुमुदिनी प्रभावळकर – 'कुस्करलेलं हृदय', यशोदाबाई भट –'मुलांचे बंड', शांताबाई नाशिककर – 'हाच का धर्म', 'लग्न बाजार', 'पुसलेल्या रांगोळ्या', कमलाबाई बंबेवाले – 'बंधमुक्ता', इंदिराबाई सहस्त्रबुध्दे – 'गोदावरी', 'बाळूताई धडा घे', मालतीबाई दांडेकर – 'कृष्णरजनी', 'काटेरी मार्ग', मनोरमा निमकर – 'अखेरची लाट', लीला देशमुख – 'दोन घडीचा डाव', फिरोज आनंदकर – 'माझं बाळ ते' इ. स्त्री लेखिकांनी आपल्या वैवाहिक जीवनातील प्रसंग, कौटुंबिक संबंध, पती पत्नी संबंध, विवाहबाह्य संबंध अशा स्वरूपाच्या प्रश्नांचा वेध घेण्याचा प्रयत्न कादंबरीतून केलेला दिसतो.

१९२० ते १९४७ हा कालखंड मराठी कादंबरीच्या इतिहासात अनेक दृष्टीने महत्त्वाचा ठरला. या काळातील कादंबरी मध्यमवर्गीय जाणिवांची निर्मिती आहे. या कालखंडावर फडके, खांडेकर, माडखोलकर याचा प्रभाव जाणवतो. स्वातंत्र्यप्राप्तीच्या चळवळीचा हा पायाभरणीचा कालखंड म्हणून ओळखला जातो. स्वातंत्र्यासाठी झालेली जनआंदोलने, महात्मा गांधीजींचा संदेश, मार्क्सवादी विचार, फडक्यांचा कलावाद, खांडेकरांचा जीवनवाद या सर्वांचा परिणाम या



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

कालखंडातील मराठी कादंबरीवर झालेला आढळतो. उदा. खांडेकर – माडखोलकर या नावानेही हा कालखंड ओळखला जातो. या काळातील मराठी कादंबरी ही प्रामुख्याने मध्यमवर्गीय आणि करमणूकप्रधान अशीच राहिली.

## ४) स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरी इ. स. १९४७ ते १९६०

१९४७ ते १९६० या कालखंडाचा विचार करताना असे लक्षात येते की इंग्रजांच्या सत्तेच्या वर्चस्वाखाली देश पिळून निघाल्यामुळे सुरूवातीचा दहा वर्षाचा काळ व त्यातील कादंबरी, लेखन हे एका दबलेल्या मनस्थितीत झाले आहे. या स्वातंत्र्यप्राप्तीनंतर सुरवातीच्या पाच ते सहा वर्षाच्या कालखंडातील मराठी कादंबरीवर फडके, खांडेकरांच्या, माडखोलकरांच्या 'कलावाद' आणि 'जीवनवाद' यांच्या रंजनप्रधान रचनातंत्राचा प्रभाव होता. स्वातंत्र्यप्राप्तीच्या घटनेचा फारसा परिणाम तत्कालीन मराठी साहित्यावर झालेला दिसत नाही. पण त्यानंतर कादंबरीच्या क्षेत्रात दुसऱ्या महायुध्दाच्या परिणामाच्या खुणा मात्र मराठी साहित्यावर उमटू लागल्या होत्या. १९५० ते १९६० हे स्वातंत्र्योत्तर काळातील पहिले दशक असून या कालखंडामध्ये अनेक लेखकांनी लेखन केलेले आहे. या लेखनावर त्या काळातील विविध गोष्टीचा परिणाम झाला आहे. याविषयी डॉ. शंकर विभुते म्हणतात, ''या कालखंडातील कादंबरी लेखनावर भारतीय स्वातंत्र्ययुध्द स्वातंत्र्यपूर्व काळातील परिस्थिती, भारतीय स्वातंत्र्यप्राप्ती, गांधीजींचा वध, पोलिस ॲक्शन, निजामी राजवटीची क्रूरता, अस्पृश्यता निर्मूलनाचे प्रयत्न, प्रादेशिकवाद, कमाल जमीन धारणा कायदा, फिरंग्यांचा अत्याचार, राजकीय व्यक्तींची सत्ता व संपत्ती लालसा, संयमाचे घटते महत्त्व, देशातील दारिद्र्य, फ्राईडचे तत्त्वज्ञान, नात्या–नात्यातील संपत चाललेले पावित्र्य, रझाकारांचा अत्याचार, देशातील अंधश्रद्धा, आर्थिक मंदीची लाट, लोकांची शहराकडे होणारी धाव, स्त्री शिक्षणावरील भर, कामगार चळवळी या घटनांचा प्रभाव असून सभोवताली घडणाऱ्या घटनांचे मनन, चिंतन करून लेखकांनी आजूबाजूची ही परिस्थिती त्यांच्या कादंबऱ्यातून आविष्कृत केलेली आहे.''[४५]

''तर काही कादंबऱ्या अशाही आहेत की त्यांचे सभोवतालच्या परिस्थितीशी अजिबात नाते नाही. लेखकांनी केवळ वाचकांची करमणूक करण्यासाठी, अर्थार्जनासाठी अथवा स्वत:च्या प्रतिष्ठेसाठी कादंबऱ्यांचे लेखन केलेले आहे. तर काही कादंबरीकारांनी त्यांच्या मनात घोळत असलेल्या वेगवेगळ्या समस्यांना कादंबरीतून अक्षररूप बहाल केलेले आहे.''[४६]

या सर्व गोष्टींचा परिणाम या कालखंडातील कादंबऱ्यावर झालेला दिसून येतो. दुसऱ्या महायुध्दानंतर मराठी कादंबरीतील कल्पनारम्यतेचे वातावरण कमी झाले आणि वास्तवातल्या विषयांना व जीवन चित्रणाला महत्त्व आले. विश्राम बेडेकर यांची 'रणांगण' (१९३९) ही कादंबरी त्याचा प्रत्यय देते. दुसऱ्या महायुध्दानंतर नवीन मुल्यांची जोपासना झाल्यामुळे जुनी मुल्ये खचून गेली. नवीन समाज संमिश्र, गुंतागुंतीचा बनू लागला. माणूस भावनाशून्य झाला. सर्वत्र विषमता प्रस्थापित होऊ लागली. यांत्रिक, निष्प्रेम सहानुभूतीशून्य अशा मानवी जीवनाचे उदास व भकास चित्रण साहित्यातही उमटत राहिले. कादंबरीतूनही वास्तव जीवन जसेच्या तसे शब्दबध्द होऊ लागले.

श्री. ना. पेंडसे यांची १९५० साली लिहिलेली 'हद्दपार' ही कादंबरी चरित्रात्मक आहे. या कादंबरीमधून हर्णे गावचा परिसर तसेच एकाच गोष्टीचा ध्यास घेतलेल्या व्यक्तीची कशी शोकांतिक अवस्था होते याचे चित्रण आले आहे. बा. भ. बोरकर यांनी १९५० साली 'भावीण' या कादंबरीतून गोव्यातील भावीण स्त्रियांच्या मनोव्यथेवर स्पष्ट प्रकाश टाकलेला आहे. व्यंकटेश माडगूळकर यांची 'पुढचं पाऊल' (१९५०) भाई ऐतवडेकर यांची 'जीवनसाथी' (१९५०), बा. भ. कर्णिक यांची 'वाडगीण' १९५०, म. भा. भोसले यांची 'एका आईची लेकरं' १९५०, भाऊ पाध्ये यांची 'डोंबाऱ्याचा खेळ' १९५०, वसंत कानेटकर यांची 'घर' १९५०, ना. सी. फडके यांची 'जेहलम' १९५०, वसंत पोरेडी यांची 'जंगल' १९५० इत्यादी कादंबऱ्यांवरती इंग्रजी सत्तेचा अत्याचार, भाविणींचा प्रश्न, दलितांमध्ये झालेली जागृती, आत्मसन्मानाची भावना, खेड्यातील लोकांची शहराकडे धाव, जरठकुमारीविवाह, प्रेमभंग ग्रामीण शेतीजीवनातील समस्या, देवदासींचे प्रश्न, कामगार चळवळीचे बदलते स्वरूप, मध्यमवर्गीयांच्या नशिबी आलेली दैन्यावस्था या घटनांचा प्रभाव या वर्षाच्या कादंबऱ्यावर जाणवतो. अण्णाभाऊ साठे यांची 'चित्रा' १९५१, श्री. रा. बिजवलकर यांची 'शुभा' १९५१ याही कादंबऱ्या याच वळणाच्या आहेत.

श्री. ना. पेंडसे यांची 'गारंबीचा बापू' १९५२ साली प्रसिध्द झाली. या कादंबरीमुळे पेंडसे नावलौकिक मिळाला. तसेच स्वातंत्र्योत्तर कालखंडातील महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून त्यांना ओळखले जाते म्हणून रवींद्र ठाकूर म्हणतात, ''गारंबीचा बापू या कादंबरीच्या लोकप्रियतेने डोळे दिपून गेलेल्या समीक्षकांनी पेंडशांना थोर सामाजिक कादंबरीकार ठरवून टाकले.''[४७] पेंडसे हे थोर सामाजिक कादंबरीकार आहेत तसेच ते प्रादेशिक कादंबरीकार म्हणूनही ओळखले जातात. कारण त्यांनी कोकणातील निसर्गरम्य प्रदेश – दापोली, साखरपेंडी, मूर्डी, हर्णे, आंजर्ले येथील मानवी जीवन विशेषाने ह्या प्रदेश वैशिष्टयांना आपल्यात सामावून घेतलेली, अस्सल कोकणी मातीतील पिळदार व्यक्तिमत्वे त्यांनी आपल्या कादंबरीतून साकार केली आहेत. पेंडशांबरोबरच वि. वा. शिरवाडकर यांची 'जान्हवी' १९५२, वि. द. विंचुरकर यांची 'महापूर' १९५२, द. का. सबनीस यांची 'पाकोळी' १९५२ यांनीही लेखन केले. पेंडसे यांच्या सोबत आपल्या प्रादेशिक कादंबरीने विलक्षण लोकप्रिय असलेले नाव म्हणजे गोपाल नीलकंठ दांडेकर होय. दांडेकर कादंबरीकार म्हणून 'शितू' १९५३ या कादंबरीमुळे ओळखले जाऊ लागले. १९४७ ते १९८२ या कालखंडात २९ कादंबऱ्या त्यांच्या नावावर आहेत. लोकप्रिय लेखक, कादंबरीकार म्हणून दांडेकरांची प्रसिध्दी होती. त्यांनी भिन्न भिन्न विषयावर कादंबऱ्या लिहिल्या आहेत आणि हे विषय त्यांना स्वत:ला जाणवले आहेत. लेखन हाच जीवनाचा उद्योग आणि उद्देश स्वीकारलेल्या दांडेकरांच्या आशयसंपन्न कादंबरी संपदेबद्दल भरपूर लिहिणे शक्य आहे. परंतु मर्यादेचा विस्तार करता त्यांचे या कालखंडापुरते विवेचन केले आहे.

व्यंकटेश माडगूळकर लिखित 'बनगरवाडी' १९५५ ही महत्त्वाची कादंबरी होय. एक श्रेष्ठ कादंबरीकार होत. एक श्रेष्ठ कादंबरी म्हणून या कादंबरीची एवढीच ओळख नाही तर एकाच वेळेला तिच्यातील प्रादेशिक वैशिष्ट्ये अधोरेखित करणारा परिसर, विशिष्टता एका छोट्याशा ग्रामसंस्कृतीचे वास्तव चित्रण, वाडीतले धनगरी जीवन या वैशिष्ट्यांमुळे ही कादंबरी लोकप्रिय ठरते. या दशकातील लक्षणीय कादंबरी म्हणून या कादंबरीचा उल्लेख होणे अटळ आहे.

बी. रघुनाथ यांची 'आडगावचे चौधरी' १९५४, दा. गो. बारसे यांची 'जिभाऊ' १९५४, शदरचंद्र मुक्तिबंध यांची 'क्षिप्रा' १९५४, वि. स. खांडेकर यांची 'अश्रू' १९५४, गो. वि. दांडेकर

यांची 'जैत रे जैत.' १९५५, 'पडघवली' १९५५, 'पवनाकाठचा धोंडी' १९५५, व्यंकटेश माडगूळकर यांची 'बनगरवाडी' १९५५, गंगाधर गाडगीळ यांची 'लिलीचे फूल' १९५५, वसंत कानेटकरांची 'अंकुलिना' १९५५, र. वा. दिघे यांची 'आई आहे शेतात' १९५६, ना. रा. शेंडे यांची 'काजळी रात्र' १९५६, वि. वा. शिरवाडकर यांची 'कल्पनेच्या तीरावर' १९५६, वसंत कानेटकर यांची 'पोरका' १९५६ ग्रामीण जीवनावर भर देणाऱ्या कादंबऱ्या व कथानके या वर्षात वाचकांपुढे आलेली आहेत.

गो. नी. दांडेकर यांची 'कुणा एकाची भ्रमणगाथा' १९५७, ना. ग. गोरे यांची 'शंख आणि शिंपले' १९५७, दि. बा. मोकाशी यांची 'देव चालले' १९५७, 'यशोदा' १९५७, श्रीपाद जोशी यांची 'विस्कटलेले घरटे', र. वा. दिघे यांची 'पड रे पाण्या' १९५८, गो. नी. दांडेकर यांची 'माचीवरला बुधा' १९५८, 'पूर्णामांयची लेकरं' १९५८, ना. रा. शेंडे यांची 'तांबडा दगड' १९५८.

रणजित देसाई यांची 'बारी' १९५९, अण्णाभाऊ साठे यांची 'वैर' १९५९, वि. स. खांडेकर यांची 'ययाति' १९५९, अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' १९५९, 'वैजयंता' १९५९ ही एक श्रेष्ठ वाङ्मयीन कलाकृती म्हणून समीक्षकांना खूप आवडली. या कादंबरीविषयी रवींद्र ठाकूर म्हणतात, ''शिक्षण किंवा साहित्य यांची कुठलीही पूर्वपरंपरा नसलेल्या उपेक्षित समाजस्तरात जन्म घेऊन स्वयंप्रेरणेच्या बळावर स्वतःला घडवणारा आणि सर्व प्रकारच्या जीवन संघर्षाला तोंड देत साहित्यक्षेत्रात आपली नाममुद्रा उमटविणारा लक्षणीय लेखक म्हणून अण्णा भाऊ साठे यांचा नामोल्लेख करावा लागेल.'' यानंतर श्री. ना. पेंडसे यांची 'कलंदर', ह. श्री. शेणोलीकर यांची 'मोहित्यांची मंजुळा' १९५९, गो. नी. दांडेकर यांची 'आम्ही भगिरथीचे पुत्र' १९५९, वरखेडकर यांची 'सत्तावनचा सेनानी' १९५९ या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या.

उध्दव शेळके यांची 'धग' १९६० ही वास्तववादी कादंबरी आहे. एकूणच ग्रामीण जीवनाच्या वेदना प्रवाहांचा सर्वसामान्य नायिकेद्वारा 'कौतिक' या शिंपी स्त्रीच्या परिस्थितीशी झुंजण्यातून वेध घेतलेला आहे. रणजित देसाई यांची 'माझा गाव' १९६० या कादंबरीतून माणसांचे शहराकडे चाललेली धाव व खेड्याशी त्याचे तुटणारे नाते ही वास्तव स्थिती याचे वर्णन या कादंबरीमध्ये आले आहे. याशिवाय अण्णाभाऊ साठे यांची 'रूपा' १९६०, 'चंदन' १९६०,

दिनकर देशपांडे यांची 'तपझिरा' १९६०, ग. दि. माडगूळकर यांची 'आकाशाची फुले' १९६०, चंद्रकांत काकोडकर यांची 'अन्नपूर्णा' १९६०, गिरीजा किर यांची 'पूर्णपुरूष' १९६० या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत.

या कालखंडात काही स्त्री लेखिकाही मोठ्या प्रमाणात लेखन करू लागल्या होत्या. स्त्री जीवनातील शोकांतिका, व्यथा, दु:ख, समस्या साहित्यातून व्यक्त करू लागल्या होत्या. स्त्री कादंबरीकार म्हणून विभावरी शिरूरकर यांचा मोठा नावलौकिक आहे. मालती बेडेकर ऊर्फ बाळूताई खरे यांनी विभावरी शिरूरकर या टोपण नावाने १९५० साली 'बळी' ही कादंबरी लिहिली. या कादंबरीतून मांग, गारूडी या आदिवासी जमातीतील समाजाचे दु:ख शब्दबध्द केले आहे. दांडेकर यांनी 'हिरा आणि गारगोटी' १९५० या कादंबरीमधून मुलांचे संगोपन करणे हे आईचे कर्तव्य आहे हा विषय चित्रित केला आहे. सरोजिनी बाबर यांची 'तू भेटायला नको होतास' १९५० ही कादंबरी असून या कादंबरीतून त्यांनी समाजमान्य नसलेले प्रेम मिळायलाच नको असे मत व्यक्त केले आहे. मनोरमा निमकर यांनी 'अखेरची लाट' १९५० या कादंबरीतून जरठकुमारी विवाह व स्त्रीमनाची कुचंबणा व्यक्त केली आहे.

सुमती क्षेत्रमाडे यांची 'आधार' १९५१ या कादंबरीतून आई वडील यांचा आधार नसलेल्या तरूणीची शोकांतिका व्यक्त केली आहे. वसुंधरा पटवर्धन यांची 'प्रीतीची हाक' १९५१, शांता शेळके यांची 'मायेचा पाझर' १९५१ या कादंबऱ्या उदयास आल्या.

विभावरी शिरूरकर यांची 'जाई' १९५१ या कादंबरीतून स्त्री समस्यांचे चित्रण केले आहे. लिला देशमुख यांनी 'मी एकटीच जाणार' १९५२ या कादंबरीतून ध्येयवादी स्त्रीचे विचार व्यक्त केलेले आहेत.

दुर्गा भागवत यांची 'महानदीच्या तीरावर' १९५३ ही कादंबरी गोंड समाजाच्या आदिवासी लोकांच्या जीवनावर आधारलेली आहे. कमला फडके यांची 'भूत' १९५५ साली प्रकाशित झाली.

ज्योत्स्ना देवधर यांची 'घर गंगेच्या काठी', निर्मला देशपांडे यांची 'टिकली एवढे आभाळ', सुलोचना देशमुख यांची 'आदिमाया', गौरी देशपांडे यांची 'निरगाठी', 'थांग', मालतीबाई दांडेकर

यांची 'मातृमंदिर', 'तेजस्विनी', सिंधू गाडगीळ यांची 'क्षितिजापर' इत्यादी स्त्री लेखिकांनी लेखन केले.

या कालखंडातील सामाजिक, राजकीय, आर्थिक, लोकांचे प्रश्न अशा अनेक घटनांनी कादंबरी शद्बबद्ध झाली आहे. मराठी कादंबरीने कृत्रिमता व कल्पनाविलास टाळून वास्तवतेशी नाते जोडले. कल्पनाविलास व रंजनात अडकून न राहता ती माणसातील माणूसपण शोधू लागली. समाज मनाचा ठाव घेऊ लागली.

## ५) १९६० नंतरचे विविध प्रवाह

मराठी वाङ्मयात १९६० नंतर जे नवीन प्रवाह निर्माण झाले त्यांचा विचार करणे आवश्यक आहे. १९५० ते ६० या दशकात झालेले बदल अतिशय तीव्रतेने समोर आले. या काळात कादंबरीचे अनेक प्रवाह निर्माण झाले. त्यामध्ये दलित, ग्रामीण, ऐतिहासिक, पौराणिक, स्त्रीवादी, चरित्रात्मक इत्यादी विविध प्रवाह अनेक दिशांनी विकसित झाले. ते समाजातील निरनिराळ्या सत्य घटनांचा शोध घेऊ लागले. स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिकरणाने शहरे सजू लागली आणि खेडी ओस पडू लागली. ब्रिटीशांच्या काळात ढासळलेली ग्रामीण अर्थव्यवस्था स्वातंत्र्योत्तर काळात अधिकच लयाला गेली. खाणारी तोंडे वाढली. कोरडवाहू शेतीचा भार वाढला. परिणामी ग्रामीण माणूस पोटापाण्यासाठी शहराकडे धाव घेऊ लागला. शहरी संस्कृतीचे जाळे खेड्यापर्यंत पोहोचले. स्वातंत्र्य चळवळ, दलित चळवळ, स्वातंत्र्यप्राप्ती, संयुक्त महाराष्ट्र आंदोलन इ. अनेक गोष्टींचा त्यांच्या जीवनाशी संबंध आलेला नव्हता तरीही त्यांची चाललेली धडपड अतिशय विदारक होती. त्यांना पोटापाण्यासाठी करावा लागणारा आटापीटा अतिशय कष्टकारक होता. काही लोकांची समाजाकडून पिळवणूक होत होती. या सर्व गोष्टींचे वास्तववादी चित्रण आपल्याला या कादंबऱ्यातून पहावयास मिळते. कोणताही विषय वर्ज्य न करता सर्वांगाने लेखन करू लागली. त्यामुळे अनेक प्रवाह निर्माण झाले. या काळातील कादंबरी भूतकाळातील घटनांचा आढावा घेत वर्तमानकाळातील वास्तव घटनांचा वेध घेण्यासाठी सामोरी गेली.

## ड) कादंबरीतील विविध प्रवाह -

### १) रंजनवादी कादंबरी -

रंजनवादी कादंबरीची परंपरा खूप जुनी आहे. सुरूवातीपासून अशा स्वरूपाच्या कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. या कादंबऱ्यांवरती फडके-खांडेकर -माडखोलकर यांच्या रंजनवादी लेखनाचा प्रभाव जाणवतो. या कादंबरीला बहर आला तो हरिभाऊंच्या कालखंडात रंजनवादी कादंबरी हरिभाऊंमुळेच नावारूपाला आली. या कादंबऱ्यांचे स्वरूप कसे असते या संदर्भात भालचंद्र नेमाडे असे म्हणतात, ''ह्या कादंबऱ्या दीर्घकथांकडे झुकतात, कारण यांचे आशयसूत्र एकपदरी असते. संरचन संकुचित असते, कारण विस्तृत संरचनेमुळे सामाजिक आशय आत शिरून ह्या कादंबरीची नाजूक घडी विस्कटण्याची भीती असते. शेवट बंदिस्त असतो. शक्यता आणि असंभवनीयता यांच्यामध्ये ह्या कादंबरीची पात्रे व प्रसंग टिकाव धरून असतात. ती कादंबरीच्या आकृतीच्या गरजेपोटी निर्माण होतात. लैंगिकता व तिच्याशी निगडीत प्रेम, प्रणय, वासना विविध प्रकारच्या शक्यतेतल्या विविध कामविकृती, परपुरूषसंभोग, जबरी संभोग, मारहाण, खूण, आत्महत्या, समूहहिंसा असे ठरीव आशय ह्या प्रवृत्तीत येतात. रीतिनिष्ठ-रूपवादी-आकृतीनिष्ठ-सौंदर्यवादी ह्यांचे मिश्रण असलेल्या मराठी समीक्षतेला ही प्रवृत्ती सर्वश्रेष्ठ वाटते.''[४८] या कादंबरीध्ये लैंगिकता व त्याच्यामुळे निर्माण होणाऱ्या समस्या यांचे वर्णन मोठ्या प्रमाणात केलेले दिसते आणि हे वर्णन करत असताना कोणताही आडपडदा न राखता वास्तव पध्दतीने केले जाते.

श्री. ना. पेंडसे यांनी ग्रामीण जीवन वास्तवाबरोबर रंजनवादी कादंबरी लेखन केलेले आहे. श्री. ना. पेंडसे यांनी 'एल्गार' १९४९, 'हद्दपार' १९५०, 'यशोदा' १९५७, 'गारंबीचा बापू' १९५२, 'रथचक्र' १९६२, 'लव्हाळी' १९६६, 'ऑक्टोपस' १९७२ या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाबरोबर रंजनवादी लेखनही केलेले आढळते.

यांच्यानंतर दुसरे रंजनवादी लेखक म्हणजे गंगाधर गाडगीळ होत. त्यांची 'लिलीचे फूल' १९५५, 'चानी' १९७०, 'पाषाणपालवी' १९७६, 'कोंडुरा' १९६६, 'भागधेय' १९७६, 'चाफा' १९७५ इत्यादी कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या.

अण्णा भाऊ साठे यांच्या 'चित्रा' १९५१, 'फकिरा' १९५९, 'केवड्याचं कणीस' १९६३, 'वैर' १९६४, 'रानगंगा', 'पाझर' १९६५, 'मास्तर' १९६६, 'वारणेचा वाघ' १९६८, 'चिखलातील कमळ' १९७४, 'अलगूज', 'रानबोका', 'अग्निदिव्य' इत्यादी अण्णाभाऊच्या बऱ्याच कथा या तरूण व देखण्या नायिकेभोवती गुंफलेलया असतात. तिच्याकडे वाईट नजरेने पाहणारे पुरूष तिचे रक्षण करणारा प्रियकर हाच या कादंबरीतील संघर्ष असतो. अण्णाभाऊंच्या कादंबरीविषयी रत्नाकर बापू मंचरकर लिहितात, ''अण्णाभाऊंच्या कादंबऱ्यांची बांधणी चिरेबंदी असते. प्रसंगांचा शृंखलाबंध ते नेटकेपणाने गुंफतात. एखाद्या उग्र व क्षोभक प्रसंगाने त्यांचे कथानक गतिमान होते आणि त्या प्रसंगाचे नाणं ओसरत असताना दुसऱ्या तशाच प्रसंगाचे घटनाचक्र गरगरू लागते. या विशिष्ट रचनापद्धतीमुळे कथानकाची गतिमानता, त्यातील उत्कंठा, विस्मय आणि एकसंघपणा या सर्वांचे सातत्य राखले जाते.''[४९] अण्णाभाऊंच्याकडे अनुभवांची मोठी शिदोरी होती. त्यांच्या कादंबरीतील लोक हे तळागाळातील उपेक्षित लोक आहेत. त्यांचे वास्तव जीवन ते जसेच्या तसे रंगविताना दिसतात. अण्णाभाऊंनी साहित्यातील सर्वच प्रवाहामध्ये लेखन करून नावलौकिक प्राप्त केले आहे. त्यांनी जे लेखन केले आहे ते सर्वश्रेष्ठ आहे.

बाबा कदम यांनीही ग्रामीण जीवनाबरोबर रंजनात्मकता कादंबरीमध्ये शद्बबद्ध केली आहे. बाबा कदम यांनी 'प्रलय' १९६२, 'राही' १९६९, 'दगा' १९७४ इ. कादंबऱ्या वेगवेगळ्या पार्श्वभूमीच्या माध्यमातून लिहिल्या आहेत. त्यांच्या कादंबरीत रंजनात्मकता येत असून ग्रामीणता फक्त रंजनमूल्य म्हणून येताना दिसते.

चंद्रकांत काकोडकरांची 'अन्नपूर्णा' १९६० या कादंबरी वासना चाळविणारी शृंगार वर्णनांनी भरलेली आणि योगायोगाच्या वाटेने जाऊन, गोड मिलनाचा मुक्काम गाठणारी आहे. रघुनाथ पाटील यांनी 'मातीत मिळाले मोती' १९७३ या कादंबरीमधून शेतीनिष्ठ नायकाचा आदर्श उभा करण्याचा प्रयत्न, रहस्यगर्भ प्रणयकथेचे वळण शद्बबद्ध केले आहे. देवदत्त पाटील यांची 'संघर्ष' १९७९, 'फेरा' १९७९, 'व्याध' १९८०, 'सिध्दनाथ' १९८० या कादंबऱ्या याच वळणाच्या आहेत. बंकट पाटील यांची 'संधान' १९८० ही कादंबरी तमाशा नाचीचे जीवन चित्रित करते. याशिवाय सुभाष भेंडे, पु. शि. रेगे, भाऊ पाध्ये इत्यादी लेखकांनी तर ज्योत्स्ना देवधर, कुसुम अभ्यंकर सारख्या लेखिकांनीही रंजनवादी कादंबरी लिहिली.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

रंजनवादी कादंबऱ्यामधून लेखकांनी वास्तव घटनांना शद्बबद्ध करण्याचा प्रयत्न केला आहे. वास्तव घटना कितीही तीव्र असली तरी तिला वेगळे वळण देऊन ते कथानक रंजनप्रधान केले आहे. शिकारी गुंडगिरी, वासना विकारांचे थैमान, बलात्कार, विपरीत नातेसंबंध, खून, आत्महत्या, व्यभिचार इ. अनेक गोष्टींचे चित्रण अतिशय वास्तव पध्दतीने करून लोकांचे मनोरंजन करण्याचा प्रयत्न रंजनवादी कादंबरीतून केला जातो.

## २) ऐतिहासिक कादंबरी -

ऐतिहासिक कादंबरी हा प्रकार कादंबरी वाङ्मय प्रकारामध्ये उल्लेखनीय असा प्रवाह ठरला आहे. ऐतिहासिक कादंबरी लिखित आणि स्मृतिरूप अशा दोन्ही इतिहासावर आधारित असते. ऐतिहासिक कादंबरी याविषयी वसंत आबाजी डहाके म्हणतात, ''इतिहास हे एक कथनरूप असते. शिलालेख, ताम्रपट, कागदपत्रे इ. साधनांच्या आधारे ते कथन रचले जाते. इतिहास कथनातील प्रत्येक गोष्ट सत्याच्या कसोटीवर उतरली पाहिजे. असा कटाक्ष असतो. त्यामुळे पुरावे उपलब्ध होत जातात. तस तसे ते लेखन बदलत जाते. पुनर्लेखन केले जाते. इतिहासकारांच्या डोळ्यासमोर सगळा समाज, त्याची विविध अंगे असली तरी त्या त्या कालखंडातल्या असामान्य व्यक्तीला केंद्रस्थानी ठेवूनच इतिहासकथन केले जाते.''[५०]

ऐतिहासिक कादंबरी ही कादंबरी होण्यासाठी मुख्य कथानक, मुख्य पात्र, प्रसंग काल्पनिक असावेत व ती ऐतिहासिक होण्यासाठी पार्श्वभूमी, वातावरण, दुय्यम पात्र, प्रसंग व उपकथानक इ. घटक घटित स्वरूप इतिहाससिध्द असावेत असे मत रूढ आहे. या संदर्भात बालशंकर देशपांडे म्हणतात, ''ऐतिहासिक कादंबरी म्हणून इतिहासावर भर द्यावा तर सर्वसामान्य वाचक तिच्यावर रूक्षतेचा आरोप करतात व रंजनतेवर भर द्यावा तर इतिहासकार ऐतिहासिकतेची गळचेपी झाली. तिच्यावर अन्याय झाला म्हणून तक्रार करतात. इतिहास आणि कल्पना यांचे बेमालूम चित्रण झाले नाही तर लेखकांना दोन्ही प्रकारच्या आरोपांना तोंड द्यावे लागते.''[५१]

समाजातील लोकांच्या मनात सुरूवातीपासूनच ऐतिहासिक शूर वीर युगपुरूषांविषयी व त्यांच्याकडून घडलेल्या इतिहासाविषयी कुतुहल, जिज्ञासा, आदरभाव आहे. त्यामुळे या गतकालीन

घटनांना समाजासमोर आणण्यासाठी त्या घटनांना उजाळा देऊन पराक्रमी पुरूषांची यशोगाथा आदर्श समाजाच्या समोर ठेवण्याच्या उद्देशातून अशा कादंबऱ्यांचे लेखन झाले.

रा. भि. गुंजीकरांची १८७१ साली लिहिलेली 'मोचनगड' ही मराठीतील पहिली ऐतिहासिक कादंबरी होय. या पहिल्याच कादंबरीने ऐतिहासिक कादंबरीचा एक आदर्श निर्माण केला असे म्हटले जाते. गुंजीकरांच्या मागोमाग अव्वल इंग्रजीत ऐतिहासिक कादंबरी लेखनाचे आणखी काही प्रयत्न झाले. यानंतर ना. वि. बापट यांनी 'पहिले बाजीराव साहेब व संभाजी', 'वामनशास्त्री इस्लामपूरकर', 'अविचाराचा परिणाम', वि. धो. कर्वे यांची 'सती राणकदेवी १८९७, म. वि. टिकेकरांची 'गुणवंतराव भाग–१' १८९७, भा. र. दातीर 'जयदेवी' १८९८, अ. ना. भागवत 'पितृबंधनमोचन' १९८९ यांचा उल्लेख करता येतो. याचबरोबर या काळात इंग्रजी, बंगाली, इतिहास कादंबऱ्यांची भाषांतरेही झालीत तसेच आसपासच्या ऐतिहासिक घटनांवर आधारीत काही कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. त्यामध्ये 'ढगांची जबानी' १८८८, 'श्री शिवछत्रपती' १८९३, 'बंडवाल्याची मुलगी', 'रूढं' १८९७, 'रिचर्दाचे चरित्र' १८७४ या अनुवादित कादंबऱ्यांमध्ये द्वा. ना. रणदिवे यांची 'शिक्षक' १८८३, '१८५७ सालच्या बंडाची धामधूम' किंवा 'हंबीरराव आणि पुतळाबाई' १८८५ यांचा समावेश केला जातो.

या प्रवृत्तीमध्ये महत्त्वाचा बदल घडवून आणण्याचे महत्त्वपूर्ण कार्य केले ते ह. ना. आपट्यांची पहिली 'म्हैसूरचा वाघ' १८९० या ऐतिहासिक कादंबरीने केले. त्यानंतर त्यांनी 'उषःकाल' १८९७ 'केवळ स्वराज्यासाठी' १८९३, 'गड आला पण सिंह गेला' १९०३, 'वज्राघात' १९१५ इत्यादी ऐतिहासिक कादंबऱ्या उपलब्ध इतिहास आणि कल्पित मिश्रणातून लिहिल्या.

नाथमाधव यांची 'स्वराज्याची स्थापना', 'स्वराज्याचा कारभार' 'तरूण रजपूत सरदार' १९०९, 'सावळ्या तांडेल, वि. वा. हडप यांची 'पेशवाईची प्राणप्रतिष्ठा', 'शिवशाहीरी पहाट', चि. वि. वैद्य यांची 'दुर्दैवी रंगू' १९१४, ना. ह. आपटे यांच्या 'अजिंक्य तारा' १९०९, 'संधिकाल' १९२२ या कादंबऱ्या ऐतिहासिक स्वरूपाच्या म्हणता येतील.

१९२० पासून पुढे मराठीतील ऐतिहासिक कादंबरीला उतरती कळा लागली. १९२० सालापासून महाराष्ट्रात गांधीवादी विचारसरणी उदयाला आली. १९३५ पासून साम्यवादी वारे वाहू लागले. त्यामुळे अतिशय अल्पप्रमाणात ऐतिहासिक कादंबऱ्यांची निर्मिती झाली. ऐतिहासिक कादंबऱ्यांपेक्षा सामाजिक कादंबऱ्यांची निर्मिती या काळात मोठ्या प्रमाणात झाली.


16594

१९६० नंतर ऐतिहासिक कादंबऱ्यांचे स्वरूप बदलते आणि तिच्यामध्ये इतिहासाबरोबर कलात्मकतेचीही भर पडू लागली. ही कादंबरी ऐतिहासिक वास्तवामधून माणूसपण शोधण्यात यशस्वी झाली. ऐतिहास्कि कादंबरीचा दुसरा कालखंड या कालखंडातले महत्त्वाचे कादंबरीकार म्हणून रणजित देसाई यांचा उल्लेख केला जातो. रणजित देसाई यांची 'स्वामी' १९५९ ही कादंबरी रमा आणि माधवरावांच्या भावजीवनाचा वेध घेते. या कादंबरीविषयी वसंत आबाजी डहाके म्हणतात, ''स्वामीमध्ये गतकाळातील आदर्श म्हणता येईल असा राजा त्यांची राजकीय मूल्यांविषयीची आच आणि त्याच्या एकंदरीत व्यक्तिमत्त्वाला वेढून असलेली परंपरा स्वातंत्र्योत्तर काळातील सत्ता स्पर्धेच्या पार्श्वभूमीवर स्वामीची प्रतिमा उजळ उमटून दिसते.''[५२] याचबरोबर रणजित देसाई यांच्या 'श्रीमान योगी' कादंबरीतून छत्रपती शिवाजी राजांचे अलौकिकत्त्व शद्बबद्ध झाले आहे.

इतिहासात जे खलपुरूष म्हणून प्रसिध्द होते अशा व्यक्तींना न्याय देण्याच्या विचारातून ना. स. इनामदारांनी ऐतिहासिक कादंबऱ्या लिहिल्या गेल्या. स्वामीनंतर ना. स. इनामदार यांच्या 'झुंज' १९६६, 'झेप', 'मंत्रावेगळा यवन', 'राऊ', 'शहेनशहा' इत्यादी कादंबऱ्या उदयास आल्या. त्या कादंबऱ्यांचे एक वैशिष्ट्य म्हणजे त्या कादंबऱ्यामधील व्यक्ती या नियतीशी झुंज देणाऱ्या आहेत.

विश्वास पाटलांची 'पानिपत' ही कादंबरी पेशवाईच्या इतिहासात घडलेल्या क्रांतीकार म्हणून समजल्या गेलेल्या पानिपतच्या लढाईवरती आधारित आहे. तसेच त्यांनी 'संभाजी' व 'महानायक' इ. कादंबऱ्याही लिहिल्या आहेत.

गो नि. दांडेकर यांनी 'बया दार उघड', 'हर हर महादेव', 'दर्या भवानी', 'झुंजार माची', 'हे तो श्रींची इच्छा' या कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यामधून शिवकाल चित्रित केला असून इतर ऐतिहासिक कादंबऱ्यांपेक्षा या भिन्न स्वरूपाच्या आहेत.

शिवाजी सावंत यांनी 'छावा', स. शं. देसाई यांची 'चंबळेच्या पलिकडे', 'महापर्व', कॅप्टन वासुदेव बेलवलकर यांची 'अटकेत रोविले झेंडे', भीमराव कुलकर्णी यांची 'ओंकार', प्रभाकर दिघे यांनी 'संन्यासी', सुशीला खेडेकर यांनी 'शापिता', जनार्दन ओक यांनी 'विजयनगर' अशा प्रकारच्या अनेक ऐतिहासिक कादंबऱ्या या काळात लिहिल्या गेल्या.

### ३) पौराणिक कादंबरी -

ऐतिहासिक कादंबरी आणि पौराणिक कादंबरी यांचे अतिशय जवळचे नाते आहे. कारण ऐतिहासिक कादंबरीमध्ये घडून गेलेल्या घटनांना उजाळा दिला जातो. पात्र, प्रसंग, काल यात बदल न करता तसेच्या तसे वापरले जाते. ऐतिहासिक कादंबरी लेखन पुराव्याशिवाय केले जात नाही. पौराणिक कादंबरीत पात्र, प्रसंग, काल, पुराण, महाभारतातून घेतले जाते परंतु त्याला पुराव्याची आवश्यकता भासत नाही. ठराविक गोष्टी सोडल्या तर इतर बाबतीत थोडाफार बदल केला तरी चालतो. ऐतिहासिक कादंबऱ्यांप्रमाणे पुराव्याची आवश्यकता भासत नाही. ऐतिहासिक व्यक्तीप्रमाणे पौराणिक काळातील व्यक्तीविषयी समाजात एक विशिष्ट मानसिकता तयार झालेली असते. त्यामुळे त्या दृढ कल्पनांना धक्का न लावता त्या आहे त्याच ठेवून इतर ठिकाणी बदल करून कथानकाला वळण देऊन कादंबरीची रचना केली जाते.

पौराणिक कादंबरी ही अद्भूततेकडे आणि वास्तवाकडे जास्त झुकताना दिसते. पौराणिक कादंबरी पुराणातील कथा निवडून लिहिली गेली. मराठीतील बऱ्याचशा पौराणिक कादंबऱ्या दैवतकथांच्या वळणावरच लिहिल्या गेल्या. रामायण, महाभारत, महाकाव्ये, पुराणे म्हणजे अद्भूतरम्य कल्पनाकथा नसतात तर त्यांच्या निर्मितीमागे सार्वकालिक नैतिक व सामाजिक मूल्यविचार असतो. पौराणिक कादंबऱ्या या रामायण, महाभारत, भागवतपुराण यातील काही पात्रे प्रसंग घेऊन त्याला नवीन परिमाण देऊन साकार केल्या जातात आणि नव्याने त्या वाचकांसमोर चित्रित करण्याचा प्रयत्न केला जातो. पौराणिक कादंबऱ्यांच्या संदर्भात वाङ्मयीन संज्ञा व संकल्पना कोशात असे म्हटले आहे. ''पौराणिक कथेवर आधारलेली पौराणिक कादंबरी म्हणजे मुळातच परिपूर्ण कलारूप पावलेल्या अनुभवांचे पुर्नसंघटन असते. एका निर्मितीची ती पुनर्निर्मिती असते.''[५६] त्यांच्या या मतानुसार ही कादंबरी जुन्या गोष्टींना नवे संदर्भ देऊन नव्याने साकार होताना दिसते.

श्री. प्रभाकर यांची 'सावित्री सत्यवान' १९११ ही कादंबरी याच वळणाची आहे. ना. के. बेहरे यांनी 'सीतावनवास' व 'अहिल्योध्दार', वा. म. जोशी यांनी 'आश्रमहरिणी', साने गुरुजी यांनी 'अस्तिक' १९४०, र. वा. दिघे यांची 'गानलुब्धा', 'मृगनयना' १९४७ इत्यादी कादंबऱ्या पौराणिक विषयावरती लिहिल्या.

वि. स. खांडेकरांच्या 'ययाती' १९५९ या कादंबरीमुळे पौराणिक कादंबरीला भरपूर यश मिळाले. तेव्हापासून पौराणिक कादंबरी हा प्रवाह नावारूपाला आला. ययाती ही कादंबरी स्वत: खांडेकरांनी प्रस्तावनेत म्हटल्याप्रमाणे ययातीची कामकथा आहे. देवयानीची संसारकथा आहे. शर्मिष्ठेची प्रेमकथा आहे आणि कचाची भक्ति गाथा आहे. परंपरेने चालत आलेल्या संस्कृतीकडे पाठ फिरवून आधुनिक परंपरेला, भोगवादाला जवळ करणाऱ्या लोकांना संयमाचा संदेश देणे हा या कादंबरीचा उद्देश आहे.

शिवाजी सावंत यांची 'मृत्युंजय', रणजित देसाई यांची 'राधेय', आनंद महाले यांची 'महापुरूष', गो. नि. दांडेकरांची 'कर्णायन' इत्यादी कादंबऱ्या महाभारतातील कर्णाच्या जीवनावर प्रकाश टाकणाऱ्या आहेत. प्रत्येक लेखकांनी आपल्या मनातील कर्णाचे वर्णन कादंबऱ्यातून शब्दबध्द केलेले आहे. शूर, उदार, पराक्रमी, देखणा, दानशूर, सर्वगुणसंपन्न, स्वचा शोध घेताना प्रत्यक्ष हकीकत काय आहे हे त्याला समजते. तेव्हा वेळ निघून गेलेली असते. अशा कर्णाचे वर्णन करण्याचा प्रयत्न या कादंबरीतून झाला आहे.

अरूण साधले यांची दुसरी कादंबरी 'वैदेही' या कादंबरीतून सीतेच्या जीवनाची कथा आलेली आहे. पद्माकर गोवईकर यांनी 'मुंगी उडाली आकाशी' या कादंबरीतून संत ज्ञानेश्वरांचे जीवन शब्दबध्द करण्याचा प्रयत्न केला आहे. गो. नि. दांडेकरांनी 'मोगरा फुलला' या कादंबरीतून ज्ञानेश्वरांची भक्तिगाथा वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न केला आहे. दि. बा. मोकाशी यांची 'आनंदओवरी' ही कादंबरी पौराणिक कादंबरीतील वैशिष्ट्यपूर्ण कादंबरी आहे. या कादंबरीतून संत तुकारामांच्या जीवनाची कथा सांगण्याचा प्रयत्न केला आहे.

विजया जहागिरदार यांनी 'ययाती कन्या माधवी' या कादंबरीतून पुरूषांकडून स्त्रियांवर होणाऱ्या अन्यायाची व्यथा वर्णन केली आहे. याशिवाय मा. श्री. परांजपे यांची 'युगावेगळा', सुमती क्षेत्रमाडे यांची 'याज्ञसेनी', योगेश्वर कृष्ण यांची 'सत्यप्रिय गांधारी', शशिकांत देशपांडे यांची 'एकलीच दीपकळी', शरद दळवी यांची 'एकलव्य', बा. भ. बोरकर यांची 'प्रियकामा', म. वि. गोखले यांची 'भीष्म', नरेंद्र सिदकर यांची 'ध्वजदंड', अनंत काम यांची 'विसर्जन', रवींद्र भट यांची 'भगिरथ', सरोजिनी शारंगपाणी यांची 'गांधारी', रवींद्र शोभणे

यांची 'उत्तरायण', अनंत मनोहर यांची 'ज्येष्ठ', काका विधाते यांची 'दुर्योधन', तारा वनारसे यांची 'श्यामिनी', आशा बगे यांची 'कुरूक्षेत्र', शिवाजी सावंत यांची 'युगंधर', लक्ष्मीकांत तांबोळी यांची 'अंबा', 'गंधकाली', रवींद्र ठाकूर यांची 'धर्मयुध्द' इत्यादी अनेक कादंबऱ्याचा उल्लेख करता येतो. या पौराणिक कादंबऱ्यांच्या यशाचे कारण सांगताना अविनाश सप्रे म्हणतात, ''जिथे विचारांपेक्षा भावनेला, शोधापेक्षा रंजकतेला आणि बदलापेक्षा आहे तेच टिकवू पाहण्याकडे कल असतो. त्या आपल्या समाज रचनेत प्राक्कथांकडे बघण्याचा दृष्टिकोनही परंपरेपलिकडे जाण्यापेक्षा परंपरेच्या उदात्तीकरणाकडेच आणि जीवनातील गहन,गूढ समस्यांना या परंपरेतून रेडिमेड उत्तर शोधून देण्याकडेच झुकलेला दिसतो आणि त्याचा फार मोठा परिणाम आणि फायदा लेखकाना मिळत असतो.''[५७] हेच पौराणिक कादंबरीच्या यशामागचे कारण आहे. जुन्या गोष्टीला नवा साज चढवून शेवटी सादर करण्याचा प्रयत्न पौराणिक कादंबरीत केला जातो.

## ४) चरित्रात्मक कादंबरी :-

चरित्रात्मक कादंबरीत ज्या व्यक्तीवर कादंबरी लिहायची आहे त्या व्यक्तीला अधिक प्राधान्य असते. ती व्यक्ती हीच या कादंबरीचा केंद्रबिंदू असते. चरित्रात्मक कादंबरीतून कादंबरीकार त्या व्यक्तीच्या जन्मापासून मरेपर्यंतचा संपूर्ण जीवनपटच वास्तव स्वरूपात कादंबरीतून शब्दबध्द करत असतो. चरित्रात्मक कादंबरी लिहिताना लेखकाला एकाच वेळी संशोधन आणि सृजन ह्या दोन पातळ्यावर कामकरावे लागते. तसेच काळानुसार सत्यघटना, कल्पकता, चिंतनशीलता इ. गोष्टीची आवश्यकता असते. चरित्रात्मक कादंबरी लिहिणे म्हणजे नेमके काय करणे याविषयी अविनाश सप्रे लिहितात, ''चरित्रात्मक कादंबरी लिहिणे म्हणजे एखाद्या व्यक्तीचे निव्वळ चरित्र मांडणे नव्हे तर एक कलावंत म्हणून अशा चरित्रातून उपलब्ध झालेल्या घटनांच्या आधारे एक सुसंगत मानवी व्यक्तिमत्व साकार करणे आणि त्या व्यक्तीच्या जगण्यामागच्या प्रेरणांचा अर्थ शोधणे. चरित्रामध्ये प्रामुख्याने घटनांची तार्किक मांडणी करून एकसत्य शोधण्याकडे लेखकाचा कल असतो. तर अशा चरित्रांवर आधारलेल्या कादंबरीत सत्यापेक्षा कल्पितांच्या आधारे मानवी व्यक्तिमत्व उभी करण्याची

दृष्टी अभिप्रेत असते. चरित्र नायकाच्या जीवनातील अनाकलनीय जागांचे काही एक आकलन देण्याचा प्रयत्न लेखक करीत असतो.''[५३]

राष्ट्रपुरूषांवरील पहिली चरित्रात्मक कादंबरी लिहिण्याचा मान भा. द. खेर यांना मिळतो. या चरित्रात्मक कादंबरीच्या संदर्भात भा. द. खेर म्हणतात, ''१९६१ साली काहीशी मरगळलेली अवस्था निर्माण झाली. साहित्याला तोचतोचपणा आलेला होता. केवळ जुन्यावरच नवे बुरखे चढविले जात होते. अशा वेळी आयर्विन स्टोन' ह्यांची जस्ट फॉर लाईफ ही चरित्रात्मक कादंबरी लिहिण्याचा संकल्प मी सोडला.''[५४] ही भा. द. खेर यांची मराठीतील पहिली चरित्रात्मक कादंबरी म्हणता येईल. रणजित देसाई यांची 'स्वामी' १९६२ ही ऐतिहासिक स्वरूपातील पहिली चरित्रात्मक कादंबरी मानली जाते. सामाजिक स्वरूपातील पहिली चरित्रात्मक कादंबरी म्हणून श्री. व. जोशी यांच्या 'आनंदी गोपाळ' १९६८ या कादंबरीचा उल्लेख केला जातो.

भा. द. खेर यांनी 'यज्ञ' या कादंबरीतून अखंड स्वराज्याचे स्वप्न बाळगणाऱ्या स्वातंत्र्यवीर सावरकरांचे चित्र रेखाटले आहे. 'अमृतपुत्र' १९७० या कादंबरीतून त्यांनी 'जय जवान, जय किसान'च्या घोषणेने संपूर्ण भारत हादरून टाकणाऱ्या लालबहादूर शास्त्री यांच्या जीवनचरित्राची कहाणी चित्रित केली आहे. मृणालिनी देसाई यांच्या 'पुत्र मानवाचा' १९६९ या कादंबरीत गांधीजींच्या जीवनाचे आदर्शवादी दृष्टिकोनातून चित्रण केले आहे. गंगाधर गाडगीळ यांनी लोकमान्य टिळकांच्या जीवनावर 'दुर्दम्य' १९७१ मध्ये ही कादंबरी दोन खंडात लिहिली असून त्यामध्ये लोकमान्यांच्या दुर्दम्य जीवनाचे दर्शन घडते. ज्योत्स्ना देवधर यांच्या 'उत्तर योगी' १९७३ या कादंबरीतून महायोगी अरविंद घोष यांच्या क्रांतीकारी लढ्याचे, देशासाठी केलेल्या त्यागाचे वर्णन येते. 'शिका, संघटित व्हा आणि संघर्ष करा' असा कानमंत्र देणारे 'डॉ. बाबासाहेब आंबेडकर' यांनी केलेल्या कार्याचे चित्रण भा. द. खेर – 'प्रबुध्द', हरिभाऊ पगारे – 'युगप्रवर्तक', बा. स. हाटे – 'युगंधर' या कादंबरीतून पहावयास मिळते. रमाबाई आणि आंबेडकर यांच्या असाधारण कार्याचे वर्णन 'बंधूमाधव', यशवंत मनोहर – 'रमाई', नाना ढाकुलकर – 'रमाई भीमाई' या कादंबऱ्यातून पहावयास मिळते. हि. गो. बनसोडे

यांनी 'आभाळाएवढी' या कादंबरीतून सावित्रीबाई फुले यांच्या कार्याचा गौरव केला आहे. रवींद्र ठाकूर – 'महात्मा' १९९९, अनिरूध्द पुनर्वसू –'प्रभंजन' यात महात्मा फुले यांचे जीवनचरित्र रचलेले आहे. 'जीवन स्वप्न' १९७५ ही समुती क्षेत्रमाडे यांची कादंबरी शरद बाबूंच्या जीवनाचे दर्शन घडवते. उध्दव शेळके यांनी 'साहेब' या कादंबरीतून आचार्य अत्रे यांचे जीवनचरित्र रंगवले आहे. तर अत्रे यांनी 'मन:पूत' या कादंबरीतून पु. भा. भावे यांचे चरित्र स्पष्ट केले आहे. वि. ग. कानिटकर यांची 'होरपळ' या कादंबरीतून नीलकंठ शास्त्री गोऱ्हे नावाच्या ब्राम्हणाच्या जीवनाची होरपळ येथे चित्रित करण्यात आली आहे. अविनाश सप्रे या कादंबरीविषयी लिहितात, ''वि. ग. कानिटकर यांची 'होरपळ' १९७१ ही चरित्रात्मक कादंबरी लेखनातील एक अर्थपूर्ण प्रयोग म्हणून या कादंबरीचा अवश्य उल्लेख करावा लागेल.''[५५]

'वादळातील दीपस्तंभ' १९८९ या कादंबरीतून गो. वि. दांडेकर यांनी समाजसेवी डॉक्टरांचे चरित्र रेखाटले आहे. रविंद्र भट यांची 'सत्यम् शिवम् सुंदरम्' ही कादंबरी स्वामी विवेकानंदांच्या जीवनातील प्रसंगावर आहे. विश्वास पाटील यांनी सुभाषचंद्र बोस यांच्या जीवन कार्याचा आढावा 'महानायक' मध्ये घेतला आहे. अनंत घोडे – 'डोंगरचे राजे', चंद्रकांत खोत यांनी आपल्या 'बिंब प्रतिबिंब' या कादंबरीतून विवेकानंद आणि रामकृष्ण परमहंस यांचे चरित्र शब्दबध्द केले आहे. भा. द. खेर यांनी 'चार्ली चॅप्लिन' यांच्या जीवनाचे दर्शन घडविले. विठ्ठल वाघ यांनी 'डेबू' या कादंबरीतून गाडगे महाराजांच्या कार्याचे वर्णन केले आहे. तर मधुकर केचे यांनी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या जीवनकार्याचा आढावा 'मोती ज्यांच्या पोटी' या कादंबरीमध्ये घेतला आहे. चंद्रकांत खोत यांची 'शेजारी' ही कादंबरी रामकृष्ण परमहंस आणि शारदादेवी यांच्या जीवनावरती आहे. चंद्रकांत खोत यांच्या 'संन्याशाची सावली'मध्ये भगिनी निवेदिता यांचे जीवन येते. 'ऐलतटावर' या विद्याधर भागवत यांच्या कादंबऱ्यातून बालकवी यांच्या जीवनातील अनेक प्रसंग आले आहेत.

इत्यादी अनेक चरित्रात्मक कादंबऱ्या या कालखंडात लिहिल्या गेल्या. या कालखंडाला आकार देण्यामध्ये, घडविण्यामध्ये या कादंबरीमधील विभूतींचे कार्य अनमोल आहे.

५) स्त्रीलिखित कादंबरी

एकोणिसाव्या शतकानंतर देशात समानतेचे वारे वाहू लागले होते. स्त्रीच्या अस्तित्वाविषयी समाजात जागृती निर्माण झाली होती. या जागृतीमुळे स्त्रियांचे प्रश्न समाजासमोर येऊ लागले होते. याचाच परिणामामुळे स्त्री शिक्षण, बालविवाह बंदी, विधवा पुनर्विवाह, बाल जरठ विवाह, मुलंची हत्या इत्यादी समाजसुधारकांना प्रोत्साहन मिळून या प्रथा बंद पाडण्यात येऊ लागल्या. महात्मा फुले यांनी आपल्या पत्नी सावित्रीबाई फुले यांच्या मदतीने मुलींसाठी स्वतंत्र शाळा सुरू केल्या. त्यामुळे स्त्री सुशिक्षित झाली. लिहू लागली, वाचू लागली. या प्रेरणेतून स्त्रीने आपल्यावर होणारा अन्याय, अत्याचार, समस्या, शब्दांच्या माध्यमातून शब्दबध्द करू लागली. यासाठी त्यांना कादंबरी हा साहित्यप्रकार अधिक जवळचा सोयीस्कर वाटला असावा. त्यामुळे स्त्रियांनी कादंबरी या साहित्य प्रकारातून मोठ्या प्रमाणात लेखन केले आहे.

'चंद्रप्रभाविरहवर्णन' १८७३ ही साळूबाई तांबवेकरांची स्त्रियाविषयीची पहिली कादंबरी होय. यानंतर हरिभाऊ आपटे यांच्या प्रोत्साहनामुळे काशीबाई कानिटकरांनी 'रंगराव' १९०३ या कादंबरीतून स्त्रीशिक्षणाची आवश्यकता प्रतिादन केली आहे. त्यांची दुसरी कादंबरी 'पालखीचा गोंडा' १९२८ ही आहे. जानकीबाई देसाई यांनी हुंडा पध्दतीचा तीव्रतेने निषेध करण्यासाठी 'गृहलक्ष्मी' १९१५, स्त्रीधर्म सांगण्यासाठी 'प्रेमळ सवत' १९१७, 'सौभाग्यतिलक' १९१८, 'पतिव्रत्याची कसोटी' १९१९, या कादंबऱ्या लिहिल्या. यशोदाबाई भट लिखित 'मुलांचे बंड' १९२१ या कादंबरीतून विधवांची दुःखमय स्थिती वर्णन केली आहे. शांताबाई नाशिककर यांची 'हाच का धर्म' १९३० मधून हिंदू धर्मातील चालीरितींचा निषेध केला आहे. 'लग्नाचा बाजार' १९२९ कादंबरीतून शिकलेल्या पण उशिरापर्यंत लग्न न जमलेल्या मुलींची व्यथा सांगितली आहे. गीता साने यांची 'हिरवळीखाली' १९२६, 'वठलेला वृक्ष' १९३६ मधून विमल या नायिकेचे दारिद्रयाचे, नवऱ्याच्या बेजबाबदार वर्तनाचे, वर्चस्वाचे चटके सोसावे लागतात याचे चित्रण केले आहे. घटस्फोटाची व पोटगीची मागणी आग्रहपूर्वक प्रतिपादन करण्यासाठी कमलाबाई बंबेवाले यांची 'बंधमुक्ता' १९३० ही कादंबरी लिहिली. इंदिरा सहस्त्रबुध्दे यांची

'बाळुताई धडा घे' १९३१ ही कादंबरी स्त्री–पुरूष समानतेचा पुरस्कार करण्याच्या हेतूने लिहिली आहे. इंदिराबाई आंबेगावकर यांनी लिहिलेली 'उजळलेला हिरा' १९३१ या कादंबरीतून पुरूषांकडून स्त्रियांनी सर्व हक्क भांडून परत घेतले पाहिजेत असे वर्णन येते. कुमुदिनी प्रभावळकर यांची 'कर्तव्याची जाणीव' १९३२ या कादंबरीतून पालकांनी मुलांच्याही मताचा विचार करावा हे मत स्पष्ट केले आहे. तसेच 'निर्माल्यातील कळी' १९३२, 'अनियमित जग' १९३४ या कादंबऱ्यातून तत्कालीन सामाजिक प्रवृत्ती चित्रित केल्या आहेत. 'निर्माल्यातील कळी' या कादंबरीतून वेश्या जीवनाचे चित्रण केले आहे तर 'अनियमित जग' ही कादंबरी स्त्रीवर्गामध्ये गरीब, श्रीमंत भेद केले जातात याचे वर्णन करते. इंदिरा सहस्त्रबुध्दे यांची 'बाळुताई धडा घे' १९३१ ही कादंबरी स्त्री–पुरुष समानतेचा पुरस्कार करण्याच्या हेतूने लिहिली आहे. इंदिराबाई आंबेगावकर यांनी लिहिलेली 'उजळलेला हिरा' १९३१ ही कादंबरी पुरूषांकडून स्त्रियांनी सर्व हक्क भांडून परत घेतले पाहिजेत असे मत व्यक्त करते. कुमुदिनी प्रभावळकर यांची 'कर्तव्याची जाणीव' १९३२ ही कादंबरी वेश्या जीवनाचे चित्रण करते.

आनंदीबाई जयवंत यांची 'कुलकथा' १९३२, 'जगाची बंडखोरी' १९३५ या कादंबऱ्या समाजप्रवृत्तीशी निगडीत आहेत. विभावरी शिरूरकरांची 'हिंदोळ्यावर' या कादंबरीतून स्त्री विवाहबाह्य संबंध ठेवल्यामुळे त्यातून मुलाला जन्म दिल्यामुळे तिला किती संकटांना तोंड द्यावे लागते याचे चित्रण आले आहे. यानंतरच्या कादंबऱ्या 'बळी' १९५०, 'विरलेले स्वप्न' १९३५ इ. महत्वपूर्ण कादंबऱ्या आहेत.

याशिवाय सरोजिनी बाबर यांची 'तू भेटायला नको होतास', मालूबाई दांडेकर लिखित 'हिरा आणि गारगोटी', प्रेमा कंटक यांची 'काम आणि कामिनी', 'अग्नियान' १९४२, शकुंतला परांजपे यांची 'त्याचा मालक' १९४८, मालतीबाई दांडेकरांची 'काटेरी मार्ग' १९४८, गीता साने, कृष्णाबाई मोरे, आनंदीबाई विजापुरे, मनोरमा निमकर इ. अनेक लेखिकांनी गरीब, दु:खी, अडचणीत सापडलेल्या स्त्रियांचे त्यांच्या विविध समस्यांचे चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे.



BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

या सर्व लेखिकांनी जे वाईट होते, नको होते, चुकीचे होते, जुन्या नव्या गोष्टींच्या माध्यमातून मनात जे विचार घोळत होते. ते अतिशय वास्तवपध्दतीने शब्दबध्द करण्याचा प्रयत्न करून वाचकांना अंतर्मुख विचारप्रवृत्त केले. या काळातील स्त्री लेखिकांच्या लेखनाविषयी रेखा इनामदार साने म्हणतात की, ''या साऱ्या लेखिकांच्या कादंबरी लिहिण्यामागच्या प्रेरणा सच्या होत्या जे सलत, खुपत होते, जुन्या नव्या विचारांची जी आंदोलने मनात काही ना काही निमित्ताने उठून घालमेल होत होती. ती सचोटीने व मन:पूर्वकतेने शब्दांकित करण्याचा प्रयत्न लेखिकांनी केला.''[५८] अशा स्वरूपाची कादंबरी या कालखंडात उदयास आली.

१९६० नंतर सामाजिक, राजकीय, आर्थिक, समस्या महायुध्दाचे परिणाम, भडकलेली महागाई, वाढलेली बेकारी, औद्योगिक क्रांती, स्त्रीस्वातंत्र्य, स्त्रीमुक्ती चळवळ, स्त्री समस्या, या समस्येतून सुटका करून घेण्याचे प्रयत्न या घटना केवळ घटनाच राहात नाहीत तर त्यांचा अवतीभवतीच्या जीवनावर परिणाम होत असतो. याच घटना कादंबरीतून शद्बबद्ध होत असतात. तसेच इतरही अनेक गोष्टींचा प्रभाव या कादंबरीवर पडलेला दिसतो.

विभावरी शिरूरकर यांची 'बळी' नंतरची दुसरी कादंबरी 'उमा' १९६६ मध्ये प्रकाशित झाली. या कादंबरीतून स्त्री मनाच्या वेदना प्रकट झाल्या आहेत. ज्योत्स्ना देवधर यांनी 'कल्याणी' १९६८ या कादंबरीतून परंपरेने वैधव्य आलेल्या घरावर प्रकाश टाकते. 'कुँवरनी' १९७१ या कादंबरीतून पुरूषी संस्कार झाल्यामुळे स्त्री पुढे येणाऱ्या समस्यांचे चित्रण केले आहे. 'बुटक्या सावल्या' १९८५ या कादंबरीतून कौटुंबिक जीवनात अयशस्वी असलेल्या नायिकेची कथा आहे. 'उणे एक' १९८९ कादंबरीतून आधुनिक जगातही कुणीच सर्वसुखी नाही प्रत्येकाच्या जीवनात काही तरी दु:ख आहे. हे वास्तव येथे शद्बबद्ध केले आहे. याशिवाय 'सजेदा' १९७२, 'वाळूचे फूल' १९७३, 'चिमणीचं घर मेणाचं' १९७५, 'पडझड' १९७९, 'ऐलतीर पैलतीर' १९७६, 'हो नाहीच्या उंबरठ्यावर' १९६८ या कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. पारंपारिक कौटुंबिक जीवनाच्या चित्रणातून रंजनप्रधान कादंबरीचा पटच स्पष्ट होताना दिसतो.

गौरी देशपांडे यांची कादंबरी स्त्री जीवनातील सामाजिक, सांस्कृतिक, मानसिक, तात्विक, आर्थिक, घटना विविध पातळ्यांवरून झगडून दाखविण्याचा प्रयत्न करते. यांच्या

कादंबरीतील स्त्री ही शिकलेली, धीट, बंडखोर, स्वतंत्र, आधुनिक विचारांची आहे. त्यांची 'मध्य लटपटीत' १९७६ ही कादंबरी मध्यमवर्गीय पाश्चात्य देशातील सौंदर्य चित्र व त्याविषयी तिला वाटणारी किळस यांचे चित्रण या कादंबरीतून केले आहे. त्यांची दुसरी कादंबरी 'एकेक पान गळावया' १९८० ह्या कादंबरीतून स्त्री स्वातंत्र्यवादी व स्वच्छंदी जीवन जगणाऱ्या स्त्रीच्या नशिबी शेवटी एकटेपणा कसा येतो याचे चित्रण आलेले आहे. 'थांग' १९८६ ही कादंबरी आजच्या समाजात मित्रसंस्कृती नावाची नवीन बाब उदयाला आली आहे व त्यामुळे स्त्री पुरूषांच्या मनात कमालीची अस्वस्थता निर्माण झाली आहे. हे या कादंबरीमध्ये स्पष्ट दिसते. 'निरगाठी' १९८७ कादंबरी मायलेकीतील संघर्ष हाच कादंबरी कथानकाचा मुख्य धागा आहे. 'दुस्तर हा घाट' १९८९ बदलत्या परिस्थितीमुळे संसार हा तरूणींना दुस्तर घाट वाटतो हे या कादंबरीतून पटविण्याचा प्रयत्न लेखिकेने केला ओह. 'गोफ' १९९९ कादंबरीतून सासू-सून यांच्या संबंधातील गोफ हळूवारपणे गुंफलेला असून त्यांच्यातही संवादाचे मायेचे भावबंध असू शकतात हे पटवण्याचा प्रयत्न केला आहे. याशिवाय 'चंद्रिके गं सारिके गं', 'काही दूरपर्यत तेरूओ' या लघु कादंबऱ्या लिहिल्या या लघु कादंबऱ्यातून येणाऱ्या स्त्रीच्या संदर्भात अविनाश सप्रे म्हणतात, ''जीवनविषयक आकलनाचा आणि शोधाचा केंद्रबिंदू स्त्री हाच आहे. ही स्त्री आधुनिक आहे, स्वतंत्र आणि मुक्त अशा आत्मप्रेरणांना धीटपणे स्वीकारणारी ही स्त्री आहे. व्यक्तिस्वातंत्र्य हे मूल्य जबाबदारीने गौरी देशपांडे प्रक्षेपित करतात.''[५९] देशपांडे यांच्या कादंबरीतील स्त्री स्त्रीस्वातंत्र्याचा पुरस्कार करणारी आहे. या गोष्टीमुळेच गौरी देशपांडे यांच्या कादंबऱ्याना मराठी साहित्यात वेगळे स्थान आहे.

सुमती क्षेत्रमाडे यांची 'पांचाली' १९७३ या कादंबरीतून तरूणीचे प्रेमप्रकरण फसल्यानंतरही ती संसारी जीवनात यशस्वी होताना दिसते. 'सत्यप्रिय गांधारी' १९८७ ही कादंबरी महाभारतातील धृतराष्ट्र कुंती यांचे आश्रमातील प्रसंग वर्णन केले आहेत. 'याज्ञसेनी' १९८८ ही कादंबरी महाभारतातील द्रौपदीच्या व्यक्तिरेखेवर प्रकाश टाकते. 'नल दमयंती' १९९० या कादंबरीतून नल व दमयंती प्रेमकथा आली आहे. 'महाश्वेता' १९९५ कादंबरीतून शरीरावर कोड फुटलेली मुलगी संसारातून कशी उध्वस्त होते याचे अतिशय वेधक चित्रण केले आहे.

लीला श्रीवास्तव यांची 'पाया पोखरलेले घर' १९७० कादंबरीमध्ये प्रेमाचा त्रिकोण दिसतो. 'दोन पायांची जनावरं' १९७१ ही कादंबरी पुरूषांची मर्यादा दाखवते. 'गढूळ पाण्यातील मासोळ्या' १९७१ कादंबरीतून वेश्याव्यवसाय करणाऱ्या दुर्दैवी स्त्रीची कहाणी येते. 'एक मासोळी सात समुद्र' १९७२ कादंबरीतून उच्चशिक्षित स्त्रीच्या वर्तणुकीचे वर्णन आले आहे. 'दोघी' १९७५ या कादंबरीतून आई व मुलगी यांच्या जीवनाची कथा येते.

मृणालिनी देसाई यांनी 'पुत्र मानवाचा' १९६९ ही कादंबरी गांधीजींच्या विचारांचे व त्यांच्या कार्याचे पुन:स्मरण करून देण्यासाठी लेखिकेने ही कादंबरी लिहिली. 'बिल्वदल' १९७५ या कादंबरीतून अहिल्याबाई होळकर यांचा जीवनपट साकारलेला आहे.

कमल देसाई यांची 'काळा सूर्य' १९७५ ही कादंबरी बालपणापासून विक्षिप्त जगावेगळे जीवन जगणाऱ्या मीरा नावाच्या मुलीची जीवनकहाणी असून समाजाने वाईट म्हटल्या गेलेल्या लोकांसोबत ती राहाते. 'हॅट घालणारी बाई' १९७५ या कादंबरीतून स्मृतीभ्रंश झालेल्या एका स्त्रीची शोकांतिका रेखाटण्याचा प्रयत्न केला आहे. 'रात्रंदिन आम्हा' १९८४ मध्ये राजकारण आले आहे. कमल देसाई यांच्या कादंबरीविषयी अविनाश सप्रे म्हणतात, ''कमल देसाईची प्रतिभा विलक्षण आहे. जाणिवेकडून नेणिवेकडे झेपावण्याचे सामर्थ्य या प्रतिभेत आहे. कौटुंबिक कथातून अस्तित्वाच्या चिरंतन आणि मुलभूत प्रश्नांचा तणाव ही प्रतिभा घेऊ शकते. माणसाला घेरणाऱ्या सर्वव्यापी दु:खाचा शोध तिच्यात आहे. आयुष्य अनाकलनीय आहे अशी धारणा त्यामागे आहे. म्हणजे या सर्व मुलभूत शोधाच्या केंद्रस्थानी स्त्री आहे.''[६०] देसाई यांच्या कादंबऱ्या तसे समजायला अवघड आहेत पण जीवनाच्या मूलस्थानापर्यंत वाचकाला नेऊन त्याचे अस्तित्व प्रगल्भ करण्याचे सामर्थ्य संस्कार त्यांच्या वाचनातन मिळते. तसेच त्यांनी अत्यंत मोजके लेखन केले आहे.

याशिवाय आशा बगे, निर्मला देशपांडे, शुभांगी भडभडे, लिला गोळे, गिरीजाबाई, अंजली संभ्रम, गीता मंगेशकर, सुलोचना देशमुख, शैलजा राजे, सुमती देशपांडे, सानिया, शांता गोखले, भा. द. खेर, शांता शेळके इत्यादी लेखिकांनीही या कालखंडात लेखन केलेले दिसते. या कादंबऱ्यांमध्ये स्त्री लेखिकांनी स्त्रीयांचे प्रश्न, समस्या त्यांच्यावरती होणाऱ्या अन्यायाला

वाचा फोडली आहे. म्हणून अविनाश सप्रे म्हणतात, ''एकंदरीत गेल्या पन्नास वर्षात लेखिकांनी त्यांच्या नजरेने पाहिलेले जग आहे. आधुनिक जीवनपध्दतीचे उत्पन्न झालेले पेच मांडण्याचा त्या प्रयत्न करतात. आधुनिक जगाचा आवाका फार विस्तारलेला नाही परंतु त्यांच्या लेखनाला ज्या मर्यादा पडतात, त्या आपल्या सामाजिक परिस्थितीचा परिपाक आहेत असे म्हणावेसे वाटते.''[६१]

स्वातंत्र्यपूर्वकाळातील स्त्रीलिखित कादंबरी बाळबोध आणि सरधोपट स्वरूपाची असून सामाजिक प्रश्नांना वास्तवात आणण्याचा प्रयत्न केला. ज्या काळात फडके, खांडेकरांसारखे लेखक प्रेमकथांची बेगडी दुनिया रंगवित होते त्या काळात लेखिका स्त्रियांचे प्रश्न मांडत होत्या. स्वातंत्र्योत्तर कालखंडात तो प्रवाह बदलू लागला होता. परंतु स्त्री शिक्षणाचे प्रमाण एवढे वाढूनही ते फारसे घडलेले दिसत नाही. आणि जे घडले ते मनोरंजनाच्या माध्यमातून आणि जे घडले तेही रंजनानुकूल पध्दतीने. स्त्री जीवनातील बदलत्या वाढत्या, गुंतागुंतीच्या होत गेलेल्या प्रश्नांचा वापर कादंबरी लिहिण्यासाठी केला जातो.

## ६) दलित कादंबरी

मराठी साहित्यात स्वातंत्र्यप्राप्तीनंतरच्या कालखंडात अनेक वाङ्मयप्रवाह निर्माण झाले असून त्यातील 'दलित साहित्याचा' एक जोमदार प्रवाह वाचकांचे व समीक्षकांचे लक्ष वेधून घेताना दिसतो. या साहित्यनिर्मितीमागे महात्मा फुले, शाहू महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या वैचारिक आंदोलनाची तेजस्वी प्रेरणा आहे. त्यातून निर्माण झालेले दलित साहित्य म्हणजे एक सांस्कृतिक चळवळ असून तिचा सरळ संबंध सामाजिक परिवर्तनाशी आहे. तळागाळातील सर्वसामान्य लोकांपर्यंत ज्ञान पोहोचू लागले होते. त्यामुळे अशिक्षित मागासलेला उपेक्षित समाजातील तरूण वर्ग सुशिक्षित झाला. लिहू, वाचू लागला. तेव्हा त्यांच्या लक्षात आले की, आपल्या समाजाच्या ज्या काही व्यथा, वेदना, समस्या, दु:ख आहेत त्या या साहित्यामध्ये नाहीत. दलित नायकांनी शिक्षण घेतल्यामुळे आजपर्यंतच्या जीवनात जे जगले, सोसले, भोगले ते आत्मनिष्ठेने सांगण्याची गरज शिक्षित दलित तरूणांना वाटू लागली. त्यातूनच दलित साहित्याची निर्मिती झाली. १९६० पूर्वी साहित्यात दलित साहित्याचे

चित्रण अपवादानेच आढळते. १९६० नंतरच्या काळात मोठ्या प्रमाणात दलित साहित्य निर्माण झालेले दिसते. या काळात जे साहित्य निर्माण झाले त्या साहित्यावर डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या तत्वज्ञानाचा प्रभाव मोठ्या प्रमाणात जाणवतो. या संदर्भात वाङ्यीन संज्ञा संकल्पना कोषात म्हटले आहे, ''दलितांवरील अन्यायाला प्रतिकार करण्यासाठी विद्रोहाचा प्रथम शद्ब उच्चारला तो डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी. शूद्र, अतिशूद्र यांच्या संदर्भात 'दलित' 'बहिष्कृत' हे शद्ब त्यांनी वापरले. दलितांच्या उध्दाराला त्यांनी व्यापक विराट चळवळीचे रूप दिले. दलितांची मानसिक गुलामगिरीतून सुटका करण्यासाठी, त्यांचे आत्मभान जागृत करण्यासाठी त्यांनी वृत्तपत्रातून सातत्याने लेखन केले. शिक्षण संस्था स्थापन केल्या.''[६२] दलितांचा उध्दार करण्यासाठी आंबेडकरांनी 'शिका संघटित व्हा, संघर्ष करा' हा मूलमंत्र दलितांना दिला. दलित साहित्यामध्ये कथा, कविता, आत्मकथन या वाङ्मय प्रकारात जेवढे विपूल प्रमाणात लेखन झाले तेवढे कादंबरीमध्ये झाले नाही. तरी देखील जे लेखन झाले त्याचे सामर्थ्य आजही नाकारता येत नाही.

१९६० नंतर दलित कादंबरीला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली ती अण्णाभाऊ साठे यांच्या साहित्यापासूनच. अण्णा भाऊ साठे यांना दलित साहित्यिक तसेच ग्रामीण साहित्यिक म्हणूनही ओळखले जाते. दलितांवर होणाऱ्या अन्याय अत्याचार त्यांनी कादंबरीतून समाजासमोर मांडण्याचा प्रयत्न केला. त्यांनी एक उपेक्षित जग आपल्या कादंबरीतून निर्माण केले आहे. त्यांची 'फकिरा' ही कादंबरी एक श्रेष्ठ वाङ्मयीन कलाकृती म्हणून समीक्षकांना खूप आवडली. या कादंबरीतून त्यांनी फकिराच्या माध्यमातून मातंग समाजातील लोक गुन्हेगारी प्रवृत्तीचे नसून धाडसी प्रवृत्तीचे आहेत हे पटविण्याचा प्रयत्न केला आहे. फकिरा प्रमाणेच इतरही कादंबऱ्यातून त्यांनी दलितावर होणाऱ्या अत्याचाराला वाचा फोडण्याचा प्रयत्न केला. याशिवाय 'वारणेचा वाघ' १९६८, 'वारणेच्या खोऱ्यात' १९५१, 'माकडीचा माळ' १९६३, 'वैर' १९५९, 'मास्तर' १९७५, 'रत्ना'१९७५, 'फुलपाखरू' १९७७ अशा विविध विषयावर कादंबऱ्या लिहिल्या.

शंकरराव खरात या लेखकांनी विविध विषयावर कादंबरी लेखन केले आहे. त्यापैकी दलित साहित्यात महत्वपूर्ण लेखन केले आहे. त्यांनी 'पारधी' या कादंबरीतून फासेपारध्यांना पांढरपेशा समाजात वावरताना होणारा त्रास चित्रित केला आहे. याशिवाय 'हातभट्टी' १९७०, 'मी मुक्त ! मी मुक्त !' १९८०, 'फूटपाथ नं.१' १९८०, 'गावचा टिनोपाल गुरूजी ' १९७४ इ. कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यांमधून त्यांनी दलित जीवनाबरोबर शहरातील झोपडपट्टीचे, गुन्हेगारीचे, भटक्या विमुक्त जातीचे चित्र रेखाटले आहे. परंतु त्यातून या घटनांचे भीषण वास्तव ते शद्बबद्ध करू शकले नाहीत. कारण त्या काळात त्यांच्या कादंबरीवर फडके खांडेकरांच्या साहित्यातील प्रवृत्तींचा प्रभाव जाणवतो. या संदर्भात रवींद्र ठाकूर म्हणतात, ''अण्णा भाऊ साठे शंकरराव खरात याच्या साहित्यात दलित जीवनाचे चित्र आहे. परंतु विद्रोही जाणीव फारशी दिसत नाही. ते चळवळ सुरू होण्याआधीपासून लिहिणारे लेखक आहेत असे म्हटले तरी चळवळीनंतर लिहू लागलेल्या लेखकात पारंपारिक जाणिवा आढळत नाहीत असे निर्विवादपणे म्हणता येत नाही.''[६३]

बाबूराव बागूल यांनी 'सूड' या कादंबरीतून 'जानकी' नावाच्या मुरळीची व्यथा मांडलेली आहे. समाजातून तिच्यावर होणाऱ्या अन्याय अत्याचाराविरूध्द सूड उगवायला निघालेलया एका स्त्रीची ही कहाणी आहे. यानंतर 'अघोरी' १९८१ या कादंबरीतून जादूटोण्याचे अघोरी कृत्य करणारे बुवा तसेच अंधश्रध्दा यांचे चित्रण आलेले आहे. 'सूड' २००० ही कादंबरी मुंबईतील कामगार वस्ती त्यातून उदयाला आलेले दलितांचे नवे नेतृत्व आणि दलिताच्या भाळी अखंडपणे येणारी दु:खाची संगत याचे चित्रण करते.

माधव कोंडविलकर यांनी 'अजून उजाडायचं आहे' या कादंबरीतून खेड्यातील चांभार जातीच्या लोकांचे जीवन शद्बबद्ध केले आहे तर अनाथ या कादंबरीतून सुशिक्षित तरूणापुढे बेकारीमुळे निर्माण झालेल्या समस्यांचे उच्चनीच भेदभाव मानले जातात. हे भेदभाव किती क्लेशदायक असतात यांच्या स्वरूपाचे वर्णन इथे आले आहे. याशिवाय 'हाताची घडी तोंडावर बोट', 'आता उजाडेल', 'डाळ', 'वेध', 'देशोधडी', 'परित्यक्ता', 'चौकशी चालू आहे', 'एक होती कातवाडी' इ. अनेक कादंबऱ्या लिहिल्या.

बंधू माधव यांनी 'वगसम्राट' कादंबरीतून दलित तमासगिराची व्यथा शद्बबद्ध केली आहे. योगेंद्र मेश्राम यांच्या 'माझा गाव कुठाय' या कादंबरीतून आंबडेकरांच्या विचारांनी प्रेरित झालेल्या तरूणप्ढिीची विद्रोही मानसिकता येथे व्यक्त होते. अशोक व्हटकरांनी 'मेलेले पाणी'मध्ये ढोर जातीचे कष्टमय जीवन वास्तव मांडण्याचा प्रयत्न केला आहे. नामदेव व्हटकर यांनी 'अपराधी' या कादंबरीतून एका अनाथ तरूणाची कथा सांगितली आहे तर 'सोळा शिणगार '१९६८ या कादंबरीमध्ये तमासगिरांच्या जीवनाचे दर्शन घडविले आहे.

नामदेव कांबळे यांनी 'राघववेळ' १९९४ या कादंबरीतून मांग जातीच्या दुरवस्थेचे चित्रण केले आहे. दलित कादंबरीमध्ये उत्कृष्ट कलाकृती मानली जाणारी ही कादंबरी आहे. तर 'अस्पर्श' १९९० या कादंबरीतून मातंग समाजातील शिक्षकावर प्रकाश टाकला आहे. याशिवाय 'मोराचे पाय' १९९७, 'ऊन सावली' १९९७, 'साजरंग' १९९९, 'शेतझाडा' इ. कादंबऱ्या त्यांनी शद्बबद्ध केल्या आहेत.

शरणकुमार लिंबाळे यांची 'दंगल' ही कादंबरी दलित चळवळ पुढे नेण्याचा प्रयत्न करणाऱ्या दलित पँथर या संघटनेचे चित्रण करते. त्यांची 'परपुरूष' ही कादंबरी दलित जीवनाचे प्रश्न मांडताना दिसते. याशिवाय 'उपल्या', 'हिंदू ' व 'बहुजन' याही कादंबऱ्या त्यांनी लिहिल्या. उत्तम कांबळे यांची 'श्राध्द' मध्ये आबा कांबळे दलितासाठी विकास सोसायटी सुरू करतो परंतु महार लोकांना वाटते की स्वत:ला श्रेष्ठ समजणाऱ्या मांग चांभार ढोर लोकाना तिथं स्थान असू नये. ते स्वत:ही इतराना आपल्यापेक्षा कनिष्ठ समजतात.

जी. के. ऐनापुरे यांची 'अभिसरण' ही कादंबरी दलित चळवळीची दुरावस्था कशी झाली आणि का झाली याचा वृत्तांत मांडण्याचा प्रयत्न करते. बाबाराव मुसळे यांची 'वारूळ' २००४ या कादंबरीतून मातंग समाजातील दोन पिढ्यातील मानसिक संघर्षाचे चित्रण आले आहे. केशव मेश्राम यांची 'हकीकत आणि जटायू' कादंबरीमधून अभिमन या तरूणाच्या माध्यमातून मातंग समाजातील लोकांची समाजाकडून कशी हेटाळणी केली जाते याचे चित्रण आहे. आनंद यादव यांची नटरंग.

याशिवाय सदा कऱ्हाडे – 'गाव कुसाबाहेरील वस्ती' , बाबा भांड –'दशक्रिया', राजन गवस – 'तणकट', प्रेमानंद गज्वी – 'जागर', सुधाकर गायकवाड – 'शुद्र', ना. बा. जाधव –'डॉ. अंजना', 'दे दोन' भिमसेन दंडे –'इस्कोट', निशिकांत शेंडे –'कलंक मुक्ती', मधु मंगेश कर्णिक – 'भाकरी आणि फूल', रणजित देसाई –'समिधा' इ. अनेक कादंबऱ्या लिहिलेल्या आढळतात.

दलित कादंबऱ्यांमधून लेखकांनी दलित जीवनातील वास्तव समाजासमोर ठेवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु सवर्ण–दलित संघर्ष हा बहुसंख्य दलित कादंबऱ्यांचा विषय आहे. त्यात अस्वाभाविक असे काहीच नाही, तथापि धर्मांतरानंतर दलित समाजात जे मानसिक परिवर्तन झाले किंवा जे काही अंतर्विरोध निर्माण झाले त्यांचा मागोवा घेण्याचा प्रयत्न झालेला दिसत नाही. कादंबरीच्या संदर्भात उणिवांची जाणीव होत असली तरी दलित कादंबरी आपले वेगळेपण टिकवून आहे.

दलित साहित्यामध्ये स्त्रियांनी कादंबरी लेखन केलेले आहे. ते फार कमी प्रमाणात म्हणजे नाममात्रच असे आहे. दलित साहित्यातून जे लेखन झाले ते स्वत: दलित लेखकांनी अनुभवलेले जवळून पाहिलेले असे होते. त्यामुळे त्यामध्ये दलितांचे वास्तव जीवन जसेच्या तसे शब्दबध्द झाले आहे. दलित साहित्यामध्ये कादंबरी लेखन झाले आहे. ते फार कमी प्रमाणात झाले आहे. परंतु त्याला नावारूपाला आणण्याचे, श्रेष्ठत्व देण्याचे काम शंकराव खरात, अण्णा भाऊ साठे, केशव मेश्राम, बाबूराव बागूल यांच्यासारख्या मोजक्याच लेखकांनी केले आहे.

यासंदर्भात बाळकृष्ण कवठेकर म्हणतात, ''एका विशिष्ट भूमिकेतून जीवनानुभवांचा केलेला स्वीकार आणि आविष्कार हे दलित साहित्यातील कादंबरीच्या अभावाचे कारण आहे. तसेच दलित कादंबरी अभावाचे दुसरे कारण ज्या सांस्कृतिक अवस्थेमध्ये आज दलित समाज आहे, त्या अवस्थेत दडलेले आहे. अर्थात या अवस्थेला हा समाज कारणीभूत नसून भारतीय समाजव्यवस्थेने त्याला शतकानुशतकांपासून जीव वागणूक दिली आहे तिचा ही परिस्थिती हा अटळ परिपाक होय.''[६४]

**ग्रामीण कादंबरी –**

१९६० नंतर मराठी साहित्यामध्ये अनेक प्रवाह निर्माण झाले. त्यातील 'ग्रामीण साहित्य' हा प्रवाह खूप महत्वाचा प्रवाह आहे. या प्रवाहाची परंपरा खूप जुनी आहे परंतु हा प्रवाह नावारूपाला आला ते १९६० नंतर. या 'ग्रामीण साहित्याच्या' परंपरेविषयी प्रा. चंद्रकुमार नलगे म्हणतात, 'ग्रामीण साहित्याच्या पर्वूखुणा प्राचीनाच्या मुळापर्यंत जाऊन पोहोचल्या असल्या तरी त्याची सर्वांगिण साक्ष घडलेली नाही असे जाणवल्याशिवाय राहू शकत नाही.'[६५] १९६० नंतर या प्रवाहातून ग्रामीण जीवनातील सुख–दु:खे, वास्तव घटना वाचकांसमोर मांडल्या जाऊ लागल्या. 'ग्रामीण संस्कृती, बोली जीवन यांचा उपयोग करणारे साहित्य म्हणजे ग्रामीण साहित्य होय.' खेड्यातील माणसांच्या जीवनपध्दती, श्रध्दास्थाने, शेती, निसर्ग, यांच्याशी असणारे ऋणानुबंध गावगाड्यातील बलुतेदारी सामाजिक, आर्थिक संबंधांची पारंपारिक व्यवस्था, आधुनिक काळातील पंचायत व्यवस्था, सहकारी संस्था आधुनिकीकरणाचे, यंत्र संस्कृतीचे,ग्रामीण जीवनावर झालेले आक्रमण व परिणाम यामुळे बदललेले ग्रामीण जीवन व्यक्तींमधील ताण–तणाव इत्यादी ग्रामीण साहित्याची आशयसूत्रे आहेत.

प्राचीनकाळापासून आजपर्यंत शेती हा मुख्य व्यवसाय मानला जातो. आजही देशात ७० टक्के लोक खेड्यात राहतात व शेती हा व्यवसाय करतात. शेती करताना विविध पिके शेतकरी घेताना दिसतो. अशा शेतकऱ्यांच्या जीवनावर साहित्याची निर्मिती किती व कशी झाली हे पाहता येईल. ग्रामीण साहित्यात ग्रामीण जीवनाचे चित्रण येते. ग्रामीण साहित्याच्या संदर्भात वेगवेगळ्या लेखकांनी वेगवेगळ्या व्याख्या केल्याचे निदर्शनास येते.

१) डॉ. श्रीराम गुंदेकर ग्रामीण साहित्याच्या व्याख्ये संदर्भात म्हणतात, ''कृषिनिष्ठ जाणिवांचा ग्रामीण जाणिवांचा कलात्मक, उत्कंट सहजाविष्कार म्हणजे ग्रामीण साहित्य.''[६६]

२) डॉ. नागनाथ कोतापल्ले म्हणतात, ''ग्रामीण जीवनातून फुलणारे ग्रामीण वास्तवातून साकार होणारे साहित्य ते ग्रामीण साहित्य.''[६७]

ग्रामीण साहित्याची प्रेरणा म. फुले यांच्या विचारात आहे. महात्मा फुले यांनी 'शेतकऱ्यांचा आसूड'या पुस्तकातून शेतकरी जीवनाचे त्या काळातील दु:ख, समस्या त्यांची

होणारी पिळवणूक, सावकारी अत्याचार याचे प्रत्ययकारी चित्रण करण्याचा प्रयत्न केला आहे. १९२० नंतर गांधीवादाच्या प्रभावाने ग्रामीण जीवनाचा विकास या कल्पनेला महत्त्व देऊन 'खेड्याकडे चला' हा संदेश सर्वांना दिला. तसेच ग्रामीण जीवन साहित्यातून शद्बबद्ध व्हावे अशी अपेक्षा होती परंतु या कादंबऱ्यावरती स्वप्नरंजनाचा प्रभाव असल्यामुळे ग्रामीण वास्तव जीवन साहित्यातून अल्प प्रमाणात आले. १९४५ नंतर मात्र खेड्यातील वास्तव जीवनाचा वेध घेणारे साहित्य मोठ्या प्रमाणात उदयाला आले. ग्रामीण साहित्यातील निवेदनाची भाषा नागर, पात्रांची भाषा ग्रामीण किंवा काही ठिकाणी निवेदनाची भाषा, पात्रांची भाषा ग्रामीण असते.

कृष्णराव भालेकर यांची 'बळीबा पाटील' ही कादंबरी १८८८ मध्ये प्रसिध्द झाली. भालेकर यांनी या कादंबरीमधून कादंबरीचा नायक गावामध्ये विविध जातीच्या लोकांची बैठक बोलावतो. त्या सभेमध्ये जी चर्चा होते ती चर्चा म्हणजे 'बळीबा पाटील' ही कादंबरी होय. या कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनावर प्रकाश टाकण्याचा प्रयत्न केला आहे. १९८८ मधील ही प्रसिध्द ग्रामीण कादंबरी आहे. या कादंबरीविषयी नागनाथ कोतापल्ले म्हणतात, ''ही कादंबरी म्हणजे एक सांग रूपक आहे. या रूपकातील प्रत्येक घटकाला आणि व्यक्तीला विशिष्ट असा अर्थ आहे.''[६८] बळीबा पाटील यांचे गाव कुटाळ, तालुका– उदास आणि जिल्हा–कष्टपूर ही सगळीच नावे शेतकऱ्यांच्या जीवनाच्या संदर्भात प्रतिकात्मक आहेत. ग्रानीण साहित्यातील ही पहिली कादंबरी मानली जाते, परंतु या कादंबरीमध्ये ग्रामीण जीवनाचे भरघोस प्रत्यय यायला पाहिजे तसा इथे येत नाही तसेच कादंबरीला आवश्यक एवढा मजकूर त्यात नाही म्हणून बळीबा पाटील या कादंबरीचे श्रेष्ठत्व कमी होऊन धनुर्धारी यांच्या 'पिराजी पाटील' या कादंबरीला ग्रामीण साहित्यातील पहिल्या कादंबरीचा मान दिला जातो.

धनुर्धारी याची 'पिराजी पाटील' १९०३ या कादंबरीमध्ये खेड्याचे, ग्रामव्यवस्थेचे दैनंदिन जीवनातील व्यवहाराचे, समस्यांचे, भ्रष्टाचाराचे, सरकार शेतकऱ्यांविषयी काहीच करीत नाही याची चीड याचे चित्रण अतिशय वास्तव पध्दतीने केले आहे. या कादंबरीविषयी रवींद्र ठाकूर म्हणतात, ''या कादंबरीत पहिल्यांदाच ग्रामजीवनाचा यथार्थ प्रत्यय येत असल्याने तिला मराठीतील पहिली ग्रामीण कादंबरी म्हणण्यास हरकत नाही.''[६९] तसेच डॉ. वासुदेव मुलाटे

या कादंबरीच्या श्रेष्ठत्वाबद्दल असे म्हणतात, ''या कादंबरी मागची प्रेरणा तत्कालीन ग्रामीण जीवनाचे वास्तवपूर्ण दर्शन घडविणे हीच आहे हे ही पटते या दृष्टीने विचार केला तर 'पिराजी पाटील' ही मराठीतील पहिली यशस्वी कादंबरी आहे हे मान्य करावे लागते.''[७०]

यासारख्या संशोधकांची मते लक्षात घेता 'पिराजी पाटील' या कादंबरीला पहिली ग्रामीण कादंबरी मानली जाते हे लक्षात येते. धर्नुधारी हे हरिभाऊंचे समकालीन लेखक आहेत त्यांनी हरिभाऊंप्रमाणे पांढरपेशी जीवनाचे चित्रण न करता शेतकरी समस्यांचे चित्रण करणारी एक वेगळी कादंबरी लिहून नावलौकिक प्राप्त केला. आणि ग्रामीण साहित्य शारदेच्या मंदिरात पहिली ग्रामीण कादंबरी म्हणून मानाचे स्थान मिळाले.

या काळात शिक्षणाची सुविधा निर्माण झाली होती. परंतु शिक्षण फक्त उच्चवर्गीय व मध्यमवर्गीयांच्या पर्यंतच पोहाचेले होते. त्यामुळे या पांढरपेशी वर्गातील लोकांनी केलेले लिखाण हे त्यांच्यापुरते मर्यादित होते. त्यांच्या जीवनापलिकडेही काही लोकांचे वेगळे जीवन आहे याचा त्यांना फारसा अंदाज नव्हता. त्यामुळे त्यांचे वास्तव जीवन कादंबरीतून मांडण्याचा फारसा प्रयत्न कोणी केला नाही. ज्यांना या जीवनाचा अंदाज होता त्यातील काही मोजक्याच लेखकांनी लेखन करण्याचा प्रयत्न केला. त्यामुळे १९२० पर्यंत ग्रामीण जीवनाचे चित्रण करणाऱ्या कादंबऱ्यांची संख्या अतिशय अल्प आहे असे जाणवते.

१९२० ते १९७० या कालखंडात ग्रामीण कादंबऱ्याचे प्रमाण वाढलेले दिसते. १९२० नंतर समाजामध्ये राजकीय, सामाजिक, आर्थिक सर्व क्षेत्रात उलटापालट झाली. टिळक युगाचा अस्त होऊन गांधी युग उदयाला आले होते. आपला देश 'खेड्याचा देश' असल्याने आधी खेड्यांचा विकास झाला पाहिजे. या जाणिवेतून 'खेड्यांकडे चला' ही घोषणा गांधीजींनी दिली. त्यामुळे श्रीमंतापासून गोर-गरिबांपर्यंत, बुद्धिवादी, लेखक, राजकीय, सामाजिक कार्यकर्ते सर्वांचे लक्ष खेड्याकडे वळले. याचा परिणाम या सर्व गोष्टीवरती झालेला आढळतो. याच दरम्यान मार्क्सवादी विचारांचे वारे वाहू लागले. शाहू महाराज, भाऊराव पाटील यासारखे समाज सुधारक गोरगरिबांच्या विकासासाठी शिक्षणाचे महत्त्व व प्रसार करू लागले. त्यातून लोक थोड्याप्रमाणात का होईना लिहू,

वाचू लागले. त्यामुळे त्यांच्यातील स्वत्वाची जाणीव होऊन आपल्या समस्या व्यथा, वेदना, साहित्यातून शद्बबद्ध झाल्या पाहिजेत. तसेच शहरी लोकांनाही याचे गांभीर्य कळाले पाहिजे. इत्यादी गोष्टींचा परिणाम या काळातील कादंबरीवरती झालेला दिसतो. त्यामुळे या जाणिवेतून अनेक कादंबऱ्यांची निर्मिती झालेली दिसते.

प्र. ह. खालिडकरांची 'अन्नदाता उपाशी' १९२७ या कादंबरीतून खेड्याचा उध्दार कसा होईल याचे विवेचन आले आहे. तसेच ना. वि. कुलकर्णी यांची 'शिपाई'१९२५, दिवस कसे जातील रा. शा. पाटील यांची 'सीता', ग. रा. वाळिंबे यांची 'मोहित्यांची मंजुळा' १९३१, या कादंबऱ्यावर गांधीजींच्या ग्रामवादाचा प्रभाव जाणवतो. ग्रामीण जनतेचा उध्दार व्हावा या तळमळीतून त्यांनी या कादंबऱ्या लिहिल्या. रामतनय यांची 'खरा उध्दार' १९३६ ही कादंबरी अज्ञानी शेतकऱ्यांना सावकार लोभी वृत्तीने कसे लुटतात याचे वर्णन करते. वि. वा. हडप यांची 'अन्नदाता उपाशी' १९३७ या कादंबरीतून कोकणातील खेड्यातील कष्टकरी वारल्यांच्या जीवनातील दु:खे आणि त्यांचे जमीनदारांकडून होणारे शोषण याचे चित्रण केले असून कसेल त्याची जमीन हा संदेश त्यांनी या कादंबरीतून दिला आहे. त्यांची दुसरी कादंबरी म्हणजे 'गोदाराणी' ही कादंबरी याच पध्दतीची आहे. वि. ल. बर्वे यांनी 'मुचकुंदरी' या कादंबरीतून खेड्यातील लोकांचे त्यांच्या भावभावनांचे चित्रण अतिशय सुंदर पध्दतीने केले आहे.

१९२० ते १९४० या कालखंडातील कादंबऱ्या या ग्रामीण जीवनातील वास्तवता टिपत होत्या. खेड्याचा उध्दार करण्याच्या निमित्ताने लोक खेड्याकडे वळले आणि त्यांनी या लोकांच्या व्यथा, दु:ख, समस्या, अज्ञान, अंधश्रध्दा दूर करण्याचा प्रयत्न केला. याच प्रेरणेतून त्यांची लेखणी लेखन करू लागली. हे सर्व लेखन करण्याचा प्रयत्न पांढरपेशा वर्गाकडून चालला होता. त्यांनी ग्रामीण लोकांच्या संवेदना त्यांच्या दृष्टिकोनातून व्यक्त करण्याचा प्रयत्न केलेला दिसतो. त्यामुळे त्यांनी केलेल्या लेखनात ग्रामीण जीवन मुळापासून शद्बबद्ध झालेले दिसत नाही तर ते लेखन वरवरचे असल्याचे स्पष्टपणे जाणवते.


BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

१९४० नंतरचे महत्त्वाचे लेखक म्हणून र. वा. दिघे यांना ओळखले जाते. त्यांची १९३९ मध्ये 'पाणकळा' ही कादंबरी प्रसिध्द झाली. या कादंबरीमध्ये रजतपूरभोवतीच्या रम्य निसर्गाची आणि ग्रामीण जीवनाची पार्श्वभूमी आली आहे. शेतकऱ्यांचे दारिद्र्य, निसर्गावलंबी जीवन, सावकारांकडून होणारी पिळवणूक, भूमिहीन लोकांची गडबड, दुष्काळात सापडलेल्या लोकांची अवस्था, परंपरेने चालत आलेली घराण्यातील वैमनस्य इ. बाबीचे चित्रण केले आहे. त्यांची दुसरी कादंबरी 'सराई' १९४३ ही कादंबरी खूपच लोकप्रिय ठरली. या कादंबरीत मनोहर –लार्डी यांच्या प्रेमकथेला मध्यवर्ती स्थान असले तरी त्याबरोबर निसर्गवर्णनही त्यांनी अतिशय उत्कृष्ट पध्दतीने केले आहे. शेती सामाजिक रितीरिवाज, भाषा, सांस्कृतिक जीवन इत्यादीतून ग्रामजीवन साकार झाले आहे. वा. म. जोशी या कादंबऱ्यासंदर्भात म्हणतात, ''पाणकळा व सराई या प्रादेशिक कादंबऱ्या लिहून दिघ्यांनी मराठीतील ललित शब्दसृष्टीत निसर्गरम्य उपवने फुलविली आहेत.''[७१] कोकणातील शेतकरी जीवनाशी ते स्वत: समरस झालेले असल्यामुळे ज्याप्रमाणे त्यांच्या या कादंबऱ्यातील प्रादेशिकतेचे दर्शन सुंदर झालेले आहे. त्याचप्रमाणे मानवी जीवनविषयीच्या व्यापक व सखोल सहानुभूतीमुळे, प्रादेशिकतेच्या मर्यादांना न जुमानणारे असे कोणत्याही रसिकांचे चित्त वेधून घेण्याचे सामर्थ्यही या कादंबऱ्याना प्राप्त झालेले आहे. म्हणून र. वा. दिघे यांना ग्रामीण कादंबरीचे जनक म्हणून ओळखले जाते याशिवाय दिघे यांनी 'रानजाई'१९४६, 'आई आहे शेतात', 'पड रे पाण्या', या कादंबऱ्यातून दिघे यांनी ग्रामीण जीवन यथार्थपणे अविष्कृत केले आहे.

म. भा. भोसले यांची 'समरांगण' १९४१ ही कादंबरी शेतकरी आणि जमीनदार यांच्यामधील संघर्ष शद्वबद्ध करते. 'उघड्या जगात'आणि 'एका आईची लेकरं' याही कादंबऱ्या ग्रामीण जीवनावरच्या आहेत. द. र. कवठेकरांची 'रेशमाच्या गाठी' १९४२, विठ्ठल दत्तात्रय चिंदरकर यांची 'महापूर' १९४३ ही कादंबरी खेड्यातील भयाण वास्तव दारिद्र्याचे वर्णन करताना दिसते. ग. ल. ठोकळांची 'गावगुंड' ही कादंबरी गुणाजी व जयवंत या दोन भावांची हृदयस्पर्शी कथा सांगते.

१९४५ नंतर मराठी साहित्य लेखनात बदल झाला. लेखक जीवनाचे भेदक, वस्तुनिष्ठ, वास्तव चित्रण करू लागले. त्यामुळे प्रत्यक्ष घडलेल्या अनुभवलेल्या पाहिलेल्या घटना शद्बबद्ध होऊ लागल्या. आजपर्यंत ज्या गोरगरीब लोकांचे जीवन कादंबरीतून येत नव्हते ते आता कादंबरीतून शद्बबद्ध होऊ लागले होते.

बा. सी. नर्ढेकर यांची 'तांबडी माती' १९४३ या कादंबरीतून ग्रामीण समाज कसा उध्वस्त होतो याचे चित्रण केले आहे. शेतात कष्ट करून तिची सेवा करून त्यातून धान्य पिकवून आपला उदरनिर्वाह चालविणे हेच खऱ्या शेतकऱ्यांचे कर्तव्य आहे. तो कुठेही गेला तरी त्याला काळ्या आईची ओढ राहणारच. याचे वर्णन इथे आले आहे. 'पाणी' १९४८ या कादंबरीतून दुसरे महायुध्द व धरणे बांधण्याची योजना यामुळे भरतपूर या खेड्यातल्या शेतकऱ्यांच्या जीवनावर जे अनिष्ट परिणाम ओढवतात. याचे चित्रण या कादंबरीतून केले आहे. या दोन कादंबऱ्यांमधून आधुनिकीकरणामुळे ग्रामीण समाज कसा उध्वस्त होतो याचे चित्रण केले आहे.

विभावरी शिरूरकरांची 'बळी' १९५० ही कादंबरी वाचकांचे लक्ष वेधून घेताना दिसते. या कादंबरीतून लेखिकेने खेड्यापाड्यातून आणि माळरानातून पोटासाठी उन्हातान्हात भटकंती करणाऱ्या गारूडी जमातीची ही कथा आहे. बा. भ. बोरकरांची भावीण १९५० या कादंबरीतून कोकणातील शेवंती या भाविणीच्या जीवनावर लिहिली आहे. वा. ब. कर्णिक यांची 'वाडगीण' ही कादंबरी ज्यांच्या अन्न, वस्त्र, निवारा यासारख्या मुलभूत गरजाही भागू शकत नाहीत. अशा वारली जमातीच्या लोकांचे वर्णन केले आहे. अज्ञान दारिद्र्य, अंधश्रध्दा, जीवनात इतर गोष्टींचा असणारा अभाव याचे प्रत्ययकारी चित्रण या कादंबरीतून पहावयास मिळते.

श्री. ना. पेंडसे यांची 'एल्गार' १९४९, 'हद्दपार' १९५०, 'गारंबीचा बापू '१९५२ या कादंबऱ्यातून हर्णे गावचा परिसर तेथील निसर्ग व मानवी जीवनाचे चित्रण वेधक पध्दतीने केले आहे. गो. नि. दांडेकर यांची 'शितू '१९५३, 'पडघवली' १९५५, 'पवनाकाठचा धोंडी' १९५५, 'माचीवरचा बुधा' १९५८, 'जैत रे जैत' १९६५ इ. कादंबऱ्या दांडेकरांनी प्रकाशित

केल्या. दांडेकर यांनी या कादंबऱ्यातून ग्रामीण जीवनाचे चित्रण केले आहे. त्यांच्या कादंबऱ्याविषयी डॉ. वासुदेव मुलाटे म्हणतात ''श्री. ना. पेंडसे आणि गो. नि. दांडेकर यांनी त्यांच्या अनुभवविश्वाच्या वास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न केलाच. परंतु आपल्या अनुभवविश्वाची अभिव्यक्ती कलापूर्ण, कलात्मक, आकार धारण करील असेही बघितले. या दोघांनी आपल्या लेखनातून वास्तव जीवन चितारले, परंतु त्याबरोबर कादंबरीला कलात्मकता आणण्याचाही प्रयत्न केला.''[७२]

व्यंकटेश माडगुळकर यांनी 'बनगरवाडी' या कादंबरीतून माण देशातील एका छोट्याशा उजाड अभावग्रस्त खेड्यातील जीवनाचे चित्रण केले आहे. इतर कादंबऱ्यापेक्षा बनगरवाडीचे स्वरूप वेगळे आहे. या कादंबरीमध्ये आकर्षक वाटाव्या अशा घटना नाहीत. निसर्ग म्हणावा असा रम्य नाही, लोकांचे जीवन आहे. तरीही ही कादंबरी स्वत:चे स्वतंत्र अस्तित्व प्रादेशिक कादंबरीमध्ये निर्माण करताना दिसते. या कादंबरी संदर्भात डॉ. रत्नाकर बापू मंचरकर लिहितात, ''मराठी ग्रामीण कादंबरीतील मैलाचा दगड ठरावी अशाच तोलामोलाची ही बनगरवाडी आहे.''[७३]

अण्णाभाऊ साठे यांची 'फकिरा' ही कादंबरी दलितांचे शोषण करताना दिसते. मांग, रामोशी या जातीच्या जीवनातील त्यांच्या समस्या, दु:खाचे दारिद्र्याचे, समाजातील वागणुकीचे सवर्णांकडून होणाऱ्या पिळवणुकीचे प्रत्ययकारी चित्रण करते. तसेच खेड्यातील लोकजीवनातील परंपरा, रूढी, आचार–विचार, समजुती यांचे वर्णन ही इथे पहायला मिळते. हे वास्तवस्पर्शी चित्रण ग्रामीण कादंबरीच्या दृष्टीने मोलाचे आहे.

उध्दव शेळके यांची 'धग' १९६० ही कादंबरी कुटुंबासाठी प्रतिकूल परिस्थितीत न डगमगता झुंजणाऱ्या जिद्दी, सोशिक, आपल्या कुटुंबावर प्रेम करणाऱ्या कौतिक या स्त्रीची कथा आहे. तसेच आधुनिकीकरण व यांत्रिकीकरण यामुळे ग्रामीण कष्टकरी लोकांच्यावर होणाऱ्या अन्यायाचे चित्रण ही इथे आले आहे. याशिवाय दा. गो. बारसे यांची 'अजिंठ्याचे लेणे', के. नारखेडे यांची 'अंजनी', ना. रा. शेंडे यांची 'काळी रात्र', दुर्गा भागवत यांची 'महानदीच्या तीरावर', ना. के. महाजन यांची 'किसान', म. भा. भोसले यांची 'समरांगण',

'उघड्या जगात', बी. रघुनाथ यांची 'ओऽऽ', 'हिरवे गुलाब', 'म्हणे लढाई संपली', 'आडगावचे चौधरी', डॉ. रंगनाथ देशपांडे यांची 'आग्या मोहोळ', श. रा. भिसे 'जंगलातल्या छाया' इत्यादी कादंबऱ्या या कालखंडात प्रकाशित झाल्या.

१९६० पर्यंतच्या कालखंडातील लेखक हे खेड्यातून शहरात आलेले किंवा मध्यमवर्गीय पांढरपेशा वर्गातील कामधंद्यासाठी शहरात राहिलेले असे होते. परंतु १९६० नंतर परिस्थिती बदललेली दिसते. मध्यमवर्गीय समाजातील लोकांबरोबर कष्टकरी ग्रामीण समाजही आपल्या भाव–भावना , संवेदना साहित्यातून व्यक्त करू लागला. जे आहे तसेच शद्बबद्ध करण्याचा प्रयत्न लेखकांनी केला. त्यामुळे वास्तव, जीवन समाजसमोर आले. त्यातील खऱ्या वेदना, दु:खे, पांढरपेशी इतर लोकांना वाचनातून समजू लागल्या. आतापर्यंत वरवर चांगले दिसणारे हे खरंच प्रत्यक्षात किती भयावह भीषण आहे याचा प्रत्ययकारी दर्शन इथे घडले. १९४० ते १९६० या काळात 'प्रादेशिक' म्हणून ओळखली जाणारी कादंबरी १९६० नंतर ग्रामीण म्हणून नावारूपाला आली.

**ग्रामीण कादंबरी** (१९६०)

१९५० ते ६० या दशकामध्ये मराठी साहित्यात झालेले बदल १९६० नंतर अधिक स्पष्टपणे समोर येऊ लागले. या काळात मराठी वाङ्मयात दलित, ग्रामीण, स्त्रीवादी, आदिवासी, रंजनवादी असे विविध नवीन प्रवाह निर्माण झाले. यातील ग्रामीण साहित्यप्रवाहात शेतकऱ्यांचे चित्रण प्रभावीपणे आल्याचे दिसून येते. त्यामुळे मराठी साहित्याची एक महत्त्वाची शाखा म्हणून या प्रवाहाकडे आपल्याला पहावे लागेल. ग्रामीण जीवनात शेतकऱ्याला अनन्यसाधारण महत्त्व आहे. शेतकरी हा ग्रामीण जीवनाचा कणा आहे. हाच शेतकरी त्याच्यावर अवलंबून असणाऱ्या बलुतेदारांच्या आणि इतर दुर्बल घटकांचा पोशिंदा मानला गेला आहे.

शेतकरी हा जगाचा अन्नदाता आहे. जलदगतीने होणाऱ्या शिक्षण प्रसाराचा लाभ घेऊन दलित फिरस्ते शहराकडे वळले. स्थिरावलेही. परंतु जमीनीचा मालक असलेला शेतकरी

मात्र गावातच राहिला. ग्रामीण भागात राहून शेतकऱ्याने गावगाडा सांभाळला. शेतीत अधिक उत्पन्न काढण्यासाठी त्याने शर्थीचे प्रयत्न केले. नाती-गोती जपण्याचाही प्रयत्न केला. दारिद्र्यामुळे कर्जात खितपत पडलेल्या अशा या गरीब, दरिद्री शेतकरी जीवनाचे वास्तव चित्रण मराठी साहित्यात आले आहे. प्रत्येक साहित्यिकाने आपआपल्या पध्दतीने ग्रामीण माणसांची जीवन पध्दती त्यांचे स्वभाव, इर्षा, मानापमान, दु:ख, शेतशिवार, प्राणीजीवन, रानमाळ, कृषिसंस्कृती इत्यादी विषयावर लेखन केले. याविषयी डॉ. शरणकुमार लिंबाळे म्हणतात, ''याशिवाय यंत्र आणि विज्ञान यामुळे खेड्यातून आलेल्या सुधारणा बदल आणि यातून निर्माण झालेल्या नवीन समस्या, ग्रामीण मनावर झालेला परिणाम यांचेही प्रत्ययकारी दर्शन घडविणारे ग्रामीण साहित्य लिहिले जाऊ लागले. निवेदनासाठी बोलीचा वापर केला जाऊ लागला.''[७४]

हे लेखन मध्यमवर्गीय समाजातील लेखकांबरोबरच प्रत्यक्ष कष्टकरी ग्रामीण समाजातून आलेले संवेदनशील लेखकांनीही शद्धबद्ध केले. उध्दव शेळके यांच्या 'धग' १९६० या कादंबरीत कौतिक या शिंपी कुटुंबातल्या स्त्रीने जण्यासाठी केलेली धडपड हलाखीचे व जिद्दीचे जीवन येते. लिला धानोरीकर 'डाळिंबाचे दाणे', रणजित देसाई 'बारी' १९५९, 'माझा गाव' १९६०, दि. बा. मोकाशी 'देव चालले' लक्ष्मीकांत तांबोळी 'दूर गेलेले घर', शंकर पाटील 'टारफूला' १९६४, हमीद दलवाई 'इंधन' १९६५, जयवंत दळवी 'सारे प्रवासी घडीचे '१९६०, 'महानंदा' १९७०, 'धर्मानंद', चि. त्र्यं. खानोलकर 'रात्र काळी, घागर काळी' १९६३ 'अगोचर' १९७५, 'भागधेय' १९७६, 'कोंडूरा', मधु मंगेश कर्णिक 'देवकी', 'महिमाची खाडी' १९३९, 'भाकरी आणि फूल' १९८२, 'कातळ', रा. रं. बोराडे 'पाचोळा' १९८९ याशिवाय 'चारापाणी' १९८९, 'आमदार सौभाग्यवती' 'इथं होत, एक गाव', आनंद यादव यांची 'गोतावळा' १९७१ मध्ये लिहिली. वास्तव ग्रामीण भावविश्वाचा गाभा व्यक्त करणारी अव्वल दर्जाची कादंबरी ठरली. त्याचबरोबर 'नटरंग' १९८०, 'झोंबी', 'नागंरणी', 'घरभिंती', ना. धो. महानोर 'गांधारी' १९७३, चंद्रकुमार नलगे 'आगीनभूल' १९७४, 'देवाची साक्ष', 'महादेव मोरे' यांची 'बळी ' १९७२, 'रैत' १९७१, 'झोंबड '१९६९, द. ता. भोसले 'मी आणि माझा बाप' १९६९, सुभाष भेण्डे 'जोगिण' १९७४, चंद्रकांत काकोडकर 'कुणाच्या स्वातंत्र्यासाठी'

गोमंतक जागा हो', 'अन्नपूर्णा' इत्यादी कादंबरीकारांनी या कालखंडामध्ये ग्रामीण जीवन व समस्या, वास्तवरूप, वाचकांसमोर मांडण्याचा प्रयत्न अनेक लेखकांनी केला आहे.

मराठी साहित्यामध्ये झालेला आणखी एक सांस्कृतिक उद्रेक म्हणजे १९७५ च्या सुमारास सुरू झालेली ग्रामीण साहित्य चळवळ होय. गतिमान झालेल्या परिवर्तनवादी चळवळीच्या काळात ग्रामीण साहित्य चळवळ सुरू झाली. संमेलने, मेळावे आणि परिसंवादातून चळवळीची भूमिका मांडली जाऊ लागली. त्यामुळेच नवीन लेखकांना आत्मभान आले आणि त्यातूनच ग्रामीण कादंबरी साकारू लागली. या कालखंडाविषयी डॉ. शरणकुमार लिंबाळे म्हणतात, ''याच काळात म्हणजे १९७७ च्या सुमारास ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली. ग्रामीण जीवनातील दु:ख आणि समस्या यांचे स्वरूप बदलले होते. या बदलाचे दर्शन या दशकात नव्याने लिहू लागलेल्या लेखकांच्या लेखनातून घडू लागलेले होतेच. त्याला दिशा देण्याचे कार्य ग्रामीण साहित्याच्या चळवळीतून घडू लागले. म. फुल्यांच्या बरोबरच राजर्षि शाहू महाराज, विठ्ठल रामजी शिंदे, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, कर्मवीर भाऊराव पाटील इ. च्या विचारांशी ग्रामीण साहित्य चळवळ बांधिलकी मानते. या वैचारिक बांधिलकीतून हे लेखक लिहू लागले.''[७५] समाजसुधारकांच्या विचारांचा प्रभाव ग्रामीण साहित्य चळवळीवर असल्याचे स्पष्टपणे जाणवते.

ग्रामीण भागातील नवशिक्षित तरूण पिढीला आलेल्या आत्मप्रत्ययाचेच हे वाङ्मयीन रूप आहे. यामध्ये आनंद पाटील 'कागुद आणि सावली', उत्तम बंडू तुपे 'चिपाड', पुरूषोत्तम बोरकर 'मेड इन इंडिया' १९८७, बाबाराव मुसळे 'हाल्या हाल्या दुध दे' १९८५, 'पखाल' १९९५, अशोक व्हटकर 'बगाड' १९८४, नागनाथ कोतापल्ले 'उलट चालीला प्रवाह' १९८५, वासुदेव मुलाटे 'विषवृक्षाच्या मुळ्या' १९८९, रामचंद्र पठारे 'पाचर' १९८९, विश्वास पाटील 'पांगिरा' १९९०, 'झाडाझडती' १९९१, रंगनाथ पठारे 'हरण' १९९०, रविंद्र शोभणे 'कोंडी' १९९२, राजन खान 'यतीम' १९९०, वामन पात्रीकर 'जगबुडी', बा. ग. केसकर 'कुणाच्या खांद्यावर', 'वायदूल', अनंतराव पाटील 'भुईतून उगवलेला माणूस', गणेश आवटे 'गणगोत', तानाजी राऊ पाटील 'आभाळ', 'रूपसावली', शेषराव मोहित 'असं जगणं तोलाचं', भारत काळे

'ऐसे कुणबी भूपाळ', प्रतिमा इंगोले 'बुढाई' इत्यादी अनेक लेखक, लेखिकांनी या काळात ग्रामीण वास्तवाचा शोध घेण्याचा प्रयत्न केला.

या कादंबऱ्या ग्रामीण कादंबरीमध्ये महत्त्वपूर्ण ठरल्या आहेत. या लेखकांनी या कादंबऱ्यांमधून ग्रामीण समाजातील शेती समस्येचे वास्तव जीवनचित्रणाचा पटच जशाचा तसा उभा केला आहे. म्हणून डॉ. बापूसाहेब काळमांडे यांनी ''१९९१ नंतरच्या कालखंडात कादंबरी लिहिणारा लेखक शेतकरी कुटुंबातीलच एक घटक आहे. सदस्य आहे. कृषि संस्कृतीच्या प्रगल्भ अशा संस्कारांनी त्याचा पिंड पोसला आहे. त्याच्या लेखनातून अनुभवाचा अस्सलपणा शुध्दता आपणास जाणवतो. केवळ काल्पनिक विश्व उभे करण्यापेक्षा ग्रामीण प्रश्नांना आणि भोवतालच्या वास्तवाला भिडणारा आशय तो व्यक्त करतो' असे मत व्यक्त केले आहे.

१९९१ नंतर ग्रामीण समाज जीवनावर अनेक गोष्टीचे परिणाम झाले आणि त्यातून अनेक प्रश्न,समस्या निर्माण झाल्या. त्यामध्ये देशाने स्वीकारलेले खुले आर्थिक धोरण, उदारीकरण, पेटंट करार, गॅट करार, जागितिकीकरण, माहितीचा अधिकार, वाढता दहशतवाद, भ्रष्टाचार, ग्रामसुधारणेच्या नावाखाली घरकुल योजना, राष्ट्रसंत गाडगेबाबा ग्रामस्वच्छता अभियान, महात्मा गांधी तंटामुक्त गाव मोहीम, आदर्श गाव संकल्पना, गुजरात भूकंप, त्सुनामी लाटा, अवर्षण, गारपीट अशा काही नैसर्गिक घटनांनी मानवी जीवनात खूप मोठी उलथापालथ घडवून आणली आहे. विज्ञान तंत्रज्ञानाने केलेली प्रगती तर डोळे दीपवणारीच आहे. त्यामुळे वाडी वस्तीवर मोबाईल, केबल टी.व्ही. पोहोचलेले आहे. पाश्चात्य संस्कृतीचा परिचय नव्हे तर त्यांचे एवढे आक्रमण झाले आहे. सांस्कृतिक जीवनात आमुलाग्र बदल झाला आहे. सततच्या नापीकपणामुळे हैराण झालेला शेतकरी आणि उच्चशिक्षित पण कामाविना बेकार फिरणारा शेतीकडे पाठ फिरविलेला तरूण या आणि अशा अनेकबाबींसह अधिक व्यमिश्र व गुंतागुंतीचे असलेले आजचे वास्तव ग्रामीण लेखकांपुढे आहे आणि ते आपल्या साहित्यातून समृध्द केले आहे.

१९९१ नंतर अनेक कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. परंतु त्या सर्वच नाविन्यपूर्ण आहेत असे नाही म्हणून त्यातील काही महत्त्वाच्या कादंबऱ्यांचा उल्लेख इथे केला आहे. त्यात रा. र. बोराडे यांच्या १९९१ नंतर 'महानगाव' १९९३, 'रहाटपाळणा' १९९६, 'इथं होत एक गाव' २०००, 'मरणदारी' २००४, 'नामदार', 'श्रीमंती' २००७, 'रिक्त अतिरिक्त' २००९, अशा सहा कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. १९९१ नंतरच्या बदलत्या ग्रामीण कादंबरीमध्ये विश्वास पाटील यांची 'झाडाझडती' ही एक महत्त्वाची कादंबरी आहे. या कादंबरीत धरणग्रस्तांच्या पुनर्वसनात त्यांचे अतोनात शोषण समाजाच्या सर्वच पातळ्यावरून कसे केले, जाते याचे अत्यंत शोकात्म चित्रण आलेले आहे. बाबाराव मुसळे यांना 'हाल्या हाल्या दूध दे' या कादंबरीचे गंभीर प्रवृत्तीचे लेखक म्हणून ओळखले जातात. त्यांच्या नव्वदनंतर 'पखाल' १९९५, 'वारूळ' २००४, 'पाटीलकी' २००७ अशा तीन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या आहेत. एखाद्या प्रश्नांच्या अनुषंगाने जीवनाच्या विविधांगाला स्पर्श करून समग्र ग्रामजीवन चित्रित करणे हे राजन गवस यांच्या कादंबरी लेखनाचे एक वैशिष्ट्य त्यांच्या 'चौडकं' आणि 'भंडारभोग', 'तणकट ' १९९८, मध्ये ही जाणीव अधिक व्यापक बनली आहे. दुष्काळामुळे मेटाकुटीला आलेल्या दामाच्या कुटुंबाची वाताहात कशी होते ते 'रानखळगी' १९८८ या आत्मकथनात्मक कादंबरीतून चित्रित करून 'रानखळगीकार' म्हणून प्रसिध्दीस आलेल्या भीमराव वाघचौरे यांच्या १९९१ नंतर 'पाणघळी' १९९०, 'गराडा' २००१, 'अंगारकूस' २००७, या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. 'रानखळी' या कादंबरी एवढी इतर कादंबऱ्यांची म्हणावी एवढी दखल वाचकांनी घेतली नाही. त्या दुर्लक्षितच राहिल्या. ग्रामीण कादंबरीच्या क्षेत्रात गणेश आवटे यांना 'चुकार' १९८१ साली प्रकाशित झालेल्या कादंबरीमुळे प्रसिध्दी मिळाली यांची 'गणगोत', 'पाणसळ' नंतर आलेली 'भिरूड' २००७ ही एक उल्लेखनीय कादंबरी आहे. या कादंबरीत १९९० नंतर ग्रामजीवनाची पडझड वास्तवरूपात साकार झाली आहे. याच काळात 'पाचोळा' सारखी समर्थ कादंबरी लिहून ग्रामीण जीवनाला यंत्रयुगाने कसे पोखरून टाकले आहे याचे भेदक चित्रण रा. रं. बोराडे यांनी केले आहे. याचबरोबर ग्रामीण माणसांच्या जीवनजाणीवा मांडण्याचा प्रयत्न रणजित देसाई यांनी 'माझा गाव', शंकर पाटील यांनी 'टारफुला', आनंद यादव

यांनी 'गोतावळा' इत्यादी कादंबऱ्या लिहून केला आहे. शेतकरी असलेल्या नारबाचे हळवे मन त्याचा निसर्ग व प्राण्यांशी असलेला भावबन्ध आणि नव्या परिवर्तनामुळे त्याच्यावर होणारे आघात आनंद यादव यांनी अतिशय हळूवारपणे या कादंबरीत टिपले आहेत. राजन गवस यांनी आपल्या कादंबऱ्यामधून ग्रामीण जीवनातील विविध समस्यांना अग्रस्थान दिले. 'तणकट' ही त्यांची कादंबरी मूल्यभ्रष्ट नेत्यांचा आणि सामाजिक दिशाहीनतेचा दस्तऐवज आहे. 'कागुद आणि सावली' या कादंबरीतून खेड्याचे बोलके चित्र उभे केले आहे. बाबराव मुसळेयांनी 'पखाल' आणि 'हाल्या हाल्या दूध दे' या कादंबऱ्यामधून शेतकरी जीवनातील दु:खाला वाचा फोडलेली आहे. सदानंद देशमुख यांची 'तहान' १९९८, आणि 'बारोमास ' २००२ या दोन्ही कादंबऱ्यांनी मराठी ग्रामीण कादंबरीमध्ये अत्यंत मोलाची भर घातली. 'तहान' ह्या कादंबरीत अत्यंत महत्त्वाच्या ज्वलंत प्रश्नाचा पाण्याचा वेध घेणारी आहे तर 'बारोमास' ही कादंबरी शेतकऱ्यांच्या जीवनाला बारोमास वेढून असणाऱ्या वेदनेच्या जन्मजात हुंकारातून आकाराला आली आहे. शेषराव मोहिते हे नव्या पिढीतील ग्रामीण कादंबरीमधील एक महत्त्वाचे लेखक आहेत. त्यांनी 'असं जगणं तोलाचं'१९९४, 'धुळपेरणी' २००१, या कादंबऱ्या लिहिल्या. या कादंबऱ्यातून त्यांनी शेतकरी जीवनावर प्रकाश टाकला आहे 'असं जगणं तोलाच' या कादंबरीतून हरीबा व कामाबाई या महाराष्ट्र, कर्नाटक सीमेवर असलेल्या शेतकरी दाम्पत्याची कथा शद्बबद्ध केली आहे.

या कादंबरीत ग्रामीणांच्या बदलत्या अशा सुचित केल्या आहेत. सतीश जाधव यांनी शिक्षित ग्रामीण तरूणाला आत्ममान येत असणयाची ही नवी जाणीव या कादंबरीतून करून दिली आहे. भक्तीहीन झालेल्या ग्रामीण समाजाला नवे बळ व नवी दृष्टी देणारी कादंबरी शब्दबध्द केली. त्यानी 'झळ', 'बळ' या कादंबऱ्या लिहिल्या. 'झळ' मधून द्राक्ष बागायती करणाऱ्या शेतकऱ्यांचे प्रश्न येतात. तर बळ मधून पुण्यात नोकरी करून निवृत्त झाल्यानंतर गावाकडे जाऊन पुन्हा शेती करणाऱ्याला आपला अनुभव व शिक्षणाचा फायदा शेती सुधारण्यासाठी कसा होतो हे दाखवून दिले आहे.

१९९१ नंतरच्या ग्रामीण कादंबरीच्या बाबतीत नव्वद नंतर एक चांगली गोष्ट अनुभवाला येते. ती म्हणजे आजची नवी पिढी अतिशय जागरूकपणे लेखन करते आहे.

आजुबाजुचे वास्तव चित्रण अतिशय ताज्या व ज्वलंत घटनांही त्यांनी चित्रित केल्या आहेत.

'शद्वानुबंध' कार शंकर सखाराम यांची 'एसईझेड' २००७ ही कादंबरी त्याचे उत्तम उदाहरण आहे. भारत काळे 'ऐसे कुणबी भूपाळ', कृष्णात खोत 'गावठाण', अशोक कौतिक 'कोळी–पाडा', 'कुंदा'. ग. पि. मनुरसकर 'बुरूज', प्रकाश देशपांडे 'बारदान', रमेश इंगळे 'निशाणी', 'डावा अंगठा', 'बालाजी', मदन इंगळे 'झिम पोरी झिम', दिवाकर चौधरी यांची 'बुझ्र्वागमन ' २००७ मोहन पाटील यांची 'साखरफेरा' २००६, या कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. या ग्रामीण कादंबऱ्यांची परिस्थिती, अवस्थेविषयी डॉ. शरणकुमारे लिंबाळे म्हणतात, ''आपला देश हा खऱ्या अर्थाने खेड्यांचा देश आहे. कृषिकेंद्रित खेड्यातील माणसांची मानसिकता इतरांपेक्षा वेगळी असते. शहरातील काही सुखसोयी आणि सुधारणा खेड्यात आल्या म्हणजे खेड्यांचे रूपांतर शहरात येते हे म्हणणे सर्वार्थाने खरे नाही. खेड्यातील शेती करणारा, छोटे मोठे व्यवसाय करणारा ग्रामीण माणूस शहरात जाऊन झोपडपट्टीत महिला, कामगार मजुर झाला किंवा सुशिक्षित होऊन पांढरपेशा बनला तरी त्याची मानसिकता फारशी बदलत नाही. संख्येने मोठा असलेला, खेड्यातून राहणारा, शहरात येऊन उपऱ्यासारखे जीवन जगणारा सामान्य माणूस अखेर शोषितच ठरतो. म्हणून या ग्रामीण शोषित माणसाचे चित्रण करणारे ग्रामीण साहित्य या नव प्रवाहात अधिक समर्थ असण्याची गरज आहे. त्यातील सानर्थ्याला अधिक धार येण्याची गरज आहे.''[७६]

शेतकरी जीवनावर लिहिणाऱ्या लेखिका मात्र तुलनेने फार कमी आहेत. याचे कारण ग्रामीण समाजातील स्त्री आता कुठे शिक्षण घेऊन घराबाहेर पडत आहे. वाङ्मयाच्या क्षेत्रात स्थिरस्थावर होण्यासाठी स्त्रियांना अनेक अडचणी येतात. तरीही डॉ. प्रतिमा इंगोले, डॉ. मधु सावंत, अनुराधा गुरव इत्यादी लेखिकांनी आपल्या जीवनातील शेतकरी कुटुंबातील स्त्रियांचे अनुभव अतिशय जिव्हाळ्याने कादंबरीत शद्वबद्ध केले आहे.

त्यामुळे साहित्यातून शेतकऱ्यांच्या व्यथा, वेदना, आनंद, दुःख, शब्दबध्द होऊन श्रेष्ठ दर्जाचे साहित्य निर्माण होईल. अर्थातच वरील ही यादी काही परिपूर्ण आहे असे नाही. अजूनही अनेक नवे लेखक उदयाला आलेले आहेत. त्यातील काही ठराविक प्रमुख

लेखकांचा उल्लेख केला आहे. अशा प्रकारे अतिशय वास्तव, प्रत्ययकारी चित्रण, ज्वलंत प्रश्नांचा व सामाजिक जीवनाचा वेध घेण्याचा यशस्वी प्रयत्न लेखकांनी ग्रामीण साहित्यातून केला आहे. या ग्रामीण साहित्यातील दिवाकर चौधरी यांच्या 'बुझ्र्वागमन' व मोहन पाटील यांच्या 'साखरफेरा' या दोन लेखकांच्या कलाकृतींचा सविस्तर आढावा पुढील प्रकरणात घेण्याचा प्रयत्न केला आहे.

*****

# संदर्भ ग्रंथ


१) लक्ष्मणशास्त्री जोशी – मराठी विश्वकोश खंड ३, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृति मंडळ, मुंबई प्रथमावृत्ती १९७६ पृष्ठ ५९९

२) उषा हस्तक – कादंबरी आणि मराठी कादंबरी साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, नोव्हें. १९९३, पृष्ठ ५७

३) उषा हस्तक – कादंबरी आणि मराठी कादंबरी साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, नोव्हें. १९९३, पृष्ठ २१

४) रा. ग. जाधव – मराठी विश्वकोश खंड २, (संपा) लक्ष्मणशास्त्री जोशी, म. रा. सा. सं. मं. मुंबई, प्र. आ. १९७६, पृष्ठ ५८

५) कॅथरीन लीव्हर – वाङ्मय कोश संज्ञा आणि संकल्पना, हर्ष भटकळ प्रकाशन, मुंबई प्रथमावृत्ती डिसें. २००१, पृ. १७

६) लक्ष्मणशास्त्री जोशी – मराठी विश्वकोश खंड ३, महाराष्ट्र राज्य साहित्य संस्कृती मंडळ, मुंबई, प्रथमावृत्ती १९७६, पृष्ठ ६००

७) फडके – मराठी कादंबरीचा इतिहास १९२० ते १९४७ (संपा) चंद्रकांत बांदिवडेकर, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, पृ. १२१

८) प्रभा गणोरकर, जया दडकर, वसंत आबाजी डहाके, सदानंद भटकळ, आशा राजवाडे, रमेश वरखडे – वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, हर्ष भटकळ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती डिसें. २००१, पृ. १७३

९) प्रा. डॉ. प्रकाश सुर्यवंशी –मराठी कादंबरी : स्वरूप विचार (मराठी वाङ्मय तंत्र आणि आस्वाद समीक्षा संपा. प्रा. डॉ. संदिप सांगळे) डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे प्रथमावृत्ती ५ ऑक्टो. २००९, पृ. २३८

१०) प्रा. डॉ. प्रकाश सुर्यवंशी –मराठी कादंबरी : स्वरूप विचार (मराठी वाङ्मय तंत्र आणि आस्वाद समीक्षा संपा. प्रा. डॉ. संदिप सांगळे) डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे प्रथमावृत्ती ५ ऑक्टो. २००९, पृ. २३९




BARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR.

११) प्रा. डॉ. माधव बसवते – अक्षरवैदर्भी, ऑगस्ट २०१०, संपादक – सुदाम सावरकर, जनसाहित्य साधना, जनसाहित्य भवन, पृ. १६

१२) बालशंकर देशपांडे – कादंबरी विवेचन आणि विश्लेषण स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती १३ ऑक्टो १९९८, पृ. ७७

१३) प्रा. डॉ. माधव बसवते – अक्षरवैदर्भी, ऑगस्ट २०१०, संपादक – सुदाम सावरकर, जनसाहित्य साधना, जनसाहित्य भवन, पृ. १७

१४) उषा हस्तक – कादंबरी आणि मराठी कादंबरी साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, नोव्हें. १९९३, पृष्ठ ३९

१५) प्रा. डॉ. प्रकाश सूर्यवंशी –मराठी कादंबरी : स्वरूप विचार (मराठी वाङ्मय तंत्र आणि आस्वाद समीक्षा संपा. प्रा. डॉ. संदिप सांगळे) डायमंड पब्लिकेशन्स्, पुणे प्रथमावृत्ती ५ ऑक्टो. २००९, पृ. २३९

१६) प्रा. डॉ. माधव बसवते – अक्षरवैदर्भी, ऑगस्ट २०१०, संपादक – सुदाम सावरकर, जनसाहित्य साधना, जनसाहित्य भवन, पृ. १६

१७) प्रा. प्र. वा. बापट, प्रा. ना. वा. गोडबोले – मराठी कादंबरी तंत्र आणि विकास, व्हीनस प्रकाशन पुणे, तृतीयावृत्ती १९७३, पृ. १२९

१८) उषा हस्तक – कादंबरी आणि मराठी कादंबरी साहित्य सेवा प्रकाशन, औरंगाबाद प्रथमावृत्ती, नोव्हें. १९९३, पृष्ठ ४०

१९) फडके – मराठी कादंबरीचा इतिहास १९२० ते १९४७ (संपा. चंद्रकांत बांदिवडेकर) मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती, पृ. १६

२०) डॉ. शरणकुमार लिंबाळे – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती १५ जून २००७, पृ. ८७

२१) ल. म. भिंगारे – हरिभाऊ, पृ. ७२

२२) डॉ. रवींद्र ठाकूर – मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृ. ७२

२३) ल. म. भिंगारे – हरिभाऊ, पृ. ७६

२४) नरहर कुरूंदकर – धार आणि काठ, देशमुख प्रकाशन, पुणे १९७१, पृ. २२

२५) कुसुमावती देशपांडे – मराठी कादंबरीचे पहिले शतक, मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९५३, पृ. २३–२४

२६) वि. ह. कुलकर्णी – अर्वाचीन मराठी साहित्य, पृ. ६८

२७) कुसुमावती देशपांडे – मराठी कादंबरीचे पहिले शतक, मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९५३, पृ. २९

२८) रवींद्र ठाकूर –मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृ. १०७

२९) रवींद्र ठाकूर –मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृ. १०७

३०) डॉ. द. भि. कुलकर्णी – कादंबरी आणि महाकाव्य, (कादंबरी स्वरूप व समीक्षा) पद्मगंधा प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती २ एप्रिल २००३, पृ. २८

३१) कुसुमावती देशपांडे – मराठी कादंबरीचे पहिले शतक, मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९५३, पृ. ४७

३२) चंद्रकांत बांदिवडेकर – मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८९, पृ. ६

३३) वि. वा. हडप – आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास भाग दुसरा, १९२० ते १९५०, व्हीनस प्रकाशन, पुणे तृतीय आवृत्ती १९७९, पृ. १०१

३४) कुसुमावती देशपांडे – मराठी कादंबरीचे पहिले शतक, मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९५३, पृ. ११४

३५) रवींद्र ठाकूर –मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृ. १५०

३६) चंद्रकांत बांदिवडेकर – मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८९, पृ. १७

३७) रवींद्र ठाकूर –मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृ. १६२

३८) चंद्रकांत बांदिवडेकर – मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८९, पृ. १८८

३९) चंद्रकांत बांदिवडेकर – मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८९, पृ. २१७

४०) रवींद्र ठाकूर –मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृ. १७८

४१) कुसुमावती देशपांडे – मराठी कादंबरीचे पहिले शतक, मराठी साहित्य संघ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९५३, पृ. १०

४२) चंद्रकांत बांदिवडेकर – मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८९, पृ. ७३

४३) भालचंद्र नेमाडे – कादंबरी (मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, संपा. गो. भा. पवार, म. द. हातकणंगलेकर) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई

४४) चंद्रकांत बांदिवडेकर – मराठी कादंबरीचा इतिहास, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रथमावृत्ती १९८९, पृ. ७४

४५) डॉ. शंकर विभुते – स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल १९५० ते २०००, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २६ जाने. २०१०, पृ. १०

४६) डॉ. शंकर विभुते – स्वातंत्र्योत्तर मराठी कादंबरीची वाटचाल १९५० ते २०००, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती २६ जाने. २०१०, पृ. १०–११

४७) रवींद्र ठाकूर –मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृ. २६३

४८) भालचंद्र नेमाडे – कादंबरी (मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप, संपा. गो. भा. पवार, म. द. हातकणंगलेकर) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, पृ. ३१–३२

४९) डॉ. रत्नाकर बापू मंचरकर – ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, (ग्रामीण कादंबरी १९६० ते १९८० संपा. चंद्रकुमार नलगे) प्रथमावृत्ती – सप्टें. १९९६, पृ. ४०

५०) वसंत आबाजी डहाके – गेल्या अर्धशतकातील पौराणिक व ऐतिहासिक कादंबरी लेखनाची फलश्रुती (गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी संपा. विलास खोले) मुद्रक प्रकाशन, मुंबई, पृ. ११४

५१) बालशंकर देशपांडे – कादंबरी विवेचन आणि विश्लेषण, स्नेहवर्धन पब्लिशिंग हाऊस, प्रथमावृत्ती १३ ऑक्टो. १९९८, पृ. ६७

५२) वसंत आबाजी डहाके – गेल्या अर्धशतकातील पौराणिक व ऐतिहासिक कादंबरी लेखनाची फलश्रुती (गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी संपा. विलास खोले) मुद्रक प्रकाशन, मुंबई, पृ. ११६

५३) अविनाश सप्रे – स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरी, (प्रदक्षिणा खंड २ इ. स. १९४७ ते २०००) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. २०२

५४) भा. द. खेर – य–, मधुकुंज प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती ४१९६८, पृ. २२

५५) अविनाश सप्रे – स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरी, (प्रदक्षिणा खंड २ इ. स. १९४७ ते २०००) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. २०८

५६) प्रभा गणोरकर, जया दडकर, वसंत आबाजी डहाके, सदानंद भटकळ, आशा राजवाडे, रमेश वरखडे – वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, हर्ष भटकळ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती डिसें. २००१, पृ. १८४

५७) अविनाश सप्रे – स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरी, (प्रदक्षिणा खंड २ इ. स. १९४७ ते २०००) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. १९९

५८) रेखा इनामदार साने –गेल्या अर्धशतकातील स्त्री–कादंबरीकरांची कामगिरी (गेल्या अर्धशतकातील मराठी कादंबरी, संपा. विलास खोले) पृ. १२३

५९) अविनाश सप्रे – स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरी, (प्रदक्षिणा खंड २ इ. स. १९४७ ते २०००) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. २५१

६०) अविनाश सप्रे – स्वातंत्र्योत्तर काळातील मराठी कादंबरी, (प्रदक्षिणा खंड २ इ. स. १९४७ ते २०००) कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे, पृ. १४०

६१) प्रभा गणोरकर, जया दडकर, वसंत आबाजी डहाके, सदानंद भटकळ, आशा राजवाडे, रमेश वरखडे – वाङ्मयीन संज्ञा संकल्पना कोश, हर्ष भटकळ प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती डिसें. २००१, पृ. २२८

६२) बाळकृष्ण कवठेकर –दलित वाङ्मय (मराठी साहित्य प्रेरणा व स्वरूप १९५०–१९७५, संपा. गो. मा. पवार, म. द. हातकणंगलेकर) पॉप्युलर प्रकाशन, मुंबई, प्रथमावृत्ती १९८६/१९०७, पृ. ३०१

६३) रवींद्र ठाकूर –मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृ. ३३८

६४) प्रा. चंद्रकुमार नलगे – ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, शैलेंद्र प्रकाशन, पुणे, प्रथमावृत्ती सप्टे. १९९६, प्रास्ताविक

६५) डॉ. श्रीराम गुंदेकर – ग्रामीण साहित्य प्रेरणा आणि प्रयोजन दिलीपराज प्रकाशन, १९९९, पृ. ३२

६६) प्रा. वामन जाधव – ग्रामीण साहित्य आणि शेतकरी जीवन द्वितीय आवृत्ती, सप्टे. २००७, पृ. २

६७) नागनाथ कोतापल्ले – साहित्याचा अन्वयार्थ, मराठी ग्रामीण कादंबरीचे पहिले शतक, स्वरूप प्रकाशन, औरंगाबाद, प्रथमावृत्ती सप्टें. १९९६, पृ. २१८

६८) रवींद्र ठाकूर –मराठी कादंबरी समाजशास्त्रीय समीक्षा, दिलीपराज प्रकाशन, पुणे २००७, पृ. १२९

६९) वासुदेव मुलाटे – ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, (संपा. चंद्रकुमार नलगे, शैलेंद्र प्रकाशन), पुणे प्रथमावृत्ती सप्टे. १९९६, पृ. १२

७०) वा. म. जोशी – आधुनिक मराठी वाङ्मयाचा इतिहास (कादंबरीच्या जगात) पृ. १७५

७१) वासुदेव मुलाटे – ग्रामीण कादंबरी प्रारंभ ते १९६० (ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, संपा.

चंद्रकुमार नलगे) शैलेंद्र प्रकाशन, पुणे प्रथमावृत्ती सप्टे. १९९६, पृ. २८

७२) रत्नाकर बापू मंचरकर – ग्रामीण वाङ्मयाचा इतिहास, (ग्रामीण कादंबरी १९६० ते १९८०) पृ. ४३

७३) डॉ. शरणकुमार लिंबाळे – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे, १५ जून २००७, पृ. ७८

७४) डॉ. शरणकुमार लिंबाळे – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे, १५ जून २००७, पृ. ७८

७५) डॉ. शरणकुमार लिंबाळे – साठोत्तरी मराठी वाङ्मयातील प्रवाह, दिलीपराज प्रकाशन, पुणे, १५ जून २००७, पृ. ८०

*******